म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १८९२

१८९२

उग्वा - ७२

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
विज्ञान

संग्रहालय क्रमांक
७२

लेखक ज. म. गुर्जर

पुस्तकाचें नांव सचित्र लोकोत्तर चमत्कार

सन
१८९२

म.
विषय
सं. क्र. लोकोत्तरचमत्कार

—सचित्र—

# लोकोत्तर चमत्कार

## प्रथमशतक, भाग १ ला.

चमत्कार २५ पंचवीस.

जनार्दन महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर
रामवाडी मुंबई.

किंमत १० आणे.

( २

# धनुर्धारी

केसरीपत्रांत "वाग्बाण" सोडणारे लेखक "ध
पुस्तकें आम्हीं लिहविलीं आहेत, तीं छापण्याचें काम
व्हावीं यासाठीं आम्हीं खालील योजना केली आहे. मूव

धनुर्धारीचीं पुस्तकें हवीं असणारांनीं आमच्या दुकानीं द्र
निघालेलीं पुस्तकें देऊन निघतील तशीं पाठवीत जाऊं व पोस्टे

सदरप्रमाणें दोन रुपये भरणारांस, पुस्तकावरील किंमतीच्या पाऊ
पोस्टेज पडेल. असें नेहमीं चालेल. आगाऊ रु. न भरणारांस पुरी किंमत व पो

## ह्या सदराखालीं पुस्तकें निघतात:—

१ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

२ मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

३ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

४ कुलवधूंचा ज्ञानकोश.

## छापून विक्रीस तयार.

### १ महाराष्ट्रकु. सं. पुस्तकावलीपैकीं.

(१) मराठ्यांच्या मर्दुमकी भाग १ ला. (२) जवानमर्द ब्राह्मणभाई (१ बापू गोखले.) (३) वीरस्नुषा राधाबाई (४,५) जवानमर्द मराठेगडी (१ मल्हारराव होळकर. २ जनकोजी शिंदे.) (५) शूर अबला (१ राणी लक्ष्मीबाई झांशिकर, २ ताई तेलीण व ३ कितूर चन्नवा.) प्रत्येकीं किंमत ०= आणे. (६) जवानमर्द ब्राह्मण (उमदेतुल्मुल्ख विठ्ठल शिवदेव विंचूरकर.) (७) मराठ्यांच्या मर्दुमकी भाग टक्कांतील स्वाऱ्या.) प्रत्येकीं ०≡ आणे.

### २ मुलांचें चिमुकलें पुस्तकालय पैकीं.

(१) नीतिधर्मपाठ पहिलें पुस्तक. ०- (२) आपणांवरील जबाबदारी ०-॥. (३ स्वभाव ०-॥. (४) अभ्यास ०॥. (५) आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी.

### ३ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रहपैकीं.

(१) आतां पुढें काय करावें—पैसा कसा मिळेल?

ही व दुसरीं छापत आहेत.

**जनार्दन महादेव गुर्जर,** दुकान रामवाडी, मुंबई.

चित्रयुक्त

लोकोत्तरचमत्कार

तसेच ते परमेश्वराची अ

मनुष्यांना हृदय

महा

ल

# …रचमत्कार प्रथमशतक.

( चमत्कार २५ पंचवीस. )

भाग १ ला.

केरळकोकिळ मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेले
लोकोत्तरचमत्कार, लोकांनीं वाचण्याची
उत्कंठा प्रदर्शित केल्यावरून
एकत्र केले.

जनार्दन महादेव गुर्जर,
केरळकोकिळचे मालक,
रामवाडी, मुंबई.

सन १८९२ इसवी.

किंमत १० आणे.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेवले आहेत. )

मुंबईंत,
जावजी दादाजी
यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

लोकोत्तरचमत्कार लोकांच्या मनाचें रंजन करण्यास जसे कारणीभूत होतात, तसेच ते परमेश्वराची अद्भुत लीला, अगाध सामर्थ्य, आणि अतर्क्य महिमा, इत्यादि मनुष्यांच्या हृदयांत ठसविण्यासही कारणीभूत होतात. ह्मणून हा नवाच विषय आह्मीं महाराष्ट्र भाषेंत **केरळकोकिळ**द्वारा प्रथमतः सुरू केला. हा विषय प्रसिद्ध होऊं लागल्यानंतर पुष्कळ वाचकांचीं उत्तेजनपर पत्रें आलीं. व मागील चार वर्षांच्या अंकांबद्दल पुष्कळ लोकांच्या मागण्या शिलक आहेत. ह्यास्तव कांहीं महत्वाच्या विषयाचीं निरनिराळीं पुस्तकें स्वतंत्ररूपानें काढण्याचा विचार करून त्यांपैकीं **लोकोत्तरचमत्कार** हा एक विषय वाचकांवर मूल्यभार अधिक न पडावा ह्मणून भागा भागानें काढण्याचा विचार केला आहे. प्रस्तुत पुस्तक हा **'प्रथम शतकाचा पहिला भाग होय.'** ह्यांत पंचवीस लोकोत्तरचमत्कार दिले आहेत. असे भाग चार झाले ह्मणजे प्रथम शतक समाप्त होईल. त्यानंतर सवडीप्रमाणें द्वितीय शतक, तृतीय शतक असाच क्रम—ईश्वरी नियमा नियमाप्रमाणें—चालविण्याचा हेतु धरला आहे. व अधिक मिळालेली माहिती ह्यांत घातली आहे. अशा प्रकारें केलेली ही सेवा लोकादरास पात्र झाली, ह्मणजे आमच्या श्रमाची, व प्रकाशकांच्या द्रव्याची सार्थकता झाली असें समजूं.

ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश इंग्लिशलोकांप्रमाणें आपल्या लोकांमध्यें लोकोत्तरचमत्काराची अभिरुचि उत्पन्न व्हावी, व ते संग्रहीत करण्याकडे त्यांचें मन वळावें, असा आहे. त्या संबंधानें **हें पुस्तक ज्यांच्या ज्यांच्या हातांत जाईल, त्यांस त्यांस व इतरही शोधक लोकांस अत्यादरपूर्वक विनंती आहे, कीं** ते ज्या ज्या ठिकाणीं राहत असतील तेथें, किंवा **त्याच्या आसपास जे जे लोकोत्तरचमत्कार सांप्रत असतील,** किंवा **प्रसंगोपात घडतील,** ते समक्ष पाहून किंवा विश्वसनीय माहिती मिळवून, ते कोठें, कधीं, व कोणासमक्ष घडले इत्यादि प्रकारची **इत्थंभूत माहिती आमच्याकडे लिहून पाठविल्यास** त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करून **आमच्या शतकांत त्याचा** नामनिर्देशपूर्वक **अवश्य संग्रह करूं.** अशा प्रकारें जे परोपकारी लोक ह्या कामांत तसदी घेतील त्यांचे **आह्मावर,** परंपरेनें सर्व **महाराष्ट्र देशावर** व यच्चयावत् **भरतखंडावरही उपकार होणार आहेत.** व अशा प्रकारचे स्वदेशीय लोकोत्तरचमत्कारांचें स्वतंत्र शतक तयार झाल्यास एक मोटी कृतकृत्यता झाली असें वाटेल.

हल्लीं मुक्काम **कोल्हापूर.**
ता० २३ जुलई सन १८९२ इ.

**केरळकोकिळकर्ते.**

# लोकोत्तरचमत्कार.

## प्रथम शतकपैकीं चमत्कार २५.

### अनुक्रमणिका.


१ श्वेतगज.–(चित्र) ... ... ... ... ... ... ... १
२ शिंगाचीं मनुष्यें. ... ... ... ... ... ... ... ३
३ १५००० रुपयांचें पुस्तक. ... ... ... ... ... ... ६
४ पिंपांत राहणारा मनुष्य. (चित्र) ... ... ... ... ... ९
५ बर्फाचा वाडा. ... ... ... ... ... ... ... ११
६ चित्तविभ्रम.... ... ... ... ... ... ... ... १६
७ जलबिंदूंतील चर्मचक्षूंस अगम्य असे सूक्ष्म प्राणी.–(चित्र) ... ... २०
८ तारबातमी. ... ... .. ... ... ... ... ... २५
९ पक्ष्यादिकांचीं युद्धें. ... ... ... ... ... ... ... २८
१० बुद्धाचा दांत. (चित्र) ... ... ... ... ... ... ३०
११ दगडांच्या नद्या. ... ... ... ... ... ... ... ३५
१२ राक्षसी गुलाब. ... ... ... ... ... ... ... ३७
१३ मुंग्यांचा राक्षस. (चित्र) ... ... ... ... ... ... ३८
१४ भविष्याचे ठोकताळे... ... ... ... ... ... ... ३९
१५ नरमांसभक्षक लोक... ... ... ... ... ... ... ४७
१६ २१०९ वर्षांचा वटवृक्ष. (चित्र) ... ... ... ... ... ५२
१७ विजातीय कुत्रा. ... ... ... ... ... ... ... ५५
१८ २२०॥ रुपयांचा शब्द. ... ... ... ... ... ... ५६
१९ विमान. (चित्र) ... ... ... ... ... ... ... ५९
२० बर्फांत गढलेली बाई. ... ... ... ... ... ... ६४
२१ खरा शूर. ... ... ... ... ... ... ... ... ६८
२२ झाडावर चढणारे मासे. (चित्र) ... ... ... ... ... ७६
२३ पूर्वयुगांतील प्राणी. (चित्र) ... ... ... ... ... ... ८२
२४ स्वप्नसृष्टि. ... ... ... ... ... ... ... ... ८४
२५ हातभर उंचीचीं मनुष्यें. (चित्र) ... ... ... ... ... ८९


३१८

# लोकोत्तरचमत्कार

## प्रथमशतक.

### भाग पहिला.

### (१) श्वेतगज.



दुर्मिळ, सुरेख, आणि असाधारण वस्तु असली ह्मणजे ती पाहण्याविषयीं उत्कंठा असणें हा मनुष्यमात्राचा स्वभावच आहे. ती उत्कंठा पूर्ण करण्यासाठीं आह्मीं आज शिरोभागीं श्वेतगजाचें चित्र दिलें आहे. मिस्तर क्राफर्ड नांवाचे गृहस्थ ब्रह्मदेशाच्या दरबारीं वकील असतां तेथील अपूर्व आणि नामांकित श्वेतगजाचा त्यांनीं फोटोग्राफ घेतला होता, त्यावरून हें तयार केलें आहे.

श्वेतगज ह्मणजे पांढरा हत्ती. साधारण राजेरजवाड्यांकडे, किंवा

प्रसिद्ध देवस्थानांतून आपण जे हत्ती पाहतों, ते सर्व काळ्या रंगाचे असतात; व पृथ्वीच्या पृष्ठभागावर अन्य कोठेंही पांढरा हत्ती असल्याचें ऐकिवांत नाहीं. हा अपूर्व प्राणी ब्रह्मदेशाचा राजा थीबा ह्याच्या पदरीं एक होता. व सयामच्या महाराजापाशीं सहा आहेत. श्वेतगजास त्या देशांत फारच मोठा मान आहे. हजारों लोक कांहीं नित्यनैमित्ताच्या दिवशीं, किंवा लग्नकार्यारंभीं त्याची पूजा करितात. श्वेतगजास नवस करणारे लोकही पुष्कळ आहेत. फार काय सांगावें? त्याच्या जिवाभावास आलें, तर दरबारांतील लोक व इतर लोक आपणांवर कांहीं तरी अनिष्ट येऊन गुदरणार ह्मणून समजतात. व त्याचा आजार बरा होण्यासाठीं ठिकठिकाणीं अनुष्ठानें बसवितात.

पांढरा हत्ती आसाम प्रांत आणि ब्रह्मदेश ह्या दोनच प्रदेशांत सांपडतो. अन्यत्र कोठेंही सांपडत नाहीं. तेथेंही ते विपुल मिळतात असें नाहीं. क्वचित् कधीं शेंपन्नास वर्षांनीं एखादा हातीं सांपडतो. ह्मणूनच त्यास किंमत फार पडते. पांढऱ्या रंगाच्या हत्तीचें आंग पांढरें स्वच्छ असून फार नितळ असतें. डोळे, इतर हत्तींपेक्षां बरेच मोठे असून ते पाणीदार दिसतात. ह्याची अक्कलही इतर हत्तींपेक्षां विशेष असते असें ह्मणतात.

ब्रह्मदेशाची पूर्वीची राजधानी आवा. तेथें ह्या श्वेतगजास फारच मान देतात. किंबहुना राजापेक्षांही त्याचा मान मोठा आहे ह्मटलें तरी चालेल. त्याला चांदीच्या पात्रांतून जेवूं घालतात. पाणी पाजणें तें सुवर्णाच्या घंगाळांतून पाजतात. प्रत्येक दिवशीं स्नानासाठीं नदीवर नेतांना त्यावर रेशमी भरजरीचा चांदवा धरतात. आणि सहा किंवा आठ हुजरे त्याच्या तैनातीस असतात. आठ दहा चोपदार भालदार पुढें ललकारत असून तासे, मर्फे, इत्यादि वाद्यें वाजत असतात. स्नान होऊन गजराजाची स्वारी बाहेर आली ह्मणजे स्वतः राजा अथवा दुसरा मोठा मानकरी एका रुप्याच्या घंगाळांत त्याचें स्वहस्तें पादप्रक्षालण करून तीर्थ सेवन केल्यावर तें सर्वांच्या मस्तकावर सिंचन करतो. त्या देशांतील काळे हत्ती दहा दहा हात उंच असतात, तथापि त्यांस तेथें मुळींच मान नाहीं. पांढरा हत्ती पुष्कळ वर्षेंपर्यंत वांचतो.

हत्ती हें सर्व स्थलचरप्राण्यांतील श्रेष्ठ जनावर होय. हत्तीचा छावा,

जन्मतःच सुमारें ३५ इंच उंच असतो; आणि दिसण्यांत फार गोजिरवाणा दिसतो. त्याची शुंडा प्रथमतः फार आंखूड असल्यामुळें बोथट दिसते. हत्तीस पाणी पिणें झालें तर तें सोंडेंत प्रथम घेऊन नंतर तो तोंडांत ओततो. ह्यावरून हत्तीचा छावाही पितांना तसेंच करीत असेल अशी कल्पना मनांत येते. परंतु खरा प्रकार तसा नाहीं. हत्तीचा छावा पितांना आपली सोंड, वर मस्तकाकडे वळवितो, आणि तोंडानेंच पितो. हत्तिणीची कास पुढील दोन पायांच्या जवळ असते, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अठरा आणि चोव्वीस वर्षांच्या दरम्यान हत्तिणीस यौवनदशा प्राप्त होते. हत्तीचें आयुष्य साधारणपणें सव्वाशें-पासून दीडशें वर्षेपर्यंत असतें.

हत्तीइतकें ज्ञान आणि चातुर्य इतर जनावरांत क्वचितच आढळेल. आपल्यावर केलेले उपकार जाणण्याचा जसा त्याचा स्वभाव आहे, तसाच आपणास विनाकारण त्रास देणाराचा सूड उगविण्याचाही त्याचा स्वभाव आहे. गायनावर त्याची विशेष प्रीति असते. आणि उत्तम गाण्यावर अनेक वेळ खूष झाल्याचीं उदाहरणें आहेत. शिकविणारा चांगला असला ह्मणजे तो अनेक गुण शिकतो. तोंडांत लेखण धरून अक्षरें काढतो; लांकडांच्या ओंडक्यांची गंज रचतो; सोंडेंत कुऱ्हाड घेऊन वृक्ष तोडतो; सोंडेंतून नळ आणून जमिनींत बसवितो. पारिस शहरामध्यें एका कसरतींतील शिकविलेला हत्ती, नदीवर बांधलेल्या दोरीवरून चालत गेला होता!

वारन् हेस्तिंगचा हत्ती, मार्गांतील गर्दींतून जाऊं लागला ह्मणजे जपून पाय टाकी, सोंडेनें मनुष्यास हळूच बाजूस सारी. ह्मातारे, अशक्त, किंवा लहान मूल पुढें पायास अडखळलें तर हळूच उचलून बाजूस ठेवी! हा हत्ती वारन् हेस्तिंगवर स्वतः चवरी ढाळी! काय ही मुक्या जनावराची अक्कल! इंद्राचा ऐरावत पांढरा असल्याचें पुराणांतरींही वर्णन आहे.

---

## (२) शिंगांचीं मनुष्यें.

एडिंबरो येथील शरीरावयवपदार्थसंग्रहालयांत, चार शिंगें ठेव-

ल्लीं आहेत. तीं चार शिंगें, चार बायकांचीं काढलेलीं आहेत. त्यांपैकीं एक सात इंच लांब, व मनुष्याच्या करांगुळी इतकें जाड असून त्याच्या खालीं पुढील लेख लिहिलेला आहे. "हें शिंग ता. १४ मे स. १६७१ ह्या दिवशीं **अंड्र्यूटेंपल, थामस बर्न, जार्ज स्मिथ, जान स्मिटन,** आणि **जेम्स ट्वीडी** इतक्यांच्या साक्षीनिशीं डा० **अर्थर टेम्पल** यानें **इलिजाबेथलो** ह्या बाईच्या डोक्यापासून कापून काढलें आहे. हें तिच्या उजव्या कानापासून तीन इंच वर होतें. ह्याची वाढ सात वर्षें चालू होती. व त्या बाईचें वय ९० वर्षांचें होतें."

दुसऱ्या ठिकाणीं असें वर्णन केलें आहे कीं, मिसेस **मेरी देविस चेस्टर** नजीक **ग्रेट सान हाल** मध्यें राहणार, ही अठ्ठावीस वर्षांची झाली असतां, तीस आपली टोपी डोक्यास घालण्याचा त्रास पडूं लागला. शेवटीं तिसाव्या वर्षीं तीस बकऱ्याच्या शिंगांसारखीं दोन शिंगें फुटलीं. त्या शिंगांविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें लेख आढळतो.

"तिनें, हीं शिंगें तीन वेळ कापून टाकलीं. पहिल्या खेपेस एकच शिंग लव्हाळ्यासारखें बारीक आणि लांब असें होतें. दुसरें प्रथमच्यापेक्षां अधिक जाड होतें. कापतांना तीं सारख्या वर्षांचीं नव्हतीं. कांहीं तीन वर्षांचीं, कांहीं चार वर्षांचीं, आणि एक साडेचार वर्षांचें होतें. तिसऱ्या खेपेस दोन शिंगें वाढलेलीं होतीं. आणि तीं दोन्ही मागें पडलेलीं होतीं. त्यांपैकीं एक, एका इंग्रजी सरदारानें, हा एक सृष्टींतील अपूर्व चमत्कार आहे असें समजून, तें पैदा केलें. आणि फ्रेंच सरकारास नजर दिलें. दुसरें त्यापेक्षां अमळ मोठें होतें. ह्मणजे ९ इंच लांब आणि २ इंच घेराचें होतें. आणि ती नवी व अपूर्व वस्तु असल्यामुळें त्यांची किंमत फार वाढलेली होती. ह्या लोकोत्तर वस्तूंच्या खरेपणाविषयीं लांबलांबच्या प्रवाशांनीं साक्षी दिल्या आहेत."

**मिसेस देविस** ही सन १५९८ त वारली. त्या वेळेस तिचें वय ७४ वर्षांचें होतें.

**सर इव्हरार्ड होम बार्ट,** एफ्; आर; एम्, हा 'शरीरशास्त्र' ह्या विषयावर एक वर्तमानपत्र काढीत असे. त्यानें आपल्या २१ व्या अंकांत निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं मनुष्यांस शिंगें फुटल्याबद्दल अनेक सप्रमाण उदाहरणें दिलीं आहेत. तो ह्मणतो "ह्या अत्य-

द्भुत व लोकविलक्षण रोगाच्या खरेपणाबद्दल तुरळक तुरळक आढळलेलीं उदाहरणें दिलीं, येवढीं पुरे आहेत. येवढ्यावरून, त्या रोगाचें स्वरूप सर्वांच्या लक्षांत येईलच. आणि हीं सर्व प्रमाणें प्राचीन आहेत असें समजून, तीं सर्व माझ्या पुराव्यांतून जरी क्षणभर बाजूस काढून ठेवलीं, तरी मजजवळ एक ताजें उदाहरण आहे. आज मितीस(१७०१) दोन बाया इंग्लंदांत राहणाऱ्या जिवंत असून, त्यांस शिंगें आहेत."

ह्या दोन बायांपैकीं एक **ल्यान्सड्लबाई**, ६६ वर्षांची असून तिचें जन्म **लिन्कोन शायरच्या हार्नक्यासल**मध्यें झालें होतें. आणि दुसरी मध्यम वयाची असून तिचें नांव **एलेज** असें होतें. ती **लिसेस्टर शायर**मध्यें राहत असे. पहिलीचा हा सृष्टीक्रमविरुद्ध अवयव तिच्या डाव्या कानाच्या अमळसा वर डोक्यावर वाढलेला होता. तो सुमारें पांच वर्षांत कोंबडीच्या अंड्यायेवढा झाला. आणि एकाएकीं जोरावला. नंतर तो हळू हळू फुगूं लागून, त्याचा शेंडा तांबडा होत गेला. उद्भवला तेव्हां तो वाटाण्यापेक्षां मोठा नव्हता, पण तीन महिन्यांत तो बकऱ्याच्या शिंगाएवढा झाला. पण मृदु होता. नंतर त्यांत शृंगत्व येत चाललें. दोन तीन वर्षांत तो सुमारें ५ इंच लांब झाला. त्याच्या वेदनेनें ती बिचारी अगदीं वेडी झाली. प्रथमतः तें मोडून काढलें होतें. आणि नंतर तें समूळ उपटलें. तथापि सर **एव्हार्ड**च्या वेळीं लिहिलें आहे कीं, कापल्या ठिकाणीं दुसरें शिंग लहान लहान शिंगांसुद्धां उगवूं लागलें. **मिस एलन**च्या खुणा अशाच प्रकारच्या होत्या. वरील लेखकानें १७९० त जेव्हां तीस पाहिलें तेव्हां तें ५ इंच लांब असून फार पिळगटलेलें, आणि दिसण्यांत वाकडतिंगें असें होतें. **मिस एलेन** ही **लंदनास** आणली होती. आणि तिला दाखविण्याबद्दल प्रदर्शनही केलें होतें. शेजारपाजारच्या प्रांतांतून व देशांतून खूप पैसा मिळविला !! शेवटीं तद्देशीय इष्टमित्रांनीं तिच्या नवऱ्याकडून तीस मोठ्या जुलमानें परत आणलें.

**"इफिमराइडस् अकडेमिया नेचर क्यूरिअसरम"** ह्यांत वर वर्णन केल्याप्रमाणेंच एका जर्मन बाईच्या डोक्यावर शिंग आल्याचें कळविलें आहे. आणि **धि हिस्टरी आफ् धि रायल सोसायटी आफ् मेडिसिअन**मध्यें एका ९७ वर्षांच्या म्हातारीच्या डोक्यास शिंग

झाल्याचें कळविलें आहे. त्यास १४ वर्षें झालीं होतीं. हें शिंग प्रथम उत्पन्न झालें तेव्हां करटासारखें दिसत होतें. आणि मस्तकास जरा धक्का लावला कीं तें लुटु लुटु हलत असे. आणि वारंवार कातरून काढलें तरी तें पुनश्च उत्पन्न होई. **बर्थोल्ड, आपल्या एपिस्टल्स**मध्यें इ. स. १६४९ त त्यानें पाहिलेलें एक उदाहरण कळवितो कीं, एका स्त्रियेस बारा इंच शिंग होतें. **धि न्याचरल हिस्टरी आफ् चेशायर** मध्यें इ. स. १६६८ त एक स्त्री कळविते कीं "मी आज ३२ वर्षें, एक शिंग मस्तकावर वागवीत आहें. आणि माझ्या ७२ राव्या वर्षीं त्याशिवाय दोन नवीं उत्पन्न झालीं आहेत." हीं **ब्रिटिश म्युझियम**-मध्यें **"मानवीशृंगें"** या नमुन्यांत ठेवलेलीं आहेत, आणि त्यांच्याखालीं **टेंडरऱ्हुन** शेजारीं राहणाऱ्या **फ्रेंच** नांवाच्या बाईचींही काढलेलीं आहेत, असा लेख आहे. हीं शिंगें प्रथम करटाप्रमाणेंच दिसलीं होतीं. हेंच शिंग **डा० ग्रे**नें पाहिलें तेव्हां तें ११ इंच लांब आणि २॥ इंच घेराचें होतें. अशीं अनेक उदाहरणें आहेत. पण तीं ह्या सारखींच असल्यामुळें सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

त्यांत एक उदाहरण मात्र निराळें आहे. तें एका **जर्मन** पुरुषाचें होय. हा एक योग्य थोर गृहस्थ होता. ह्याचें शिंग त्याच्या पाठीच्या शेवटच्या मणक्यापासून निघालेलें होतें. वर जीं स्त्रियांचीं उदाहरणें सांगितलीं आहेत, तीं सर्व शिंगें, मस्तकाच्याच निरनिराळ्या भागापासून वकऱ्यास वगैरे येतात, तशीं निघालीं होतीं. पण ही तऱ्हा अगदींच भिन्न असल्यामुळें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

**शृंगऋषी**चें पुराणांतरीं जें वर्णन आहे, ती केवळ भाकडकथा होय असें ज्यांचें मत असेल, त्यांनीं वरील गोष्टीकडे चांगलें लक्ष्य पुरवावें!

## (३) १५००० रुपयांचें पुस्तक.

आजपर्यंत आह्मास वाटत होतें कीं, आपला महाभारत ग्रंथ हाच काय तो मोठा. त्याच्या एवढा दुसरा प्रचंड ग्रंथ पृथ्वींत नसेल. पण "नाना रत्ना वसुंधरा" ह्या ह्मणीप्रमाणें पृथ्वीवरील एकेक गोष्ट ऐकावी तेव्हां मनाचा संशय फिटतो.

1173 · 398

**ब्रिटिश म्युझियम** लायब्ररींत चिनी पुस्तकसंग्रहांत **"चिनीविद्यासंग्रह"** ह्या अर्थाच्या नांवाचें एक पुस्तक आहे. हें सर्व पृथ्वींत मोठें व लोकोत्तर पुस्तक होय. ह्याचीं ५०२० खंडें आहेत ! मग अध्याय किती असतील तें कोण जाणें ? हें प्रचंड पुस्तक कांहीं वर्षांपूर्वी चीनच्या छापखान्यांतून १५०० पौंडांस विकत आणलें आहे. ह्या पुस्तकाच्या प्रती, चीन देशांतही फारच थोड्या असून बहुत दुर्मिळ आहेत. ह्यांत इ० सनापूर्वी ११०० वर्षांपासून तों इ० स० १७०० वर्षांपर्यंतची स्थिति लिहिलेली आहे. ह्मणजे २८ शतकांचा काल त्यांत व्यापलेला आहे.

ही मूळप्रत इ. स. १६६२ पासून १७२२ पर्यंत राज्य करणारा विद्याविलासी बादशहा **"क्यांगही"** ह्यानें खरेदी केली. हा बादशहा स्वदेशांतील विद्या शिकण्याचा फार शोकी असे. त्यास अभ्यास करतांना हा विस्तीर्ण ग्रंथ जीर्ण दशेला आलेला आढळला. विद्याभिलाषी लोकांचें पुस्तकावर किती प्रेम असतें, व त्याची जीर्ण स्थिति पाहून त्यांस किती कळकळ येते हें त्यांचें त्यांसच; किंवा त्यांच्या वर्गांतील इतरांसच माहीत. तदितरांस त्याची कल्पना व्हावयाची नाहीं ! ठीकच आहे **"पिको वसंतस्य गुणं न वायसः, करी च सिंहस्य बलं न मूषकः"** तेव्हां असा अपूर्व, केवळ सच्छास्त्रपूरित अप्रतिम ग्रंथ मरणोन्मुख झालेला पाहून त्या विद्याभिलाषी बादशहाचें मन किती बरें द्रवलें असेल ! त्यानें तत्काळ विद्वान लोकांकडून त्यांत सुधारणा करवावी, व दुसऱ्या एखाद्या प्रतीशीं ही प्रत ताडून पाहून तो ग्रंथ नीट शुद्ध करवावा असा निश्चय केला.

खरोखर पाहतां, हा त्याचा बेत फार हिय्याचा आणि स्तुत्य होता ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. पण अशा कामास त्या काळीं पुरस्कर्ता ह्मटला ह्मणजे त्याचा तोच होता.—बादशहा कांहीं तरी उधळपट्टी करतो आहे—असें ह्मणून कुचेष्टा करणारे मात्र रग्गड होते. **क्यांगहीनें** क्षुद्र लोकांचे विचार सर्व झुगारून देऊन या कामासाठीं महान विद्वान लोकांचें एक कमिशन नेमून, त्यांस तें काम फर्माविलें. आणि तें काम खूप झपाट्यानें चालवावें, असा कमिशनास हुकूम दिला. **जेसूट** या नांवाचा एक धर्माध्यक्ष होता, त्यास त्या कामासाठीं तांब्याचे टाईप ओतण्याच्या कारखान्यावर मुख्य नेमलें.

अशा ह्या कडेकोट तयारी केलेल्या, व अग्निरथवेगानें काम करणाऱ्या कमिशनाला ह्या दीर्घ कामांतून पार पडण्याला ४० वर्षें लागलीं ! ! पण अरेरे ! ! ज्यानें एवढी उलाढाल केली; ज्यानें सरस्वती देवीचा अभिमान बाळगिला; तत्प्रीत्यर्थ हजारों रुपयांचा ज्यानें चुराडा उडविला; तो विद्याविलासी बादशहा **क्यांगही,** ही नवी प्रत पाहण्यास सुद्धां जगला नाहीं, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय ! तो जर ही नवी प्रत पाहता, तर त्याला किती बरें आनंद झाला असता ? पण शास्त्रें पडलीं अपार ! आणि जीवित पडलें अत्यल्प. तेथें काय इलाज आहे ?

प्रपंचांत अल्पकालावधीच्या इच्छाही सफल होणाऱ्या थोड्या, आणि विफळ होणाऱ्या पुष्कळ. मग ह्या दीर्घकालिक कृत्याचा शेवट बादशहानें पाहिला नाहीं, ही गोष्ट विशेष सृष्टिक्रमाविरुद्ध झाली असें ह्मणतां येत नाहीं. व तशी बादशहाचीही आशा नव्हती, असें दिसतें. कारण, बादशहानें सदरहू कमिशनचें काम आपल्या पश्चात् अव्याहत चालावें, अशा प्रकारचा यथायोग्य बंदोबस्त पूर्वींच करून ठेवला होता. हें त्याच्या धूर्ततेचें लक्षण होय.

सदरहू कमिशननें ह्या पुस्तकाचे निरनिराळ्या शास्त्रविचाराच्या संबंधानें ६ विभाग केले. ते येणेंप्रमाणें:—१ **ब्रह्मविचार** २ **सृष्टिज्ञान.** ३ **मानवजाती.** ४ **चराचरविचार.** ५ **नीतिशास्त्र.** आणि ६ **अर्थशास्त्र,** किंवा **व्यवहारशास्त्र.**

आतां अशी कल्पना केली कीं, ह्या पुस्तकाच्या प्रत्येक भागाचीं सरासरी २०० पानें आहेत. आणि कोणी विद्यार्थी दररोज कधीं न थांबतां ५० पानें वाचतो. तर त्या विद्यार्थ्यास ह्या ग्रंथाचें एकदां पर्यालोचन करावयास ५५ वर्षें ९ महिने आणि १० दिवस लागतील ! अहाहा ! येवढा प्रचंड ग्रंथ ज्यानें रचला त्याची बुद्धि; त्याची योग्यता; त्याची उद्योगशीलता; त्याची विद्वत्ता; केवढी असेल बरें ? खरोखर तोच पुरुष धन्य होय. त्यानेंच आपल्या जननीच्या दुःखाचें सार्थक केलें ! ! नाहीं तर आपलीं आहेतच.

"जननि उदरीं झालीं जन्मलीं आणि मेलीं"

# (४) पिंपांत राहणारा मनुष्य.

## डायजेनस.



"व्यक्ति तितक्या प्रकृति" अशी एक पुरातन ह्मण चालत आली आहे. आणि ती खरी आहे. ह्मणजे प्रसंगोपात जगावर अशा कांहीं विलक्षण व्यक्ति दृष्टीस पडतात कीं, त्या पाहून मनास मोठा चमत्कार वाटतो. जे लोक वैराग्य धारण करून, "करतलभिक्षा तरुतलवासः" पतकरून, केवळ निस्पृहपणें योगसाधनांतच आपला कालक्षेप करणारे आहेत, त्यांच्यांत हा प्रकार विशेष दृष्टीस पडतो. कोणी आपला एक हात वर्षोनवर्ष मस्तकावर ठेवतात, व कधीं हालवीत नाहींत. तेणेंकरून त्यांचीं नखें चार चार पांच पांच फूट वाढून त्यांचीं वेंटाळींच्या वेंटाळीं झालेलीं दृष्टीस पडतात!!! कोणी आपल्या मस्तकावर वृक्ष लावून तो वाढवितात!! कोणी भर उन्हांत पंचाग्नी साधन करून बसतात. असे अनेक प्रकार आहेत. ह्या सर्व साधनांची गणना हटयोगांत केलेली आहे. हें एकप्रकारचें तप होय. आतां ह्यांपैकीं कित्येक लोक वेडगळ असतात हें खरें. परंतु कित्येक लोक त्यांपैकीं फारच तत्त्वज्ञानी असतात. त्यांच्या निस्पृह वागणुकीमुळें त्यांजवर वेड्याची कळा आलेली असते,

आणि त्यामुळें प्राकृत जनांस त्या महापुरुषांची योग्यता कळत नाहीं. अशा व्यक्ति दरएक राष्ट्रांत केव्हां ना केव्हां अवतरलेल्या असतातच. उदाहरणार्थ **बर्थोल्ड.** ह्या अष्टावक्र मूर्तीचें चरित्र ज्यांनीं अवलोकन केलें असेल, त्यांस त्याच्या समयसूचकतेचें आणि निस्पृहपणाचें कौतुक वाटल्यावांचून राहिलें नसेलच.

अशाच प्रकारचा **डायजेनस** ह्या नांवाचा एक महापुरुष **शिकंदर** बादशहाच्या कारकीर्दीत **ग्रीस** देशांत होऊन गेला. हा भारी निस्पृह असे. मोठमोठाले लोक त्याच्या पायांवर मस्तक ठेवीत, तरी त्यांस तो जुमानीत नसे. फार तर काय? पण प्रत्यक्ष पृथ्वीपती शिकंदर हात जोडून पुढें उभा राहिला असतांही त्याची त्यास पर्वा वाटत नसे. ही स्वारी **सायबेल**च्या प्रख्यात देवालयांत एक पिंप आडवें ठेवून त्यांत रहात असे. आपल्या हातांत, कंबरेस, गळ्यांत, मोठमोठाले दोरखंड बांधी. त्यानें इंद्रियदमनशक्ति फार वाढविली होती. तो भर उन्हाळ्यांत उघड्या आंगानें रसरसलेल्या वाळूंत जाऊन लोळे ! ! हिंवाळ्यांत बर्फामध्यें स्वतः पुरून घेऊन खुशाल बसे. त्यानें पाहिजे त्या हवेंत राहण्याची संवय केली होती. तो कित्येक दिवस अन्नपाण्यावांचून काढी. व मिळाले ह्मणजे कटु, आम्ल, क्षार इत्यादि हवे ते पदार्थ, मिष्ट पदार्थांप्रमाणें मोठ्या आवडीनें भक्षण करी. दिवसा कंदील पेटवून हिंडण्याचा ह्याचा एक धंदाच असे. दिवसा कंदील लावून कां फिरतां ह्मणून कोणी विचारल्यास "ह्या जगांत कोणी प्रामाणिक मनुष्य आढळतो कीं काय? ह्याचा शोध करीत आहें" ह्मणून सांगे.

एके दिवशीं **डायजेनस** सकाळच्या प्रहरीं कोवळें उन्ह घेत बसला असतां, तेथें **शिकंदर** बादशहाची स्वारी येऊन दाखल झाली. व हे तपस्वी आपल्याच नादांत आहेत, असें पाहून बादशहा बाजूस उभा राहिला. तों किंचित् उन्ह अडलें. तें पाहून बैरागीबुवा तापून ह्मणतात, "चल, हो बाजूला. चालला माझें उन्ह अडवायला." बादशहा लगेच बाजूस सरला. बादशहानें ह्या स्वारीची अनेक वेळ प्रार्थना केली; कीं, आपणास रहावयास वाडा बांधून देतों. तेथें रहावें. पण येथें काय? "निस्पृहस्य तृणं जगत्." बुवा ह्मणाले, "माझ्या पिंपांत माझा सारा देह राहून शिवाय चार मनुष्यांची जागा शिल्लक राहते. मला

१७१३ ३७८

अधिक जागा करावयाची काय ? तूंच पाहिजे तर माझ्या पिंपांत राहवयास ये." **शिकंदर** बादशहाचें नव्वदावें वर्ष ज्या दिवशीं पुरें झालें, त्याच दिवशीं **डायजेनस** हा महापुरुष निजधामास गेला ! ! काय योगायोग असेल हा ?

## (५) बर्फाचा वाडा.

**कैसें मंदिर भव्य तें उठविलें स्वप्नीं जणों पर्वत**
**नाहीं कर्णकठोरशब्द कुदळी खोरीं न वा करवत ॥**
**जोडोनी हिमभाग दार तुळया भिंतीहि केल्या जिथें**
**नाहीं वीट चुना सुतारहि जया कौलें कशाला तिथें ॥ १ ॥**

चक्रवर्तिनी **आन** राणीच्या कारकीर्दींत **रशियन** सरदारांनीं, केवळ बर्फाचेंच एक भव्य मंदिर बांधून, जें आपलें कौतुक पुरवून घेतलें, त्याच्या स्वरूपाचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यासाठीं, **कूपरच्या** काव्यांतून वरील चार ओळी भाषांतररूपानें घेतल्या आहेत. **रशिया**मध्यें **नेवा** ह्मणून एक अति थंड प्रदेश आहे. तेथें सर्वकाल बर्फ असतो. सन १७३२ त ह्या ठिकाणीं एक प्रचंड खोटी लढाई करण्याचें ठरलें होतें. आणि त्या निमित्तानें तेथें हजारों अमीर उमराव, शिपाई प्यादे, एकसमयावच्छेदेंकरून जमा झाले होते. त्यांनीं कर्मणुकीसाठीं ह्मणून तेथें एक बर्फाचा किल्ला केला. व तो इतका विस्तीर्ण होता कीं, त्याच्या द्वारांतून इतक्या सैन्यास जाण्यास कांहीं अडचण होत नव्हती. व इतकें सैन्य जसें एखाद्या जमिनीच्या तळावर वावरावें, तसें ह्या क्षणभंगुर किल्ल्यावर खुशाल वावरत होतें, तोफांचे मार वगैरे, करण्यासाठीं युद्धोपयोगीं सर्व स्थळें त्यावर तयार केलीं होतीं.

ह्या किल्ल्याच्या योगानें **नेवा** हें खरोखरच त्या कालीं प्रख्यातीस आलें होतें. परंतु पुढें ७ वर्षांनीं **मास्को** येथें जो लोकोत्तर, भव्य, व पांडवांच्या मयसभेप्रमाणें कौशल्ययुक्त बर्फाचा वाडा उभारला गेला, व अद्याप जो जगांतील एक अपूर्व चमत्कार होऊन बसला आहे, त्यापुढें **नेवा** अगदीं फिकें पडून गेलें.

सन १७४१ मध्यें सर्व **युरोप**भर हिंवाळा इतका कांहीं कडक पडला होता कीं, हजारों पशुपक्षी गतप्राण झाले! जलाशयावर पाण्याच्या वड्या तरंगूं लागल्या!!! अशा हिंवाळ्यांत एके दिवशीं **रशिया**च्या दरबारांतील एका गमती मनुष्यानें आपल्या मुलासाठीं एक बर्फाचें घरकूल तयार केलें होतें. व तें पाहण्यास लोकांची बरीच गर्दी उडाली! आणि ती गोष्ट कर्णोपकर्णीं होतां होतां, कित्येकांनीं ती **आन** राणीच्याही कानावर घातली. व तें चिमुकलें घर दिसण्यांत मोठें सुंदर दिसतें असें वर्णनही केलें. राणीच्या समोर वर्णना चालली आहे, तोंच एकानें कल्पना काढली कीं, येवढेंसें घरकूल केलें आहे, तें इतकें सुंदर दिसतें, मग बर्फाचा एक टोलेजंग राजवाडा बांधला, तर तो किती रमणीय दिसेल बरें!! ही कल्पना पुष्कळ लोकांस रुचली; आणि तत्काल कित्येकांनीं राजवाडा बांधण्याविषयीं शिफारसही केली. स्त्रियांचा स्वभाव जात्याच मोठा उत्सुक, आणि हौशी; आणि **आन** राणी तर सार्वभौम! मग काय विचारावें? तिनें तेव्हांच रुकार दिला. तितक्यांत आणखी एक कल्पना निघाली कीं, ह्यास कांहीं तरी निमित्य असावें. राजदरबारांतील मंडळीस कल्पनेची कांहीं उणीव पडावयाचीच नाहीं! त्यांत खुषमस्करे तर काय एका पायावर उभे. राजाभोंवतीं थट्टा करणारांचीही उणीव नसते, व करून घेणाराचीही पण उणीव नसते. ह्या दरबारांत **प्रिन्स ग्यालिझिन** ह्मणून एक राक्षश्री होते. ही थट्टा करून घेणारी मूर्ति असे. ह्या स्वारीचें एका शेतकऱ्याच्या पोरीशीं लग्न लावावें आणि ह्या जोड्याची त्या नव्या बर्फाच्या रंगमहालांत एक रात्र एक शय्या करावी, असा ठराव झाला. आणि लगेच वाङ्निश्चय वगैरे होऊन मुहूर्तही ठरला! राजेलोकांच्या चैनी!! आमचे हिकडे कोणी खबुतरांचीं लग्नें लाविलीं! वऱ्हाडी जमविले! त्यांच्या पायांतून सोन्याचे अलंकार घातले! हत्तीचीं दत्तविधानें केलीं. त्याच मासल्याचा हा एक प्रकार होय.

असो; वरील निश्चय होतांच मग काय उशीर? सुटले हुकूम. लागली मंडळी तयारीला! बर्फाचे हवे तसे चिरे आणावयासाठीं कांहीं कामदार **नेवा**स रवाना केले. त्यांनीं तेथून कामास योग्य अशा तीन तीन फूट उंचीच्या निवडक निवडक बर्फाच्या शिळा आणल्या. सर्व

सामान तयार होतांच झपाट्यानें कामास सुरवात झाली. ह्मणच आहे कीं, "राजा बोले आणि जग हाले." राजसत्ता असल्यावर काय होणार नाहीं? हजारों मंडळी कामावर जुंपली. आणि हां हां ह्मणतांना अकटोविकट आणि अल्पायुषी इमारत दिली उठवून! भिंतींस चुन्याची वगैरे मुळींच गरज लागली नाहीं. त्यांनीं बर्फाचे चिरे एकास एक जोडावेत आणि त्या सांध्यावर पाणी ओतावें ह्मणजे त्या शिलांच्या थंडपणानें पाणी तेव्हांच गोठून जाऊन शिला चुन्यांत बसविल्याप्रमाणें घट्ट आंवळून बसत. महा कुशल पुरुष **अलेक्सिस डानियलो झाटिशच्यू** ह्यांस कामावर मुख्य नेमलें होतें.

ह्या राजवाड्याची लांबी ५० फूट, रुंदी १८ फूट, आणि उंची २१ फूट होती. हा वाडा एकमजलीच होता; त्यास कडीपाट वगैरे कांहीं नव्हतें. तुळया, गरादी, पाखाडी, कौलें, वगैरे सर्व बर्फाचींच असून त्यांस धुराडींही राखलीं होतीं. जाण्यायेण्याच्या प्रत्येक दरवाज्यावर अर्धवर्तुळाकृति कमानी करून, त्या रंगी वेलपत्तीनें फार सुशोभित केल्या होत्या. व महाद्वारावर मंगल पल्लव सोडले होते. राजवाड्याभोंवतीं एक बाग असून त्यास नकशीदार बर्फाच्या जाळीचें कंपाउंड घातलें होतें. ह्या कठड्यास ठिकठिकाणीं कळस कोरलेले असून चार बाजूंस उंच मनोरे केले होते. बागेंत उष्ण प्रदेशांत होणाऱ्या नानाप्रकारच्या फुलझाडांचे आणि फळझाडांचे ताटवे लावले होते. नारिंगाचीं झाडें खऱ्या नारिंगाच्या झाडांइतकींच उंच असून त्यांवर फळें व फुलें गजबलीं होतीं. आणि त्यांवर नानारंगांचे व चित्रविचित्र पिसाऱ्यांचे पक्षी बसविले होते. ते सर्व इतके हुबेहूब होते कीं, आतांच उडून भरारी मारतात कीं काय, असा भास होत असे. त्या पिसाऱ्यांवरून आणि राजवाड्यावरून जेव्हां तेजोमय लहरीच्या चमका मारीत, तेव्हां प्रेक्षकांस आपण एखाद्या इंद्रभुवनांतच आलों आहों कीं काय असा भास होई. आणि निरखून पाहिलें ह्मणजे खात्री होई, कीं हें सर्व बनावट आहे. वर्ण, सौंदर्य, आकारसाम्यता, ही केवळ कारागिरांची कुशलता होय. बाकी सर्व झाडें, फुलें, फळें, पक्षी, वगैरे स्फटिकमय बर्फाचेच कोरून तयार केलेले होते.

समोरून या राजवाड्याकडे पाहिलें तर, त्यावर पडलेल्या किरण-

परावर्तनाच्या योगानें, ही इमारत तेजस्वी हिऱ्याचीच बांधली आहे असें वाटे. मुख्य दरवाज्यांतून आंत गेलें ह्मणजे, एक सुंदर मेहेरप लागे. तीवर नानाप्रकारचीं कमळें कोरलेलीं होतीं. दरवाज्याच्या आंतील दोहीं बाजूंस तीन तीन खिडक्या होत्या. त्या खिडक्यांच्या चौकटी बर्फाच्याच असून, त्यांस असा कांहीं मजेचा रंग दिला होता कीं, त्या चौकटी संगमरवरी दगडाच्या आहेत असें वाटे. आंतील पातळ फळ्या अशा पारदर्शक होत्या कीं, तीं भिंगें आहेत असा बरोबर भास होई. प्रत्येक खिडकीच्या समोर एक एक सज्ज केलेली तोफ गाडीवर ठेविली होती. ही गाडी; तिचीं चक्रें, तोफ वगैरे सर्व बर्फाचेंच. **मार्टर** ह्मणून एका प्रकारची तोफ रशियांत करतात, आणि तींतून सन्मानार्थ गोळे सोडण्याची चाल आहे. असल्या ऐशीं ऐशीं रतलांच्या दोन **मार्टर** दरवाज्याच्या तोंडाशींच डालफिन् नांवाच्या मत्स्यावर ठेवल्या होत्या. ह्याशिवाय आणखी कित्येक लहान लहान तोफा, कासव, सुसरी, इत्यादिकांच्या पाठीवर ठेवल्या होत्या. दरवाज्याच्या अमळ पुढें बागेंत दोन लहानसे मनोरे केले होते. त्यांची उंची वाड्याच्या आढ्याबरोबर होती. हे मनोरे आंत प्रवेश करणारास प्रथमच दिसून फार मनोहर वाटत. वाड्याच्या डाव्या बाजूस एक हत्ती होता, त्याची आकृती खऱ्या हत्तीएवढीच असून त्यावर पार्शी पोषाख केलेला एक राऊत बसविला होता. आणि दोन हत्यारबंद मनुष्य उभे केले होते.

हा वाड्याचा बाह्य देखावा झाला. ह्यांत प्रत्येक वस्तु बर्फाची होती, हें वर सांगितलेंच आहे. रंग मात्र निराळा. आतां आंतील देखावा पाहूं या.

वाड्याच्या आंत प्रवेश केला ह्मणजे दोन विस्तीर्ण दिवाणखाने लागत. आणि त्यांत नानाप्रकारचें अपूर्व सामान अशा ठाकठिकेनें आणि व्यवस्थेनें ठेवलेलें असे कीं, तें पाहून पाहाणाराचें मन केवळ चक्क होऊन जाई. आणि चतुराई ही, कीं सर्व सामान बर्फाचें. बर्फावांचून दुसरी गोष्ट नाहीं.

टेबलें, खुर्च्या, पुतळे, आरसे, मेणबत्त्यांचे स्ट्यान्ड, सतरंजा, गालीचे, शेगड्या, ( ज्यांत बर्फाचींच रंगविलेलीं लांकडे घातलीं होतीं, ) हे पदार्थ सदरेवर होते. ह्या सर्व वस्तु बर्फाच्याच असून त्यांवर असा कांहीं

मजेचा रंग दिला होता कीं, हुबेहुब तेच पदार्थ आहेत असें वाटे. ताटें, वाट्या, चहाचे पेले, बशा इत्यादि पदार्थ भोजनगृहांत होते. शय्यास्थानचा थाट तर याहीपेक्षां बहारीचा होता. तेथें नकशीदार उत्तम छप्परपलंग; त्यावर पत्र्याची कोरलेली जाळी; त्यावर बिछाना, आरसा, गादी, उशी; पायांशीं एक सफेत दुलई; दोन जोडे, आणि रात्रौ घालावयाच्या दोन टोप्या. आणि सर्वांत आश्चर्य हें कीं, हे सर्व यच्चयावत पदार्थ बर्फाचे!! अहाहा! "विस्तीर्णा पृथिवी जनोपि विविधः किं किं न संभाव्यते!" हें कवीचें वाक्य किती अक्षरशः खरें आहे बरें? असो. हा रंगमहाल ह्मणजे **प्रिन्स ग्यालिझन** आणि त्यांचें प्रियपात्र यांचें क्रीडाभुवन होय हें सांगणें नकोच. आतां ह्या वैभवाचा उपभोग वरील थट्टेबाज मूर्तीनें घेतला किंवा नाहीं हा प्रश्न वेगळा.

सर्व काम पुरें होतांच, हें अत्यंत आश्चर्यकारक कौशल्यालय पाहण्यास चक्रवर्तिनी व सारें दरबार, आलें. चक्रवर्तिनीचें पाऊल **हिमागारांत** पडतांच, सलामीचा मोठा थाट उडाला, तो फारच प्रेक्षणीय होता. बर्फाच्या बंदुकांची सरबत्ती झाली! तोफांतून दोन कुलपीगोळे सोडले गेले. **मारटरनीं** हजारों गोळ्यांचा वर्षाव केला. हत्ती सहस्रधारी कारंजांप्रमाणें सोंडेंतून फवारे सोडूं लागला! दरबार आंत शिरलें त्या वेळेस, सर्वांच्या पोषाखावर चित्रविचित्र रंगांचा प्रकाश पडल्यामुळें सर्वांचे पोषाख हिरेमाणकांनीं मढविलेले आहेत कीं काय, असा भास झाला. त्या वेळीं सर्वांची वृत्ति अशी झाली कीं, आपण कांहीं मृत्युलोकीं नाहीं; तर इंद्राच्या अमरपुरींतच आहों. नंतर तेथें त्यांनीं त्या बर्फाच्या बंदुकांतून पावरत्तल दारू घालून, दोन दोन इंचीच्या खऱ्या गोळ्या सोडून पाहिल्या. त्या साठ फूट पल्ल्यावर जाऊन पडल्या. याप्रमाणें राणीसाहेब लवाजम्यानिशीं येऊन दिवसा पाहून गेल्या. नंतर रात्रौ रोषनाईची आरास पाहण्यासाठीं स्वारी पुन्हा परत आली.

रोषनाईचा थाटही वरप्रमाणेंच वर्णनीय होता. रोषनाईस सर्व नखतेलच वापरलें होतें. **डालफिन**च्या तोंडांतून झगझगीत तेजाचे झोत सुटले होते. आणि हत्ती आपल्या सोंडेंतून नळ्याच्या फुलांप्रमाणें फुलें उडवीत होता. हंड्या, झुंबरें, वालशेटें वगैरे सर्व बर्फाचींच असून फार तेजस्वी दिसत. मेणबत्त्या पोकळ करून त्यांत नखतेल भरलें

होतें. त्या सर्वांचा देदीप्यमान प्रकाश, आणि त्याचें परावर्तन, ह्याचा एकदांच जेव्हां झगझगाट झाला, तेव्हां सर्वांस असें झालें कीं कीं, आपण सूर्यबिंबांतच आहों कीं, काय? हें सर्व वैभव ह्मणजे अळवावरचें पाणी होतें हें सांगणें नकोच! सर्व श्रमाचें विसर्जन जरी त्याच दिवशीं व्हावयास प्रारंभ झाला, तरी तो सबंध वाडा मार्च अखेरपर्यंत कांहीं वितळला नव्हता.

ह्या वाड्यानंतर रशियांत बर्फाच्या इमारतीचें खूळ बरेंच माजलें होतें. पण त्यांत सांगण्यासारखी एकही निपजली नाहीं. ही गोष्ट कानड्यासारख्या देशांत, ह्मणजे जेथें बर्फाचे डोंगरच्या डोंगर असतात, अशा ठिकाणीं कांहीं अद्भुत नव्हे हें खरें, तरी ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, कीं त्या उपरांत कितीही कलाकौशल्य वाढलें तरी त्याहून मोठी तर राहो, पण तेवढी देखील अस्थीर द्रव्याची अजस्त्र इमारत कोणत्याही देशांत उभारली गेली नाहीं!! आणि ह्मणूनच मास्को येथील बर्फाच्या वाड्याची गणना सृष्टींतील एका लोकोत्तर चमत्यारांत केली आहे.

मनुष्य जों जों सुधारतो, तों तों त्यास आपले श्रम होतील तितके वांचवावेत असें वाटतें. आणि मनुष्य जों जों श्रम वांचवितो तों तों असलीं लोकोत्तर कामें त्याच्या हातून होत नाहींत. तो आपले श्रम शोभादायक कृत्याकडे मुळींच खर्च न करितां, खऱ्या आणि लोकोपयोगी कामाकडे लावतो. हल्लींच्या सुधारणेंत **पिरामिड, हिमागार, ताजमहाल, कोरीव लेणीं** इत्यादि प्राचीन क्षत्रियवीरांच्या आणि बादशहांच्या कारागिरीसारख्या इमारतींच्या नांवानें तर पूज्यच! ह्यापुढें असलीं कामें उदयास यावयाचीं नाहींत. **मास्को** येथील बर्फाच्या वाड्याच्यावेळेस **रशिया युरोपा**मध्यें नुकताच उदयास येत होता. त्यानंतर त्याच्या वैभवास चढती कळा लागली. व सांप्रत त्याचा भरभराट कसा आहे तो आपण पाहातों आहोंच.

## (६) चित्तविभ्रम.

"**चित्तविभ्रम**" हा एक विलक्षण प्रकारचा रोग आहे. हा म-

नाच्या तरंगापासून उत्पन्न होतो. आणि एखाद्या मनुष्यास अतर्क्य आश्चर्यांत गुंग करून टाकतो. अशा लोकांच्या खिन्न आणि उदासीन मुद्रेवरून कल्पना करतां येते कीं, कोणत्या एखाद्या औषधोपचारानें, किंवा तंत्रोपचारानें तो बरा व्हावा. आणि त्याप्रमाणें कित्येकांत यशही पण आलेलें आहे. डाक्टर **वाट्ठ** ह्मणतो, "कित्येक वैद्य लोकांस अशा भ्रमाचे रोगी आढळलेले आहेत, त्यांस असें वाटे कीं, आपण कांचेचे आहोंत! मला एकदां एक रोगी भेटला, त्याच्या मनानें असें घेतलें होतें, कीं आपला देह मातीचा आहे. ह्या रोगापासून दुसऱ्यास कांहीं इजा नव्हती, व त्याच्या अवयवासही इजा नव्हती हें खरें; पण त्याच्या मनास फारच दुःख होई. ह्याकरितां त्याची कांहीं तरी चिकित्सा करून उपायाची योजना करावी ह्मणून एका मोठ्या बड्या गृहस्थानें मला बोलावणें पाठविलें होतें. घडी, बंधन, प्लयास्टर हीं मारून पाहिलीं, आणि त्यानें तो बराही झाला, पण औषधोपचारानें तो खूष व्हावा, तसा खूष न होतां, उलट दाष्ट, भांडखोर, आणि किरकिऱ्या निपजला. अखेर त्याच्या गड्यानें सांगितलें माझ्या धन्याच्या अंतःकरणांत असें भरलें आहे कीं, आपण मातीचें भांडें आहों." **वाटस्** ह्या नांवाचा एक प्रख्यात डाक्टर होता, तो शरीरानेंही लहानसरच होता. तरी मरण्याच्यापूर्वी थोडे दिवस त्यास असा भ्रम पडला होता कीं, आपलें शरीर बाहेर जाण्यायेवढा आपल्या घरास दरवाजाच नाहीं. डाक्टर **मिलेंजन** ह्यानें सांगितलें, माझ्याकडे एक रोगी आला होता. त्यास वाटे मी एक नाजूक कांचेचें भांडें आहें. आणि तो कशासही आपलें आंग लागूं देत नसे, व बसतही नसे. कारण त्यास असें वाटे, मला अंमळ धका लागला तर मी फुटून जाईन. दुसरा एक रोगी त्यानें पाहिला, त्यास असें वाटे, कीं, आपली कवटी रिकामी आहे, तींत मेंदू वगैरे कांहीं नाहीं. दुसऱ्या ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं "एक अमेरिकन् विद्वान् गृहस्थ ज्यास **वेस्त इंदीज**च्या वसाहतींत न्यायाधीशाची जागा मिळाली होती, त्यास पुढें पुढें असें वाटूं लागलें कीं, आपण कूर्मरूपी झालों आहों" डाक्टर **वाल्डर स्टाइन,** गरिंजन येथील राहणारा ह्यानें आपल्या डायरींत, एका कुरूप विद्वानाची हकीगत लिहिली आहे. त्यास मनःकल्पित दुःखानेंच बेजार केलें होतें.

तो घडीघडीला आपणावर अरिष्ट कोसळलें आहे असें समजून तळमळत असे. एकदां चांगला शुद्धीवर असतांनाच, व तीन वेळ शिंकला असतांना आपणास शिंक येत नाहीं, असें समजून ही स्वारी रडत बसली होती ! ! दुसऱ्या वेळीं त्यास असें वाटलें कीं, आपल्या घरास आग लागली आहे. आणि त्याच्या ठिणग्या आपल्या आंगावर पडून आपलें आंग होरपळत आहे. हा सर्व माझ्या मनाचाच खेळ आहे, असें त्यास समजत होतें तरी, त्यानें आगीची घंटा वाजवून लोक गोळा केले. आणि भयानें ओरडाओरड ही केली. ह्या स्वारीस एकदां स्वप्न पडलें कीं, आपण जिवंतच जळतों आहों, आणि त्यामुळें त्यास आपण मृत्यूच्या अगदीं जवळ येऊन ठेपलों इतकें भय वाटलें. डाक्टर **रश** ह्याच्या रेकार्डास एक खटला आहे, त्यांत एका मनुष्यास असें वाटत असे कीं, **आफ्रिकें**तील एक **काफर** आपल्या पोटांत शिरला आहे. आणि त्यामुळें आपल्यास तीव्र वेदना होतात. ह्याचें कारण एक भयंकर **काफर** त्यानें **केप आफ गुडहोप** येथें पाहिलेला होता. **पिनेल** ह्मणतो कीं, एका खटल्यांत एका फ्रेंच मनुष्यास असें वाटे कीं, आपलें पहिलें डोकें उडविलें, व आतांचें हें दुसऱ्याचें लावलेलें आहे. त्यास हाच भ्रम नेहमीं होता !


**इक्किरल** ह्मणतो कित्येक तरुण पुरुषांस आपण बायका आहोंत असेंच वाटतें. अशा पुरुषांपैकीं एकानें स्त्रीचा पार्ट एका **थियेटरांत** उत्तम करून दाखविला. आणि तो कधींही बायकांशिवाय दुसरा पोषाख करीत नसे. डाक्टर **कोनोली** ह्मणतो कीं, एकास असें वाटत होतें कीं आपणास फांशीं देऊन टाकलें होतें. आणि बाकी जो थोडासा जीव उरला आहे; तो विजेच्या शक्तीनें उरलेला आहे. आणि त्याची इच्छा अशी होती कीं, पूर्ववत् आपण पूर्ण जीवंत व्हावें; **जावूवी** ह्मणतो **वर्चवर्ग** येथें एक चळ लागलेला मनुष्य होता, त्यास असें वाटे कीं, आपल्या पोटांत कोणी एक मनुष्य असून तो आपणाशीं बोलत आहे. आणि त्याच विवंचनेंत तो नेहमीं असे. त्यास एकदां बरा होण्यासाठीं उपाय केला होता. तो असा कीं, त्याच्या पोटास एक पलिस्तर मारून त्यांतून तो मनुष्य काढला असें ढोंग केलें होतें ! त्या वेळेस त्यास प्रसूती झाल्याप्रमाणें हलकें वाटून बहुत संतोष झाला. आणि त्याप्रमाणें

तो खरोखरच कांहीं दिवस बराही झाला होता. पण थोडे दिवस गेल्यावर फिरून तो भ्रम त्यास उद्भवला. आणि पुन्हा विपळाप करून तो लोकांस सांगूं लागला कीं, माझ्या पोटांत फिरून दुसरा मनुष्य येऊन बसला आहे. व तो पूर्वींप्रमाणेंच बोलतो! चौदाव्या **लुइस** राजाच्या दरबारांतील एका सरदाराची हकीकत सरकारी दप्तरांत कांहीं विचित्रच आढळते. ती अशी कीं, त्या सरदाराचा ग्रह आपण कुत्रें आहों असा झाला होता; आणि त्याप्रमाणें हे राजश्री एका खिडकींत बसून जाणाऱ्या येणाऱ्यांच्या आंगावर भुंकत असत!! डाक्टर **कामेट**नें सांगितलें आहे कीं जर्मनींतील मठांत संन्याशांस आमचीं शरीरें मांजराचीं झालीं आहेत असा भ्रम झाला होता. ते सर्व घरांभोंवतीं म्यांव म्यांव करीत हिंडत! मांजरासारखे खाजवीत बसत! नाहीं तर एकमेकांस ओरबाडे घेत! किंवा हातावर थुंकी घेऊन तोंड साफ करीत!! **बोरहाव्ह** यानें लिहिलेली गोष्ट याहीपेक्षां चमत्कारिक आहे. तो ह्मणतो एका मनुष्यास वाटत असे कीं आपले पाय गवताचे आहेत, पण कोठपर्यंत? तर त्याचा चाकर झाडतांना त्यास केरसुणीचा एक रट्टा त्याच्या गुडघ्यावर मारीपर्यंत!!!

मराठी ग्रंथ संग्रहालय.

# (७) जलबिंदूंतील

## चर्मचक्षूंस अगम्य असे सूक्ष्म प्राणी.



गगनाचा चांदवा ॥ कोणें काढिला केधवां ॥
पवन हिंडत असावा ॥ हें कवणाचें मत ॥ १ ॥
रोमा कवण पेरी ॥ सिंधू कवण भरी ॥
पर्जन्याच्या करी ॥ धारा कवण ॥ २ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय–२.

मनुष्य ही एक परमेश्वराची प्रतिमाच आहे. त्यानें आपल्या ज्ञानाच्या बळावर वैभवाची सत्ता इतकी कांहीं वाढविली आहे, कीं वरील सिद्धांताचें यथार्थत्व मनांत आल्यावांचून राहतच नाहीं. परमेश्वरानें प्रत्येक प्राण्याचा अवयव यदृच्छेप्रमाणें हालण्यासाठीं सांधे केले आहेत. मनुष्यानें त्याच धोरणावर बिजागऱ्या केल्या आहेत! इतर प्राण्यांस ईश्वरनिर्मित भक्ष्य–खारट, तुरट, आंबट, गोड,—असतील तसे खावे लागतात. मनुष्य यथारुची तयार करून घेतो. मनुष्यास आकाशांत संचार

करण्यास ईश्वरनिर्मित पंख नाहींत. पण तो "विमान" ह्मणून एक वेगळेंच कृतीचें कुयाडें करून आकाशांतील हवा पाहून येतो. मनुष्य जन्मतः अशस्त्र आहे. ह्मणजे त्यास शिंगें नाहींत; सुळे नाहींत; तीव्र नखें नाहींत. किंवा विषाचा कांटाही नाहीं. पण केवळ बुद्धिवैभवानें त्यानें सिंहावर सुद्धां आपला पगडा बसविला आहे!! दुसऱ्या प्राण्यास आंगावर धांवून जाऊन शत्रूस मारावें लागतें. पण मनुष्यानें कोठें तरी आड बसून उगाच "फुट" केलें, कीं पुरे. कसलाही बलवत्तर प्राणी असला तरी तत्काळ गतप्राण होऊन पडतो!! यास ईश्वरनिर्मित चपलता नाहीं. पण हजारों कोसांवरचे फेरफार तो एका क्षणांत करतो. याच्या देहाची रचना पाण्यावर तरण्यास शक्त नाहीं. पण कांहीं तरी कुयाडें रचून तो राजाप्रमाणें दिवाणखान्यांत बसून समुद्राच्या समुद्र पार होतो.

एकंदरींत मनुष्य आपणास कमी कष्ट पडून अधिक सौख्य कोणत्या उपायानें होईल, ते ते उपाय योजण्यास तो सदा तयार असतो. पायांचे श्रम वांचावेत ह्मणून आगगाडी केली. हातांचे श्रम वांचवावयासाठीं गिरण्या केल्या; डोळ्यांची शक्ति वाढविण्या साठीं दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र इत्यादि साधनें केलीं. या यंत्राच्या योगानें मनुष्याच्या शक्तीच्या लाखोंपट काम एका क्षणांत उरकावयास लागलें. व मनुष्याच्या शक्तिसामर्थ्या पलीकडचे कितीएक चमत्कार दृष्टीगोचर होऊन सृष्टिकर्त्याचें अनुपम चातुर्य अधिक व्यक्त होऊन त्याच्याविषयीं अंतःकरणांत अधिक पूज्यता वाढत चालली.

आज सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसणारे कांहीं चमत्कार सांगावयाचे आहेत. ज्या ठिकाणीं आपल्या चर्मचक्षूंस कोणताही प्राणी किंवा वनस्पति आहे असा भास सुद्धां होत नाहीं, तेथें सूक्ष्मदर्शक यंत्रानें हजारों प्राणी आणि हजारों वनस्पति दृष्टीस पडून मोठा चमत्कार वाटतो आणि मन अगदीं थक्क होऊन जातें!! सूक्ष्मदर्शक यंत्र ह्मणजे एक लहानशा दुर्बिणींतून दूरचा पदार्थ स्पष्ट दिसतो, आणि सूक्ष्मदर्शक यंत्रांतून जवळचा अतिसूक्ष्म पदार्थ सहस्रपटीनें मोठा व स्पष्ट दिसतो. व केवळ नेत्रांस न दिसणारे हजारों चमत्कार नवेच दृष्टीस पडतात. एका लहान घडवंचीवर एक पितळेच्या नळीखालीं अगदीं लहान

भिंग, व वरती अंमळ मोठें भिंग, बसविलेली एक नळी असते व तिच्या खालीं एक तिरपी हालवतां येईल अशी कांचेची वर्तुळ लहानशी तबकडी असते. तिच्यावर कोणताही एक रजःकण ठेवावा आणि वरून नळीच्या द्वारें त्याकडे पहावें. ह्मणजे नानाविध चमत्कार दृष्टिगोचर होतात.

तांब्याच्या भांड्यावर एखादा ताकाचा किंवा दह्याचा थेंब पडला, तर कांहीं वेळानें तो हिरवाचार दिसूं लागतो. हा चमत्कार सर्वांच्या अनुभवास आहे. परंतु ताक पांढरें होतें, त्याचा रंग हिरवा झाला, एवढेंच काय तें आपणांस कळतें, ह्यापेक्षां अधिक ज्ञान कांहींच होत नाहीं. पण तोच सूक्ष्मदर्शक यंत्रांत घालून पहा !! ह्मणजे तो हिरवा रंग नसून त्या नानाविध वनस्पति आहेत असें दिसेल !! पर्जन्य पडला ह्मणजे परसांत जसें गवत, हरळी, वगैरे वनस्पति उगवून जंगल माजतें, तसें हें ताम्रपात्रावर जंगल उगवलें आहे असें स्पष्ट दिसतें. पानें, फुलें, गोंडे सुद्धां त्यांत दृष्टिगोचर होतात, पानांची हालचाल सुद्धां दृष्टीस पडते !! तसेंच त्यांत एक दुधाचा थेंब घालून पाहिलें, तर त्यांत अनेक मांसाचे गोळे दृष्टीस पडतात !! रक्ताचा बिंदू घालून पाहिलें तर हें कोणत्या प्राण्याचें रक्त आहे, तें ओळखतां येतें. प्रत्येक रक्तबिंदूंत एक प्रकारची नकशी असते. मनुष्याच्या रक्तांत अंडाकार पूज्यें असतात ! व इतर प्राण्यांच्या रक्तांत बहुतकरून वर्तुळ पूज्यें असतात, कोठें खून वगैरे झाला, आणि त्या खटल्यांत रक्ताच्या डागाचीं वस्त्रें वगैरे मिळालीं तर तीं डाक्टरलोकांकडे तपासावयास जातात. तेव्हां त्यांतील एक बिंदु काढून सूक्ष्मदर्शक यंत्रांत घातला, ह्मणजे हा मनुष्याच्या रक्ताचा आहे, का इतर प्राण्याच्या रक्ताचा आहे, हें डाक्टरास सहज ओळखतां येतें.

परमेश्वरकृतींत आणि मनुष्यकृतींत किती तफावत आहे, हेंही सूक्ष्मदर्शक यंत्रानें तेव्हांच कळून येतें. टांचणीचें किंवा सुईचें टोंक, उत्तम पालिस केलेला कागदाचा तुकडा, उत्तम सफाईदार कांचेचा तुकडा, उत्तम चाकूचें पातें, इत्यादि जिन्नस सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिले, तर त्यावर मोठमोठाल्या खिंडी व खांच खळगे दृष्टीस पडतात. कितीही सफाईनें रंगविलेलें किंवा वारनीस दिलेलें चित्र असलें, तरी त्यावर रंगाचें सा-

रवण घातल्यासारखें दिसतें. व ठिकठिकाणीं रंगाचे लपकेच्या लपके राहिलेले स्पष्ट दिसतात. तेंच माशीचे पंख, मधमाशीची नांगी गुलाबाचा कांटा, हे पदार्थ पाहिले, तर ते भारी सफाईदार उत्तमोत्तम नकशीनें सुशोभित दिसतात!! यावरून उघडच आहे, कीं परमेश्वरकृतीपुढें मनुष्यकृति केवळ तुच्छ होय.

नदी, तलाव, विहिरी, इत्यादिकांचें पाणी जें आपण स्वच्छ ह्मणून प्राशन करतों, त्याचा एक बिंदू घेऊन सूक्ष्मदर्शक यंत्रांत ठेवला, आणि पाहिलें तर तो केवढा दिसतो, व त्यांत काय काय चमत्कार दृष्टीस पडतात, त्याचें चित्र वर दिलें आहे, वरचें मोठें वर्तुळ, एका सुईच्या अग्रानें ठेवलेल्या जलबिंदूचें सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसणारें स्वरूप आहे जें पाणी स्वच्छ ह्मणून आपण पितों, व ज्यांत कांहींएक असण्याचा संभव सुद्धां वाटत नाहीं, त्यांतील एका बिंदूंत जगडव्याळ प्राणी किती आहेत तें पहा! खेंकडे, कांसव, सर्प, सर्व कांहीं आहे! हे एका बिंदूंतीलच जीव पाहून आपणास काय बरें वाटावें!! ह्या चित्रांत मोठमोठाले प्राणी मात्र दाखविले आहेत. ह्यांशिवाय सूक्ष्म प्राणी तर असंख्य आहेत. कोणी एका शोधक गृहस्थानें असें अनुमान काढलें आहे कीं, ते एका बिंदूंत पन्नास कोटी भरतील!!! केवढी संख्या ही!! सर्व पृथ्वीवर एक अब्ज मनुष्यें आहेत आणि तितके प्राणी अवघ्या दोन बिंदूंत समाविष्ट होतात!! हें सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दृष्टिगोचर होणाऱ्या जीवांविषयीं झालें, ह्याशिवाय सूक्ष्मयंत्रांतूनही न दिसणारे असे अत्यंत सूक्ष्म जीव किती असतील कोण जाणे? अनंत असतील ह्यांत संशय नाहीं.

प्राणिशास्त्रवेत्यांनीं ह्या सूक्ष्मजंतूंचे त्यांच्या त्यांच्या गुणधर्माप्रमाणें वर्ग बांधले आहेत. एका वर्गास "**अनेकोदरी**" असें नांव आहे. असें नांव देण्याचें कारण त्यांस पोटें ह्मणजे पक्काशय अनेक आहेत, ह्मणजे साधारण प्राण्यास अन्न सांठविण्यास एक पिशवी असते, आणि ह्या प्राण्यांस अनेक असतात! ह्या पिशव्यांचा शोध एका मनुष्यानें मोठ्या चातुर्यानें लावला. त्यानें कांहीं प्राणी एका बिंदूंतून काढून अतिशय स्वच्छ पाण्यांत—ह्मणजे वाफेपासून तयार केलेल्या पाण्यांत—सोडले. आणि नंतर त्यांत एक निळेचा रजःकण टाकला. तेव्हां ते

प्राणी खाऊं लागले. व ते निळीचे रजःकण त्यांच्या त्या पारदर्शक चामडींतून नीलवर्णानें चमकूं लागले. आणि त्यांचे ते अनेक पक्काशय सहज समजण्यांत आले. ह्या वर्गांतील जे अतिसूक्ष्म प्राणी आहेत त्यांस "मोनाद" अशी संज्ञा आहे. हे इतके सूक्ष्म असतात, कीं त्यांचे अवयव सूक्ष्मदर्शक यंत्रांतून सुद्धां दृष्टिगोचर होत नाहींत. फक्त बिंदुमात्र ह्मणजे अणुरेणुवत् दिसतात; पण ते इतके चपळ असतात, कीं त्यांस निमेषमात्र विश्रांति ह्मणून नाहीं!!

दुसऱ्या जातीच्या प्राण्यांचा एक वर्ग केलेला आहे. त्याचें नांव "चक्रधारी." हें नांव पडण्याचें कारण त्यांच्या मस्तकावर पुढें आलेला एक अवयव असतो. त्याचा आकार वर्तुळ असून तो सर्वकाळ गिरणीच्या चक्रासारखा गर गर गर फिरत असतो. खरें ह्मटलें तर तें चक्र कांहीं फिरत नाहीं; तर त्याच्या भोंवती जे केसासारखे बारीक बारीक अवयव असतात त्यांचें चलन चालू असतें. आणि तेणेंकरून तो आपल्या उपजीवनाकरितां सूक्ष्म प्राणी धरतो. हे चक्रधरप्राणी निरनिराळ्या आकाराचे असतात. कित्येक सापासारखे असतात; कित्येक झाडाच्या फांद्यांसारखे असतात; कित्येक छत्रीसारखे असतात; त्यांपैकीं कित्येकांच्या पाठीवर गोगलगाईप्रमाणें शंख असतो, तो फार सुंदर दिसतो! हे सूक्ष्म जीव पाण्यांतील विकारी पदार्थ सर्व खाऊन टाकतात; आणि मग तें निर्दोष पाणी मनुष्यमात्रास पिण्यास योग्य होतें.

ह्या एका जलबिंदूंत मोठमोठाले भयंकर कित्येक प्राणी सैरावैरा फिरत आहेत असे दिसतात, जणो, पासिफिक महासागरांतच नक्र, सुसरी, झोंबी खेळत आहेत, इतके भयंकर दिसतात!! कोणास तीव्र नखें असतात; कोणास नक्राप्रमाणें दांत असतात; कोणास सापाप्रमाणें शेंपूट असतें; कोणी दुसऱ्या प्राण्याच्या पाठीस लागलेले असतात; कोणी लहानास मांजरानें उंदरास-फाडल्याप्रमाणें फाडून टाकीत असतात. ह्या प्राण्यांत—एक चमत्कार मोठा आहे, तो असा कीं, एका प्राण्याचे बलिष्ठ प्राण्यानें फाडून दोन तुकडे केले, तर तो फाटलेला किंवा तुटलेला प्राणी मरत नाहीं!! तर दोन्ही तुकडे सजीव प्राण्याप्रमाणें दोन्हीकडे दोन निघून जातात!!!

ह्याप्रमाणें विलक्षण चमत्कार पाहतांच परमेश्वराच्या अगाध सा-

मर्थ्याचें परम आश्चर्य वाटतें ! असें प्रत्येक कृतींत त्याचें चातुर्य आढळून आल्यावरून मोरोपंतांनीं ह्मटलें आहेः—

"अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बा हे विधी
श्रुतिज्ञहि ह्मणे सदा स्तविल आमुची केविं धी ?"

## (८) तार बातमी.

हिंदुस्थानांत प्रथमच तारायंत्र सुरू झालें, त्यावेळीं लोकांस फार आश्चर्य वाटत असे. जुन्या व भोळसर लोकांच्या कल्पना तर कांहीं पुसूंच नये. कोणी ह्मणत लाखोट्याची सुरळी करून ती तारेंत टाकतात ह्मणजे ती विवक्षित ठिकाणीं जाते. कोणी ह्मणत एक बावलें आहे, तें तारेवर बसून जातें ! ! अशा नानाप्रकारच्या कल्पना चालतात. परंतु सांप्रत तें सर्व अज्ञान नाहींसें होऊन तारायंत्राची पूर्ण माहिती असलेले लोक शेकडों आहेत.

तारायंत्रांत मुख्य काम करणारी वीज होय. ही रासायनिक क्रियेनें उत्पन्न करतात. तार ही विद्युद्वाहक आहे. बोटास टोंचलें असतां धमन्यांच्या योगानें जसें मस्तकास समजतें, तसें तारेच्या एका टोकास स्पर्श केला कीं, विद्युद्वेगानें लगेच दुसऱ्या टोकास समजतें ! मग तीं टोकें परस्परांपासून कितीही लांबीवर असोत ! स्पर्श समजतो इतकेंच नाहीं, पण जसा धातूचा ध्वनि काढावा तसा तो दुसरीकडे निघतो. ह्याच तत्त्वावर सर्व तारायंत्र चालतें. तार-आफिसांत एक घड्याळासारखें यंत्र असतें. त्यांत तार आणून सांधून ठेवतात. बाहेरच्या बाजूस एक मूठ असते तीपासून दोन शब्द उत्पन्न होतात. एक ऱ्हस्व आणि एक दीर्घ. मूठ हलके हलविली ह्मणजे, ऱ्हस्वस्वर उत्पन्न होतो. व मूठ अंमळ जोरानें हलविली ह्मणजे दीर्घस्वर उत्पन्न होतो. ऱ्हस्व स्वराचा उच्चार "टक्" असा होतो. व दीर्घ स्वराच्या उच्चार "टक्क" असा होतो. सारें तारेचें बस्तान ह्या दोनच शब्दांवर आहे. केव्हांही पहा तारेंतून "टक् टक्. टक्क टक्क टक्क." असे दोनच उच्चार होत असतात. तार नेहमीं इंग्रजी लिपींतून घालतात. इंग्रजी मूळ अक्षरें अवघीं २६ सच

आहेत. त्यांस कान्हा, मात्रा, वेलांटी इत्यादि चिन्हांची व जोडाक्षरांची कांहीं एक खटखट नाहीं. ह्या सव्वीस अक्षरांच्या खुणा येणेंप्रमाणें ठरविल्या आहेत:—

खालीं लिहिलेल्या खुणांत ऱ्हस्वस्वर—ह्मणजे " टक् "—बद्दल पूज्य समजावें. व दीर्घ स्वराबद्दल—ह्मणजे " टक " बद्दल—रेषा समजावी.

ह्या खुणा चांगल्या पाठ करून ध्वनि ओळखण्याचा अभ्यास केल्यास कोणतीही बातमी समजण्यास नड पडणार नाहीं.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| A. | (ए.) | ०— | N. | (एन्.) | —० |
| B. | (बी.) | —० ० ० | O. | (ओ.) | — — — |
| C. | (सी.) | —०—० | P. | (पी.) | ०— —० |
| D. | (डी.) | —० ० | Q. | (क्यू.) | — —०— |
| E. | (ई.) | ० | R. | (आर्.) | ०—० |
| F. | (एफ्.) | ० ०—० | S. | (एस्.) | ० ० ० |
| G. | (जी.) | — —० | T. | (टी.) | — |
| H. | (एच्.) | ० ० ० ० | U. | (यू.) | ० ०— |
| I. | (आय्.) | ० ० | V. | (व्ही.) | ० ० ०— |
| J. | (जे.) | ० — — — | W. | (डब्ल्यू.) | ० — — |
| K. | (के.) | —०— | X. | (एक्स्.) | —० ०— |
| L. | (एल्.) | ०—० ० | Y. | (वाय्.) | —०— — |
| M. | (एम्.) | — — | Z. | (झेड्.) | — —० ० |

## जोडाक्षरें.

| | | |
|---|---|---|
| A. | (æ.) | ०—०— |
| O. | (œ.) | — — —० |
| U. | (ue.) | ० ०— — |
| ch. | | — — — — |

## उदाहरणार्थ.

**पुणें.** (Poona.)

ह्या शब्दाचे ध्वनि येणेंप्रमाणें ऐकूं येतील.

- टक् टक टक टक्; टक टक टक; टक टक टक; टक टक्; टक् टक.

**चमत्कार**—कधीं कधीं असें होतें कीं, मुंबईहून ज्या दिवशीं लं-

डनांत तार घालावी, त्याच्या आदल्या दिवशीं ती तेथें पोंचते. ह्मणजे मुंबईहून सोमवारीं घातल्यास रविवारीं लंडनास पोंचते. असें कसें घडतें तें खालीं सांगतों.

हें तर सर्वांस माहीतच आहे कीं पूर्व प्रदेशीं सूर्योदय व सूर्यास्त प्रथम होतो, व पश्चिम प्रदेशीं मागाहून होतो. पृथ्वीभोंवतीं सूर्याची प्रदक्षणा चोवीस तासांत होते. वर्तुळाचे अंश ३६०. तेव्हां सूर्य चोवीस तासांत ३६० अंश फिरतो. असा अर्थ. ह्मणजे १५ अंश जाण्यास सूर्यास एक तास लागतो. पृथ्वीचा परीघ सरासरी चोवीस हजार मैल आहे. त्याचे ३६० अंश—ह्मणजे भाग—केले, तर प्रत्येक अंश सरासरी ६९ मैलांचा होतो. तेव्हां पंधरा अंशांचे ठोकळ मानानें १००० मैल झाले. १५ अंश चालावयास सूर्यास एक तास लागतो, ह्मणजे तो एका तासांत १००० मैल चालतो असें झालें.

कलकत्ता मुंबईच्या पूर्वेस सुमारें १००० मैलांवर आहे. ह्या कारणानें कलकत्त्यास सूर्योदय होतो तेव्हां, ह्मणजे सकाळचे सहा वाजतां, मुंबईस पहांटेचे पांच वाजलेले असतात. ह्मणजे दोन घटका रात्र असते. तसेंच कलकत्त्यास सूर्यास्त होतो तेव्हां मुंबईस सायंकाळचे पांच वाजलेले असतात, ह्मणजे दोन घटका दिवस असतो. ह्याप्रमाणेंच सर्व पृथ्वीभर क्रम असतो. मुंबईहून लंडन सुमारें पांच हजार मैल पश्चिमेस आहे. तेव्हां त्यासही हाच नियम लागू आहे. मुंबईस जेव्हां सूर्योदय होतो, तेव्हां लंडनास रात्रीचा एक वाजलेला असतो. व लंडनास जेव्हां सूर्योदय होतो, तेव्हां मुंबईस दोनप्रहरचे अकरा वाजलेले असतात. ह्मणजे ह्या दोन शहरांत ५ तासांचा फरक आहे.

आतां अशी कल्पना करूं कीं, मुंबईहून एका गृहस्थानें तारीख २६ जानेवारी सन १८८९ शनिवार रोजीं रात्रीं एक तार लिहिली, व ती मुंबईस तार-आफिसांत रात्रौ एक वाजतां पोंचली. व ती तेथील तारमास्तरानें लागलीच घालावयास सुरुवात केली. तर कसें होईल तें पहा. कोणत्याही सरकारी आफिसांत दिवस धरणें तो रात्रौ बारा वाजल्या पासून दुसऱ्या रात्रीचे बारापर्यंत एक धरतात. वरील तार मुंबईच्या तार-आफिसांत रात्रीं एक वाजतां, ह्मणजे बारा वाजून गेल्या-

नंतर आली, तेव्हां अर्थातच मुंबईच्या तारमास्तरानें तीवर ता० २७ रविवार घातला. व पुढें लंडनास रवाना केली. तारेस काय उशीर! ती लगेच लंडनच्या तार-आफिसांत जाऊन दाखल झाली. त्या वेळीं लंडनांत रात्रीचे आठ वाजलेले असावयाचे हें उघड आहे. पण कोणत्या दिवसाचे? शनिवारचे. तेव्हां त्या तारेवर असे छाप बसतात.

**"मुंबईहून निघाली ता. २७ रविवार.**

**व लंडनास पोंचली ता. २६ शनिवार" !!**

---

# (९) पक्ष्यादिकांचें युद्ध.

**लंडन** येथील पदार्थसंग्रहालयांत कित्येक चमत्कारिक लेखांचाही संग्रह केलेला आहे. त्यांत सन १६२२ मध्यें प्रसिद्ध झालेलें एक पुस्तक आहे. त्यांत एक विलक्षण गोष्ट आढळते. **रिचार्ड धि सेकंड** राजाच्या बाराव्या वर्षी **शीन**—हल्लीं ज्यास **रिचमंड** ह्मणतात—तेथें एके समयीं आकाशांत युद्ध करण्यासाठीं इतकीं चिलटें जमा झालीं होतीं कीं, त्यामुळें जिकडे तिकडे अंधेरून आलें. युद्धांत घायाळ झालेलीं चिलटें इतकीं होतीं कीं, त्यांचा जमिनीवर एक मोठा थर झाला होता. युद्धसमाप्तीच्या वेळीं त्यांच्यापैकीं एक तृतीयांश मात्र शिल्लक राहिलीं. व तीं आपणांस जय मिळाला असें समजून आपआपल्या वाटेनें निघून गेलीं.

त्याच पुस्तकांत दुसरी एक गोष्ट आहे, ती फारच गमतीची आहे. **आयर्लंडांतील कार्क** शहरांत सन १६२१ तारीख १२ अक्टोबर रोजीं एक साळुंख्यांचें भयंकर युद्ध झालें. युद्धारंभाच्या पूर्वी चार पांच दिवस दोहों पक्षांची झपाट्यानें तयारी चालली होती. एक पक्ष पूर्वदिशेकडे होता. व एक पक्ष पश्चिमदिशेकडे होता. चार पांच दिवस त्यांची उडण्याची व जमाव जमविण्याची मोठी धांदल उडून राहिली होती. तरी त्यांत एक मोठा नियम होता. पूर्वेकडील टोळीनें पूर्वेकडे जावें. व पश्चिमेकडील टोळीनें पश्चिमेकडे जावें. ह्यांतलें पांखरूं त्यांत जात नसे, व त्यांतलें पांखरूं ह्यांत येत नसे. फार काय


सांगावें ? परंतु ह्या टोळ्यांतील पांखरांस त्या टोळींत जाण्यास, किंवा खाण्यास सक्त मनाई होती. पश्चिमेकडील टोळीनें पश्चिमेकडे दाणापाणी शोधावें. पूर्वेकडील टोळीनें पूर्वेकडे दाणापाणी शोधावें. असा परिपाठ होता. त्यांच्या युद्धाचा दिवस शनिवार होता. रविवारीं एकही पांखरूं दृष्टीगोचर झालें नाहीं. परंतु सोमवारीं फिरून तीं सैन्यें जमा झालीं. आणि पुन्हा पूर्ववत् झपाट्यानें लढाई सुरू झाली. त्यांत भेद येवढाच कीं, त्या दिवशीं मुख्य लढाईचे विभाग दोन केले. त्यापैकीं एक **लढाई ग्रेव्हसेंड** व **वूलवुइच्**च्यामध्यें झाली. ती इंग्लंडांतील पुष्कळ लोकांनीं पाहिली. त्या वेळची एक मजा अशी सांगतात कीं, त्या उभय सैन्यांमध्यें एक डोमकावळा वकिली करीत होता ! ! ! प्रत्येक लढाईत मृत आणि घायाळ झालेले हजारों पक्षी घरांच्या कौलारांवर आणि समरभूमीवर सांपडले. **कार्क**च्या लढाईत एक कावळा, एक घार, आणि एक डोमकावळा असे तीन सेनापति होते ! ! पुस्तक लिहिणारा ह्मणतो, कीं, त्या दोन्ही सैन्यांपैकीं एक **इंग्लिशां**चें व एक **आयरिशां**चें होतें !

सन १६७६ मध्यें **आक्सफर्ड** येथें छापलेलें दुसरें एक पुस्तक त्या संग्रहांत ठेवलेलें आहे. त्यांत सन १६७६ मध्यें फेब्रुवारीच्या २९ वे तारखेस **फ्रान्स**मध्यें **डोल** आणि **सलाईत** ह्या दोन गांवांच्या दरम्यान एक पक्ष्यांचें तुंबळ युद्ध झाल्याचें वर्णन आहे. त्यांत सर्व जातींचे पक्षी होते. हें घोर युद्ध पांच तास चाललें होतें. ह्या युद्धांत मेलेल्या आणि जखमी पक्ष्यांचे येवढे मोठे ढीग पडले होते, कीं त्यांस मनुष्याचें डोकें सहज लागे ! ! ! आणि प्रत्येक ढिगाच्या लांबीची सरासरी ९०० कदमांहून अधिक होती ! !

कित्येक कीटक आपआपल्या लढाईमध्यें सैन्यरचनेंत पराकाष्ठेचें बुद्धिवैभव दाखवितात. ह्यूबर ह्मणून एक मोठा नामांकित प्राणिशास्त्रवेत्ता होता. त्यानें अनेक कीटकांबद्दल अनेक शोध करून ते मोठ्या आस्थेनें लिहून ठेवले आहेत. त्यांत रानमुंग्यांच्या लढाईचें, हल्ल्याचें, सैन्यरचनेचें वर्णन फारच सुरस केलें आहे. त्या हल्ला करतात तो केवळ आवेशानेंच करतात असें नाहीं, तर शास्त्रोक्त रीतीप्रमाणें करतात.

त्यांची लढाई युद्धकौशल्याच्या नियमाप्रमाणें चालते. दोन्ही मुंग्यांचें जेव्हां लढाईचें तोंड लागतें, तेव्हां त्यांतील युक्ति, डाव, पेंच पाहिले ह्मणजे आपल्या मनुष्यांच्या लढाईची स्मृति होते. इतकें त्यांत सादृश्य असतें. आपले सैन्याचें रक्षण कसें करावें, व शत्रूच्या सैन्याचा नाश कसा करावा ह्याविषयीं त्यांच्यांतील सेनापति वेळोवेळीं नव्या युक्ति लढवीत असतात. ह्या मुंग्यांच्या लढाया अन्नपाण्यावांचून व विश्रांती वांचून, दिवसांच्या दिवस चालतात ! ! ! परमेश्वराची लीला अगाध आहे !

## (१०) बुद्धाचा दांत.



**ब्रह्मज्ञान नव्हे लेकुराच्या गोष्टी ॥ तेथें व्हावा पोटीं अनुभव ॥**
**दगडाहूनि जीव करावा कठीण ॥ अंतरींचा शीण जाय तेव्हां ॥**
**मेल्या मनुष्याची न धरिती आस ॥ तैसा हो उदास संसारासी १**

**तुकाराम.**

सुखोद्देशावांचून मनुष्याचा व्याप नाहीं; ब्रह्मज्ञानावांचून सुख नाहीं; आणि वैराग्यावांचून ब्रह्मज्ञान नाहीं. वैराग्य ह्मणजे इंद्रियजय. इंद्रियजय साधणें इतकें कठीण आहे कीं, तें काम हजारांत, लाखांतच नव्हे, तर कोटिमनुष्यांतही कोणास साधत नाहीं. तोंडानें वैराग्याच्या गोष्टी सांगणारे रगड मिळतील, पण हातानें ती गोष्ट करणारे फारच विरळा. हजारों सैन्यांवर जय मिळविणारे इतिहासांत शेंकडों वीर आढळतात; पण इंद्रियांवर जय मिळविणारे पुरुष फारच थोडे. ठीकच आहे—

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे**

**साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥ १ ॥**

अशा प्रकारचे जे इंद्रियजित आणि वैराग्यशील होऊन गेले, त्यां-पैकींच बुद्ध हा साधुवर्यमुकुटमणी होय. बुद्ध याचें मूळचें नांव **गौतम.** ह्याचा जन्म इ. स. पूर्वी ६२३ ह्या वर्षी झाला. ह्याच्या बापाचें नांव शुद्धोदन. काशीच्या पलीकडे हिमालयापर्यंत याचें राज्य होतें, व ह्याच्या पोटीं गौतम हें एकुलतें एकच पुत्ररत्न होतें. तो लहान वयांतच दुष्यंतपुत्राप्रमाणें शूर, आणि प्रल्हादाप्रमाणें योगाभ्यासी निपजला. ह्यानें सुकुमार वयांतच, मोठमोठ्या राजमंडळांत पण जिंकून एका राजकन्येशीं विवाह केला. व थोडे दिवस संसारसुखानुभव घेतल्यावर त्याच्या तिसाव्या वर्षी त्यास पुत्र झाला. पण मूळस्वभाव जाणार कोठें? तारुण्याच्या ऐन भरांत त्यास परमार्थाचा अम्मळ विसर पडला होता तरी, प्रसंगोपात त्याच्या मनास ती गोष्ट खात असे. राजवाड्यांत जेव्हां पुत्रोत्सव सुरू झाला, तेव्हां त्याचें मन अतिशय चिंतामग्न झालें. आपण एका स्त्रीच्या मोहपाशांत पडलों, तो इतका बंधनांत सांपडलों आहें. आतां आणखी पुत्राची ममता लागून संसारसुखांत दुप्पट बांधला जाणार. व एकदां ह्या मोहजालाचे दोरे अधिक अधिक वाढत गेले ह्मणजे तितके तोडण्यास कठीण पडणार. ह्यास्तव केव्हां तरी मनाचें धाडस केल्यावांचून उपाय नाहीं. मग आतां काय आणि मग काय? असा विचार मनांत आणून त्यानें त्याच वेळेस सर्व संग परित्याग करण्याचा निश्चय केला.

पण हें काम किती कठीण आहे, तें वरील अभंगांत तुकारामांनीं वर्णन केलेंच आहे. कीं "ब्रह्मज्ञान ह्मणजे कांहीं पोराच्या गोष्टी नव्हत; त्यास स्वतःलाच पश्चात्ताप झाला पाहिजे. हृदय जेव्हां दगडापेक्षांही कठोर करावें, तेव्हांच हृदयांतील संताप दूर होतो. मेलेल्या मनुष्याची जशी लोक आशा सोडतात, तशी संसाराची आशा सोडली पाहिजे."

पहा! येवढा थोरला विरक्त आणि आपल्या शतकांच्या योगानें रसी-

कजनांचीं अंतःकरणें केवळ सद्गदित करणारा जो भर्तृहरी त्याचा-देखील एके ठिकाणीं आशातंतु गुंतला होता, तो असाः—

**अग्रे गीतं सरसकवयः पार्श्वयोर्दाक्षिणात्याः**
**पश्चाल्लीलावलयरणितं चामरग्राहिणीनाम् ।**
**यद्यस्त्येवं कुरु भवरसास्वादने लंपटत्वं**
**नो चेच्चेतः प्रविश सहसा निर्विकल्पे समाधौ ॥ १ ॥**

पुढें गाणें चालू; शेजारीं चंद्रानना; मस्तकावर छत्रचामरें; असें वैभव असेल तर खुशाल संसारांत रहावें, असें ह्या कवीचें मत. पहा भर्तृहरी एवढा विरक्त असतांनाही त्याचा राज्यलक्ष्मींतून पाय निघेना !! किती वरें मोहपाश कठीण आहे! एका संस्कृत कवीनेंही ह्मटलें आहे.

**विश्वामित्रपराशरप्रभृतयो वातांबुपर्णाशना-**
**स्तेपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ।**
**शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजंति ये मानवा-**
**स्तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेद्विन्ध्यस्तरेत्सागरे ॥ १ ॥**

विश्वामित्रपराशरादि केवळ वायु भक्षण करणारे, त्यांची देखील स्त्रियांचें मुखकमल पाहून लटपट उडाली! मग रोज तूपपोळीवर ताव-मारणाऱ्या मनुष्यानें जर इंद्रियनिग्रह केला, तर समुद्रांत विंध्याद्रिच तरला ह्मणावयाचें !!

एवढी जी दुर्लंघ्य गोष्ट, ती गौतमानें एका क्षणांत उरकून टाकली. आमचे तुकारामबुवाही निस्पृह, आणि कडकडीत वैराग्यशील होते ह्यांत संदेह नाहीं. तरी गौतमाची योग्यता तुकारामापेक्षां अधिक समजली पाहिजे. कारण तुकारामास दारिद्र्य, वायको कर्कशा, लोकांचा अपवाद, इत्यादि पुष्कळ गोष्टी पश्चात्ताप होण्यासारख्या होत्या. ह्मणजे तुकारामाचा संसारांत पायगुंता होण्यासारखी एकही गोष्ट नव्हती ह्मटलें तरी चालेल. पण गौतमबुद्धाची स्थिति त्याच्या अगदीं उलट होती. त्याच्या संसारबंधनाच्या दोऱ्या फार बळकट होत्या. ज्वानीचा भर; राज्याचें वैभव; प्रीतीची पत्नि; आणि नवानवसांचा मुलगा; इतकीं दृढतर पाशबंधनें एकदम तट्कन तोडून टाकण्याचा नि-

श्चय करून एका रात्रीं घट्ट मन करून तो उठला; आणि बाळंतिणीच्या खोलींत गेला, तों तीस गाढ निद्रा लागली होती. ह्यास्तव तिला जागृत न करितां व नूतन बालकाचें चुंबनही न घेतां, तो अरण्यांत निघून गेला ! आणि आपल्या आंगावरील राजभूषणें एका भिकाऱ्यास देऊन, त्याचा भिकार पोषाख आपण घातला, आणि त्या दिवसापासून त्यानें "करतलभिक्षा आणि तरुतलवास" स्वीकारला. ह्याप्रमाणें कित्येक वर्षें अरण्यांत तपश्चर्या केल्यानंतर त्यानें आपला सर्व जन्म धर्मोपदेश करण्यांत खर्च केला. व त्याच वेळेस त्यानें आपलें नांव गौतम सोडून देऊन बुद्ध नांव धारण केलें. बोलण्याप्रमाणें करणें असल्यावर मग त्या उपदेशाचा प्रभाव काय सांगावा ? आपल्या एशिया खंडांत ह्या बौद्ध धर्माचे लोक ९९ कोटि आहेत. साऱ्या पृथ्वींत दुसऱ्या कोणत्याही धर्माचे इतके लोक नाहींत.

असा जो महान् विरक्त भगवद्भक्त, महाज्ञाता, त्याचे लोकांनीं जितके पवाडे गावेत, जितके देव्हारे माजवावेत, तितके थोडेच होतील ह्यांत संशय नाहीं. आज आह्मी त्याच्या दांताचें माहात्म्य सांगतों. ह्मणजे त्यावरून बुद्धाची योग्यता किती मोठी होती, व त्यावर लोकांचा किती पूज्य भाव होता ह्याची सहज कल्पना होईल.

**सिलोनां**तील **क्यांडी** येथें गौतम बुद्धाचा दांत, जैन धर्मातील जतींनीं एका संपुष्टांत घालून मोठ्या प्रयत्नानें जतन करून ठेवलेला आहे. क्यांडीमध्यें १४ शतकांपासून बुद्धाची गादी स्थापन झालेली आहे, आणि तेथेंच हा दांत आहे. ह्याचा इतिहासही मोठा चमत्कारिक आहे. हा दांत बुद्धाच्या अंतकाळापासून ह्मणजे इ० स० पू० ५४३ व्या वर्षी त्याच्या चितेंतून काढून आणिला होता. आणि त्या कालापासून ८ शतकें दक्षिण हिंदुस्थानांतील **दंतपूर** येथें त्याचें संरक्षण केलें. आणि नंतर तो ३१० मध्यें सिलोनांत नेला. तो मलबारी लोकांनीं युद्ध करून पुन्हां हिंदुस्थानांत आणला होता. त्यानंतर जैन लोकांनीं पुन्हां मोठा पराक्रम करून परत नेला. आणि पोर्तुगीज मिशनरींनीं सोळाव्या शतकांत बलात्कारानें तो गोव्यास नेला. आणि धरून आणलेल्या बौद्धधर्मी लोकांजवळ फार मोठी खंडणी मागूं लागले, ही मागितलेली खं-

डणी ते कबूल करीनात, ह्यास्तव मिशिनरी लोकांनीं त्या दांताची पूड करून फेंकून दिली. ही दंतविध्वंसक हकीगत पोर्तुगीज लोकांच्या दप्तरीं फार चांगली व तपशीलवार लिहिलेली आहे. तत्रापि क्यांडीमधील बौद्धधर्मी जतींनीं नवाच दांत उत्पन्न केला, आणि तोच हल्लीं दाखवितात. आणि ते अशी खात्री करतात कीं, पोर्तुगिजांनीं नेलेला दांत कांहीं खरा नव्हता. तो बनावट होता. हाच खरा दांत आहे. हाच बुद्धाचा. हा दांत त्यांनीं मोठ्या समारंभानें ठेविला आहे. हल्लीं पूजा अर्चा ह्याचीच होते. येथें खजिनाही बराच मोठा असून उत्साहाचा वगैरे थाट असतो.

कित्येक साहेबलोकांचें ह्मणणें असें आहे कीं, हा मनुष्याचा दांत नसावा. कारण २ इंच लांबीचा मनुष्याचा दांत असेल, ही गोष्ट संभवनीय वाटत नाहीं. परंतु उत्तरोत्तर सृष्टींतील मनुष्यें लहान लहान होत चाललीं आहेत. आपणापेक्षां आपले वडील धिप्पाड; वडिलांपेक्षां आजे धिप्पाड. हा सिद्धांत जर खरा आहे, तर दोन हजार वर्षांच्या पूर्वींच्या मनुष्याचा दांत २ इंच असेल ह्यांत आश्चर्य कोणतें? परस्थ लोक कांहींही ह्मणोत; पण तो खोटा असावा असा आमचा तरी सूर वाहत नाहीं.

हा दांत इ. स. १८१९ त, इंग्लिशांच्या हस्तगत झाला, तेव्हां फार गडबड उडाली. कारण तें सर्व राष्ट्राचें स्मारक आहे, अशी तद्धर्मी लोकांची व इंग्लिशांचीही समजूत होती; परंतु इंग्लिशांच्या आंगीं दुसऱ्याच्या धर्माचा बलात्कारानें विध्वंस करण्याचा तादृश दुर्गुण नाहीं, हें त्यांस अत्यंत भूषण होय. तेव्हां त्या नियमाप्रमाणें त्यांनीं तो तद्धर्मी लोकांस पूर्ववत् समारंभानें ठेवण्यास परवानगी दिली. हल्लीं हा दांत एका लहानशा खोलींत ठेवलेला आहे. तेथें प्रकाशाचा लवलेशही नाहीं. आणि तेथील हवा, पुष्पांच्या वगैरे वासानें उष्ण, व कोंदट असते. ही खोली देवालयांतील आंतील गाभाऱ्यांतील तळघरांत आहे. ह्या खोलीच्या दरवाज्याच्या चौकटीवर हस्तिदंती कोरीव नकशीदार काम कलेलें आहे. हा दांत साडेतीन फुटीच्या एका उंच आणि भव्य रुप्याच्या चौरंगावर मेघडंबरीच्या

रत्नजडित देव्हाऱ्यांत सुवर्णश्रृंखळेस टांगलेला असतो. आणि त्याच्या जवळ सहा पेट्या असतात. सर्वांत मोठी पेटी ९ फूट उंच असून तीस रुप्याचें गिलिट केलेलें आहे. आणि तींत सर्व माणकें भरलेलीं आहेत. आणि बाकीच्यांतही असेंच जड जवाहीर भरलेलें आहे; परंतु बाकीच्या पेट्या क्रमाक्रमानें एकएक फूट कमी आहेत. शेवटच्या पेटीची उंची १ फूट आहे. ह्या पेटीपुढें एक कमल उघडलेलें असतें. त्यांत देवाची देणगी असते. आणि त्याच्यापुढें एक रुप्याचा चौरंग असतो; त्यांत पुजाऱ्याची देणगी ठेवण्याचा सांप्रदाय आहे.

असो; येवढें जेव्हां दांताचें माहात्म्य, तेव्हां त्या पुरुषाचें माहात्म्य केवढें असेल बरें? बुद्धासारख्या साधुवर्याचें थोडें तरी वर्णन करण्याचा आह्मास प्रसंग आला, ही अत्यंत संतोषाची गोष्ट आहे, येवढेंच नव्हे तर आमचें महद्भाग्य समजलें पाहिजे. आणि ह्मणूनच आह्मी निस्सीम परमेश्वरभक्त जो बुद्ध त्यास अत्यंत प्रेमानें अभिवंदन करून, आजची ही संक्षिप्त हकीगत पुरी करतों.

---

# (११) दगडांच्या नद्या.

दधिसमुद्र, क्षीरसमुद्र, इत्यादि समुद्रांचीं नांवें आह्मी पुराणांतरीं ऐकतों मात्र. त्यापैकीं दृष्टीगोचर कांहींच नाहीं. दुधाच्या किंवा ताकाच्या नद्याही कोठें वर्णन केलेल्या आढळत नाहींत. काशीयात्रेहून आलेले लोक उत्तर हिंदुस्थानांतील एका नदीविषयीं मात्र चमत्कारिक माहिती सांगतात. ती नदी फल्गु होय. ही नदी श्रीरामचंद्रांनीं पालथी घातली आहे, असें ह्मणतात. व ही नदी पूर्वीं दुधाची होती अशीही पण आख्यायिका आहे. वर्षाऋतु खेरीज ह्या नदीच्या पात्रांत एक बिंदूही कधीं असत नाहीं. परंतु दोन हात उकरलें, कीं सुंदर पाणी लागतें. नुसतें पाणी लागतें येवढेंच नाहीं, पण त्यांत मासे सुद्धां असतात. सदरहू झऱ्यांचा आणखी एक चमत्कार सांगतात, तो असा कीं, आज काढलेल्या झऱ्याचें पाणी उद्यांस उपयोगीं पडत नाहीं. तें दुसऱ्या दिवसास अगदीं नासून जातें. ह्यास्तव या-

त्रेकरूंस प्रत्येक दिवशीं नवा झरा पाडावा लागतो. फल्गूच्या पात्रांत असे काढलेल्या झऱ्यांचे शेंकडों खळगे दृष्टीस पडतात.

दुधाच्या, किंवा दह्याच्या नद्या ह्मटल्या तर कांहीं संभवनीय तरी दिसतें. कारण दहीं, दूध, हे पदार्थ प्रवाही तरी आहेत; परंतु दगडांच्या नद्या आहेत ह्मणून जर कोणी सांगूं लागला, तर तें कोणास खरें सुद्धां वाटणार नाहीं. कारण दगड हे मुळीं जड, अप्रवाही पदार्थ, त्यांच्या नद्या होतील कशा? तरी पण चमत्कार हा कीं, पृथ्वीच्या पाठीवर दगडांच्याही नद्या आहेत.

मद्रास रेल्वेंतून व सदर्न मराठा रेल्वेंतून ज्यांनीं प्रवास केला असेल, त्यांनीं पिठूळ व ढिसूळ दगडांचे अनेक पर्वत पाहिले असतीलच. ह्या पर्वतांवर हजारों लहान मोठे गुंडे अगदीं सुटे असे दृष्टीस पडतात. कित्येक शिखरें तर अशीं ओथंबलेलीं दृष्टीस पडतात कीं, तीं पाहिलीं असतां असें वाटतें कीं, हीं आतांच ढांसळून ह्याचे गुंडे लाह्या पसरल्याप्रमाणें पसरतील कीं काय कोणजाणे? हे गुंडे इतके गुळगुळीत व इतके वेगळे वेगळे दिसतात, कीं अमळ ढका लागला, तर सारे गुडगुड, खालीं येतील असें वाटतें. मग खरा प्रकार काय असेल कोण जाणे!!


**फाकलंड** बेटांत अशाच प्रकारच्या पिठूळ व गुळगुळीत गुंड्यांचे पर्वत आहेत. ह्या पर्वतांचे सुमारें सुपारीयेवढे वाळूच्या खड्यासारखे गुंडगुळे खडे नेहेमीं त्यांच्या शिखराकडून पायथ्याकडे घसरत असतात. आणि हा दगडांचा प्रवाह कित्येक खोऱ्यांतून वाहून शेवटीं नद्यांप्रमाणें समुद्रास मिळतो!! कधीं कधीं वाऱ्याच्या किंवा पर्जन्याच्या जोरानें ह्या दगडांच्या प्रवाहास एवढा वेग प्राप्त होतो कीं, हत्तीसारख्या प्राण्यास त्यांतून पार होतां येत नाहीं. ह्या पाषाणनद्यांतून पलीकडे जाण्यासाठीं जागोजाग इतर नद्यांप्रमाणेंच पूल बांधले आहेत. प्रवाशी लोकांस ह्या प्रवाहाचा आवाज लांबून नदीच्या प्रवाहासारखाच ऐकूं येतो. प्रवाह अगदीं मंद चालत असला, तरी सुद्धां पाण्याच्या खळखळीप्रमाणेंच आवाज ऐकूं येतो. ह्यांतील दगड क्रमानेंच एकावर एक घसरतात. सर्व गुंडे लहानसरच असतात असें नाहीं. त्यांत कधीं कधीं दहा दहा फुटीच्या किंवा वीस वीस फुटीच्या धोंडीही वहावत जातांना दृष्टीस

पडतात. नवख्या मनुष्यास हा पाषाणांचा प्रवाह संथ चाललेला पाहून फारच आश्चर्य वाटतें. आणि विशेष गोष्ट ही कीं, आज कित्येक वर्षें हे पाषाणप्रवाह समुद्रास जाऊन मिळत आहेत, तरी तो पर्वत कांहीं अद्याप बसत नाहीं! स्काट्लंडांतही कोठें कोठें व कधीं कधीं ह्याच प्रकारचे दगडी प्रवाह आढळतात, ह्यावरून जगांत कोठें काय व कोठें काय चमत्कार असतील हें सांगवत नाहीं. व अमुक एक गोष्ट जगांत होणारच नाहीं असाही पण सिद्धांत करतां येत नाहीं. कारण "नानारत्ना वसुंधरा." कित्येक लोक ह्मणतात हा दैवी चमत्कार आहे. कित्येक लोक ह्मणतात कीं पर्वत फार जुने होऊन ढिसूळ झाले, ह्मणजे तसें होणें शक्य आहे. कित्येकांचें ह्मणणें भूकंपाच्या वेळीं जसा लावारसाचा 'स्फोट' होतो, किंवा अर्टिफिशियल विहिरीमध्यें जसा पाण्याचा फवारा सुटतो तसा भूगर्भांतून वाळूचा स्फोट होऊन तो ह्या पर्वताच्या पोटांतून बाहेर पडत असावा. अशीं अनेक लोकांचीं अनेक मतें आहेत. एकंदरींत परमेश्वराची लीला अगाध आहे, येवढी गोष्ट खरी.

# (१२) राक्षसी गुलाब.

**व्हिटबाय**मध्यें **न्यू गार्डनांत** एक गुलाबाचें झाड वाढलेलें आहे, त्याचा विस्तार येवढा मोठा आहे कीं, तो एखाद्यास सांगितला असतां खरा देखील वाटावयाचा नाहीं. मारशालनील ह्मणून गुलाबांत जी प्रख्यात जात आहे, त्या जातीचा हा आहे. हें झाड इ. स. १८६४ त लावलें आहे. ह्याच्या मधील सरळ सोटाची उंची १०२ फुटींहून अधिक आहे. डाव्या बाजूचा विस्तार ४८ फूट आहे. उजव्या बाजूचा विस्तार ५४ फूट आहे. आणि ह्याचीं मुळें सुमारें ८।१० फूट खोल गेलेलीं आहेत. इ. स. १८८१ मध्यें त्या झाडाचीं २५०० फुलांच्या वर फुलें काढिलीं. आणि ह्या वर्षापासून पुढें तर ह्या झाडाच्या फुलांचा भर वाढतच होता. इ. स. १८८२ मध्यें फुलांची ४००० गणना झाली.

# (१३) मुंग्यांचा राक्षस.



**'मुंग्यांचा राक्षस'** हें जनावर दक्षिण **अमेरिकें**तील उष्ण प्रदेशांत आणि **अस्त्रेलियांत** सांपडतें. ह्याच्या अनेक जाति आहेत. कित्येकांच्या आंगावर खवलें असतात, व कित्येकांच्या आंगावर मऊ व आंखूड लोंकर असते. आणि पाठीवर एक मोठा थोरला शेपटाचा झुबका असतो. ह्याचें तोंड पक्ष्याच्या चोंचीसारखें निमुळतें असून त्यांत बारीक सुईसारखी लांब जीभ असते, ती सर्पाप्रमाणें किंवा घोरपडीप्रमाणें बाहेर काढून तिनें तो मुंग्या धरून खातो. तो मुंग्या टिपूं लागला ह्मणजे इतक्या जलद टिपतो, कीं त्याच्यावर नजर ठरत नाहीं. ह्या प्राण्यास मुंग्या हाच भक्ष्य. तो दुसरा कोणताही पदार्थ खात नाहीं. ह्याच्या जिभेस विषारी कांटा असतो. तो मुंगीस लागतांच ती घायाळ होते. हा येवढा प्राणी केवळ मुंग्यांसारख्या क्षुल्लक प्राण्यांवर पोसला जातो, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय. ह्याचीं नखें अस्वलासारखीं तीक्ष्ण असतात. ह्या प्राण्यास राहण्यास घर किंवा बीळ कांहींएक लागत नाहीं. ह्याच्या पाठीवरचा तो शेपटाचा झुपकेदार गोंडा त्याचें उष्णापासून व हिंवाळ्यापासून संरक्षण करतो. ह्या प्राण्यास दांत मुळींच नाहींत.

मुंग्यांचा राक्षस वाळूच्या मैदानांत किंवा नदीच्या किनाऱ्यास राहतो. दिवसांतील बराच वेळ त्याच्या निजण्यांत जातो. ह्याची लांबी नाकाच्या शेंड्यापासून तों शेपटाच्या मुळापर्यंत सुमारें तीन हात असते. ह्याची

शक्ति अचाट असते. हा वाघाला गच्च उराशीं आंवळून धरून किंवा अस्वलाप्रमाणें गुदगुल्या करून मारून टाकतो. किंवा तीक्ष्ण नखांनीं विदारून त्याचे तुकडे तुकडे करून सोडतो. हा प्राणी एकलकोंडा आहे. तो रात्रीचा बाहेर पडतो. ह्यास प्रत्येक खेपेस एकच पिल्लूं होतें. व त्यास बाहेर जातांना आई आपल्या पाठीवरून घेऊन जाते.

डाक्टर स्मिथ नांवाच्या एका गृहस्थानें एक मुंग्यांचा राक्षस घरांत बाळगला होता. तो कुत्र्याप्रमाणें वासानें आपल्या धन्याचा माग काढीत असे. सर्वांशीं फार लाडिकपणानें वागे. झाडावर चढण्यांत तर तो फार पटाईत होता. कित्येक गलबतांवरच्या लोकांनींही मुंग्यांचे राक्षस पाळले होते. व ते तेथें उंसाचा रस किंवा साखरेचें पाणी पीत असत. असें वर्णन आढळतें.

## (१४) भविष्याचे ठोकताळे.

**मोरे**च्या माजी **काउन्टी**ची पत्नी, आणि **लान्कशायर** येथील **कार्न बाल्ट**ची मुलगी; जिचें नांव **लाकहार्ट** ही बारा वर्षांची असतां, एका जोशानें सांगितलें कीं, " ह्या मुलीस दोन भ्रतार होतील. आणि ही मरण काळाच्या अंमळ पूर्वीं एका निबिड अरण्यांतून प्रवास करील आणि मार्गांत तिच्या गाडीच्या घोड्यांपैकीं एक अबलक घोडा मरण पावेल. आणि गेलेल्या ठिकाणाहून ती परत येणार नाहीं." ह्या भविष्याचा विलक्षण दाखला पटला! ह्या **लाकहार्ट** इचा पहिला नवरा **आबोनी**चा **अर्ल** होता. आणि दुसरा नवरा **मोरे**चा **अर्ल** होता. आणि मरावयाच्या पूर्वीं ती **स्काट्लंडास** गेली. जातांना तिचा मार्ग **ग्लेनमोर** नांवाच्या जंगलांतूनच होता. ह्या जंगलांत एका मुक्कामास ती उतरली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळींच तिचा कोचमन तीस सांगूं लागला कीं, आपल्या गाडीच्या चार घोड्यांपैकीं, एक घोडा काल रात्रौ एकाएकीं मेला. ह्यास्तव आज दुसरा कोठून तरी आणला पाहिजे. हा मेलेला घोडा अबलकच होता! नंतर ती संकेताप्रमाणें **कलोडान**च्या घरीं गेली. आणि पांच चार दिवस झाले नाहींत तोंच तेथें ती आटपली!!

चार्लस **वुइल्सन** यानें एके ठिकाणीं **ड्रायडन** कवीविषयीं असें

लिहिलें आहे कीं, तो ज्योतिष या विषयावर फार विश्वास ठेवित असे. त्यास **चार्लस** ह्मणून एक पुत्र होता. त्याच्या जन्माची वेळ त्यानें इतकी सावधगिरीनें काढली होती कीं, त्यांत एक सेकंद सुद्धां चुकूं दिला नव्हता. नंतर त्यानें गणित करून जन्मपत्रिका केली. त्यानें जन्माच्या वेळचे ग्रह येणेंप्रमाणें वर्तविले होते. **गुरु** आणि **शुक्र** पृथ्वीच्या अधःस्वस्तिकीं होते. आणि **शनि** व **गुरु** त्याच्या उच्चस्थानीं असून ते पीडा देणारे होते. त्यावरून त्यानें असें वर्तविलें होतें कीं, हा आपल्या आठव्या वर्षाच्या जन्मदिवशीं मरेल. किंवा वांचलाच तर अगदीं मरणोन्मुख होईल. त्यांतून तो बचावल्यास पुन्हां तेविसाव्या वर्षी त्याच दिवशीं त्यास अपघात होईल. आणि त्यांतून तो बचल्यास ३३ व्या किंवा ३४ व्या वर्षी असाच पुन्हां अपघात होऊन तो मरेल. त्याप्रमाणें मुलाचा आठवा वाढदिवस आला. तेव्हां सर्वजण त्याचें होईल तितकें रक्षण करूं लागले. इतक्यांत एक मोठी भिंत त्याच्या आंगावर पडली. आणि त्यांतून तो मोठ्या कष्टानें वांचला. नंतर २३ व्या वर्षी नेमलेल्या दिवशीं **रोम** येथील **व्हटिक्यान**च्या बुरुजावरून घेरी येऊन तो पडला. आणि त्यांतून तो महत्प्रयासानें बचला. आणि शेवटीं ३३ व्या वर्षी **वुइन्डसर** येथें **थेम्स** नदींत पोहत असतांना जो बुडाला, तो पुन्हां वर निघाला नाहीं !!

सांप्रत **अमेरिका** खंडांतील **कनेक्टिकट** नांवाच्या संस्थानापैकीं **ब्रिजपोर्ट** नांवाच्या गांवीं, एक बाल भविष्यवादिनी आहे. तिचें नांव **मिस्स मोझेला प्राउट.** ह्या मुलीचें वय अवघें नऊ वर्षांचें आहे. ही जें जें बोलते, त्याचे तेथील लोकांस बिनचूक टोकताळे पडतात ! हिला भविष्य कथनाला, ग्रह वगैरेंची कांहीं गरज लागत नाहीं. तर ती स्वाभाविकपणें जें बोलते तेंच खरें उतरतें !! नुक्तेंच एका **मिसेस स्मिथ** नांवाच्या बाईनें ह्या मुलीस विचारलें कीं "माझे पति **एंजलस** येथें गेले आहेत, त्यांचें कुशल वृत्त केव्हां कळेल ?" मुलगीनें उत्तर दिलें "त्याचें पत्र आजच येईल; आणि त्याबरोबर २० **डालरची मनीआर्डर**ही येईल." ही गोष्ट सकाळीं झाली. दोन प्रहरीं पोष्टाचा शिपाई वरील बाईकडे सांगितल्याप्रमाणें पत्र आणि वीस **डालरची** मनीआर्डर घेऊन आला !! तसेंच कोणे एके दिवशीं ह्या मुलीनें

आपल्या आईबापांस सांगितलें कीं, आज रात्रीं आपल्या घरीं **कार्न-वॉल** येथून माझा काका आणि काकी येणार आहेत. त्यांच्यासाठीं स्वयंपाक वगैरे अधिक करून ठेवा. सायंकाळीं स्वयंपाकघरांत रोजचीं पात्रें मांडून तयारी झाली; तों दरवाजा खडखडला ! उघडून पाहतात तों मुलीनें सांगितल्याप्रमाणें पाहुणेमंडळी हजर झाली. एके दिवशीं ह्या मुलीचा बाप मासे धरण्यासाठीं नदीवर गेला. बरोबर ही मुलगी-ही एक गडी घेऊन गेली. बाप मासे धरण्याच्या कामास लागला, व ही मुलगी त्या चाकराबरोबर बरीच दूर जाऊन खेळूं लागली. खे-ळतां खेळतां मध्येंच ती त्या चाकरास ह्मणे "हा पहा, अत्तां बाबांनीं एक मासा धरला." नंतर कांहीं वेळानें ती चाकरास ह्मणाली, "बा-बानें मासे धरणें पुरें केलें. त्याला ११ मासे सांपडले आहेत. तो आतां येईल" ह्मटल्याप्रमाणें बाप आला. व चाकरानें त्यास मुलीचें बोलणें कळविलें. ह्मणून बापानें मुद्दाम टोपलींतले मासे मोजले. तों ते अकराच ! !

प्रस्तुतकालीं मद्रास इलाख्यांत कुंभकोणानजीक गोविंदचेटी नांवाचे एक प्रख्यात भविष्यवादी आहेत. ह्यांचा अद्भुत गुण 'थिऑसोफिस्ट' वगैरे इंग्रजी मासिकांतून प्रसिद्ध झालाच आहे. लेफ्टेनेंट पीकॉक नां-वाचे एक युरोपियन गृहस्थ ह्या गोविंदचेटीकडे नुकतेच (स. १८९१ आगष्टमध्यें) जाऊन आले. व त्यांस जी विलक्षण प्रतीति आली, ती त्यांनीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली आहे. तें ऐकून आपल्या भरत-खंडांत अशीं अपूर्वरत्नें असल्याबद्दल मोठा अभिमान वाटतो. आणि त्यांच्या विद्येचें व गुणाचें मोठें कौतुक वाटतें. ही हकीकत पुणें ज्ञानचक्षु तारीख १०।२।९२ वरून घेतों लेफ्टेनेंट पीकॉक ह्मणतातः—

"माझे एका विश्वासू मित्रानें मला असें कळविलें होतें कीं, मद्रास इलाख्यांत गोविंदचेटी नामक एक मनुष्य भविष्यकथनाच्या अत्यद्भुत कामांत सुप्रसिद्ध आहे. ही गोष्ट मीं लक्ष्यांत ठेवून, गेल्या आगष्ट महिन्यांत जेव्हां फिरत फिरत मद्रास इलाख्यांत गेलों, तेव्हां त्या गो-विंदचेटी भविष्यवाद्याचा शोध लावून त्याचे गांवीं गेलों. हें गांव कुं-भकोणापासून ३ कोशांवर आहे. गोविंदचेटीची भेट घेण्याचा हेतु आह्मीं त्यास कळविला. तेव्हां तो ह्मणाला कीं, मी गोऱ्या लोकांची

भेट घेत नाहीं. असें सांगण्यांत त्याचा हेतु असा नव्हता कीं, साहेब लोकांपुढें आपल्या भविष्यकथनाची अद्भुतता प्रत्ययास आणून देतां येणार नाहीं व ह्मणून त्यांची भेट घेऊं नये. तर, त्याला आपल्या भविष्यकथनावर साहेब लोक अविश्वास ठेवून, उलट आपल्या अद्भुत विद्येबद्दलचें गौरव करण्याचे जागीं आपल्याला कैदेची शिक्षा देतील, अशी भीति वाटत होती. आणि अशी त्याला भीति वाटण्यास तसें कारणही घडलें होतें. गोविंदचेटी ज्या गांवीं राहत आहे त्या गांवीं मागें एकदां एकाचे घरीं चोरी झाली. ती गोविंदचेटी यानें आपल्या अद्भुतभविष्यज्ञानानें मुद्यापत्त्यानिशीं पकडून दिली. व त्या चोरांवर कुंभकोणच्या सेशन जज्जापुढें खटला चालला. त्या खटल्यांत गोविंदचेटीची साक्ष झाली. परंतु जज्जानें गोविंदचेटीच्या भविष्यकथनावर पूर्ण अविश्वास ठेवून, उलट, गोविंदचेटी हाच त्या चोरांस सामील असून आतां मागाहून आपली एका अद्भुत भविष्यकथनांत वाहवा व्हावी आणि आपण नांवानिराळें राहावें, ह्मणून तो ही चोरी आपल्या अपूर्वज्ञानानें काढून त्याचें श्रेय मिळवूं पहात आहे, असें जज्जाचें मत पडलें. आणि ह्याप्रमाणें, त्याच्या भविष्यकथनाच्या अद्वितीय शक्तिज्ञानावर बिलकुल भरंवसा न ठेवून, जज्जानें त्यासही त्या चोरांबरोबर कैदेची शिक्षा दिली. व ती शिक्षा त्या बापड्या गोविंदचेटीनें भोगली! असा प्रकार झाल्यावरून गोविंदचेटीनें साहेब लोकांची भेट घेऊन त्यांजपुढें आपल्या ज्ञानाचा प्रभाव दाखविण्यास भीति बाळगावी हें साहजिकच होतें. ही हकीकत मला कळल्यावरून मीं त्यास कळविलें कीं, एका साहेबासारखेच दुसरे सर्व साहेब असतात असें तुह्मीं समजूं नका. शिवाय, मी साहेब जो आहें तो कांहीं जज्ज नसून माझे हातीं कैद वगैरे देण्याचा अधिकारही नाहीं. शिवाय, मी थिऑसफिस्ट मताचा असून भविष्यकथनादिक अद्भुतगोष्टींवर माझा भरंवसा आहे; व त्या भरंवशास बळकटी आणण्यासाठीं असे चमत्कार पाहण्याचा जेथें प्रसंग येईल व संभव असेल तेथें मी जाऊन तो प्रसंग साधतों. त्याप्रमाणें तुमचा लौकिक ऐकून मी येथें तुमच्या भेटीसाठीं मुद्दाम आलों आहें. तर मला तुह्मी आपल्या विद्येचा चमत्कार दाखविल्यास त्यांत तुमचें कोणत्याही रीतीनें

नुकसान व अकल्याण नसून, उलट मी आपल्या देशबांधवांस हा तुमचा अद्भुत विद्याचमत्कार कळविण्यासाठीं चोहोंकडे प्रसिद्ध करीन.

गोविंदचेटीनें मजकडून इतकी खात्री करून घेतल्यावर आपला भविष्यकथनचमत्कार दाखविण्याचें कबूल केलें. गोविंदचेटी आपलें भविष्यकथन, त्याच्या एका नियमित जागीं बसूनच करितो. त्या ठिकाणीं त्यानें मला येण्याविषयीं कळविलें. मी माझ्या एका हिंदु मित्रासहवर्तमान गोविंदचेटीच्या नियमित ठिकाणीं गेलों. हा हिंदु मित्र ह्या ठिकाणीं माझा दुभाष्या झाला.

मी त्या ठिकाणीं जाऊन बसल्यावर गोविंदचेटी तेथें येतांना मीं दुरून बघितला. त्याला मद्यपानाचें अतोनात व्यसन असल्यामुळें त्याचा चेहरा इतर मद्यपि लोकांसारखाच ओंगळ व तिरस्करणीय दिसत होता. त्याचा स्वभाव फार तापट असून त्याच्याशीं बोलणें सवरणें त्याच्या बेताप्रमाणेंच झालें पाहिजे असें सांगणारांनीं सांगितलें. तो माझ्या बरोबर सभ्यवर्तनानें वागेल किंवा नाहीं याजबद्दल मला शंका होती. परंतु माझे सुदैवानें, पहिल्यानें जसें आह्मांस वाटलें होतें तसा कांहीं अनुभव आला नाहीं. गोविंदचेटी माझ्याशीं फार सभ्यतेनें वागला व माझा जो मान ठेवायाचा तो त्याजकडून ठेविला गेला. गोविंदचेटी हा यूरोपियन किंवा देशी अशा कोणत्याही लोकांविषयीं बिलकुल पर्वा न बाळगणारा व निःस्पृह असल्याचा त्या प्रांतांत लौकिक आहे. मी एका खुर्चीवर बसलों होतों; तिचेजवळच तो एका बैठकीवर येऊन बसला. नंतर त्यानें कागद घेऊन त्याजवर कांहीं लिहिण्यास सुरुवात केली. सुमारें दहा मिनिटांनीं तो कागद लिहून त्यानें कलम खालीं ठेविलें. मधून मधून तो माझे तोंडाकडे बघून विचार करीत असे व नंतर कागदावर काय तें टिपीत असे. हा त्याचा सर्व लेख तामील भाषेंत व लिपींत होता. कागद लिहून झाल्यावर तो त्यानें मजजवळ दिला आणि त्याखालीं मला माझी सही करण्याविषयीं सांगितलें. त्याप्रमाणें मीं त्या कागदावर सही केली व त्याचे सांगण्यावरून तो कागद घडी करून मीं आपल्या खिशांत ठेविला. गोविंदचेटीचें ह्मणणें मला इंग्रजींत व माझें ह्मणणें गोविंदचेटीला तामिल भाषेंत माझे बरोबरचा हिंदु मद्रासी मित्र कळवीत आहे. त्या मित्राकडून गोविंदचेटीनें मला विचारिलें कीं, मी कशाकरितां आलों ?

तेव्हां मीं त्यास कळविलें कीं, मी कशाकरितां आलों हें तुह्मी आपल्या ज्ञानानें समजा; माझ्या येण्याचें कारण तुह्मी मला पुसूं नये. त्यावर गोविंदचेटी ह्मणालाः—तुह्मी घरून मजकडे येण्यास निघतांना तुमचे मनांत मजला जे प्रश्न विचारावयाचे होते त्या प्रश्नांचीं उत्तरें मीं लिहून, तुह्मांजवळ दिलेल्या कागदांत टिपलीं आहेत. तीं कागद काढून बघावीं. परंतु तीं बघण्यापूर्वीं, ही भोंवतालीं जी मंडळी जमली आहे तिचे खात्रीकरितां तुह्मी पहिल्यानें कोणते प्रश्न मला विचारावयाचे योजिले होते ते अगोदर सांगा. ह्मणजे त्या सर्वांचीं उत्तरें ह्या कागदांत दिलीं आहेत किंवा नाहींत तें तुह्माला व इतरांना समजून येईल.

गोविंदचेटीचें हें ह्मणणें योग्य होतें. येथें वाचकांना मला इतकें सांगितलें पाहिजे कीं, गोविंदचेटीचे घरीं जाण्याबद्दल माझे मनांत अगोदर महिना दीड महिन्यापासून आलें होतें; व तेथें गेल्यावर त्याला कोणते प्रश्न विचारावयाचे त्यांचीही मीं योजना करून ठेविली होती. इतकेंच नव्हे; तर मद्रास इलाख्यांत गेल्यावर गोविंदचेटीची भेट होण्याचेपूर्वीं १०।१२ दिवस मला गोविंदचेटीला जे प्रश्न विचारावयाचे होते त्यांचें टांचण मीं करून ठेविलें होतें. व हें टांचण मजशिवाय बाहेर कोणालाही कळण्याचें कारण नव्हतें. व ते प्रश्न मी विचारणार आहें असें कधीं कोणाजवळ बोललोंही नव्हतों. गोविंदचेटीस जे प्रश्न विचारावयाचे होते त्यांचें टिप्पण काढून मीं मोठ्यानें वाचून दाखविलें व त्याचा तर्जुमा माझे बरोबरच्या माझे दुभाष्यानें करून सांगितला. ते तीन प्रश्न हे होतेः—(१) माझें लग्न कोठें आणि कसें होईल? (२) मुंबईस राजाबाई मनोऱ्यावरून ज्या दोन पार्शी तरुणी पडून मेल्या त्याचें कारण काय? आणि (३) माझ्या खिशांत जो एक लखोटा आहे त्यांतील कागद कोणीं लिहिला असून त्या कागदांत काय लिहिलें आहे? हे तीन प्रश्न मीं त्यास कळविल्यावर गोविंदचेटी मला ह्मणाला, तुह्मी तुह्माला वाटेल त्या एखाद्या कवितेचा चरण ह्मणा. त्यावरून मी पुढील एक चरण ह्मटलाः "And where fire—flies" त्यावर गोविंदचेटी ह्मणाला, तुह्माला वाटेल त्या एखाद्या पक्ष्याचें नांव घ्या. त्यावरून मीं "Swan" हें नांव सांगितलें.

त्यानंतर गोविंदचेटी मला ह्मणालाः–आतां मीं जो तुह्माला कागद लि-

हून दिला आहे तो काढून वाचून बघा त्या कागदांत मीं तुमच्या तीनही प्रश्नांचीं उत्तरें लिहिलीं असून, तुह्मी जो कविताचरण ह्मटला व ज्या पक्ष्याचें नांव घेतलें ते सर्व इंग्रजी शब्द तामिल भाषेंत लिहिलेले आहेत, असें तुह्मांस आढळून येईल. त्याप्रमाणें तो कागद मीं आपल्या खिशांतून काढून माझे मद्रासी स्नेह्याचे जवळ देऊन, तो वाचून त्याचें भाषांतर मला सांगण्यास त्याला सांगितलें. तेव्हां त्या कागदांत गोविंदचेटीनें लिहिलेला पुढील मजकूर आढळला:—

"तुमचें जन्म इ० स० १८६७ च्या एप्रिल महिन्यांत झालें. तुमचें वय आज २४ वर्षें, ४ महिने, २८ दिवस आणि ११ तास इतकें आहे. तुह्माला मजजवळ जे प्रश्न विचारून त्यांचा खुलासा मागावयाचा आहे ते तीन आहेत; व ते तिन्ही प्रश्न स्त्रीविषयक आहेत. तुमचें लग्न एका सुंदर स्त्रीबरोबर तुमच्या २९ व्या वर्षीं होईल. ज्या स्त्रीबरोबर तुमचें लग्न ठरलें आहे तिचें वय १९ वर्षांचें असून तिचें नांव कुमारीइन्न् असें आहे. ह्या कुमारीबरोबर पहिल्यानें तुमची भेट स्विट्झर्लंड देशांत झाली. मुंबईस ज्या दोन पार्शी तरुण स्त्रिया पडून मेल्या त्या अपमृत्यूनें मेल्या. तुमचे खिशांत जो लखोटा आहे त्यावर लाखेची मोहोर केलेली असून त्या लखोट्यांतील कागद पियर्स नांवाच्या व्यक्तीनें लिहिलेला आहे. पूर्वजन्मीं तुमचा चांगल्या ज्ञातीमध्यें जन्म झाला होता व त्यावेळीं तुमच्या बुद्धीला चांगला संस्कार होऊन व तुह्माकडून सत्कर्म घडून ह्या जन्मींही तुह्मी चांगल्या जातींत उत्पन्न झालां आहांत. माझ्या सांगण्यावरून तुह्मी "And where fire-flies" हा कवितेचा चरण आणि "Swan" हें पक्ष्याचें नांव बोलून दाखवाल. तुह्माला एक भाऊ व दोन बहिणी असून तुमच्या घरून तुह्माला कांहीं पैसा वगैरे मिळत नाहीं. तुह्माला नौकरी लागून दोन वर्षें झालीं व आणखी ९ वर्षांनीं तुमची बढतीवर नेमणूक होईल. तुह्मी वयाच्या २६ व्या वर्षीं इंग्लंडास जाल. तुमचें आयुष्य ६० वर्षांवर आहे. तुमची पत्नी फार भाग्यवान् निपजेल व तुह्मी स्वतः फार सुशील गृहस्थ आहांत."

हा सर्व मजकूर गोविंदचेटीनें माझे प्रश्न वगैरे विचारण्याचे अगोदरच लिहून मजजवळ कागद दिला होता. मी काय विचारणार कोणती क-

विता ह्मणेन व कोणत्या पक्ष्याचें नांव घेईन हें त्याला अगोदर समजण्याचें कांहीं एक साधन नव्हतें. तेव्हां गोविंदचेटीचा तो कागद पाहून मला जें आश्चर्य वाटलें तें येथें सांगतां येत नाहीं!

पुढें गोविंदचेटीचें व माझें बोलणें झालें. त्यांत त्यानें माझे जिंदगीच्या व्यवस्थेविषयीं वगैरे बऱ्याच गोष्टी सांगितल्या व त्या माझ्या अनुभवाप्रमाणें खऱ्या ठरल्या. नंतर तो ह्मणाला, तुमचें लग्न तुह्मी ठरविलेल्या वेळेशिवाय अगोदर दुसऱ्याच वेळीं होईल. मी ह्मणालों, छिः, तसें कांहीं व्हावयाचें नाहीं; माझें लग्न येत्या नोवेंबर महिन्यांत ठरलें आहे. तो ह्मणाला, छिः, तसें कांहीं व्हावयाचें नाहीं. तुह्माला तुमची लग्नतिथि बदलावी लागेल व तें अगोदरच होईल; हें आपलें मी तुह्माला सांगून ठेवतों व त्यावर तुह्मी विश्वास ठेवा. ह्याप्रमाणें आमचीं परस्परांशीं बोलणीं होऊन मी गोविंदचेटीचा निरोप घेऊन निघून गेलों.

गोविंदचेटीनें माझे लग्नाची मित्ति बदलून अगोदर लग्न होईल ह्मणून जें मला सांगितलें होतें त्याजकडे माझें तादृश्य लक्ष्य नव्हतें. परंतु इतक्यांत, पुढें मला एक पत्र आलें व त्यांत, आमचा नोवेंबर महिन्यांत ठरलेला विवाहनिश्चय फिरून, तो ता. २ आक्टोबर रोजचा ठरविल्याबद्दल लिहिलें होतें. आणि ह्याप्रमाणें गोविंदचेटीचें भविष्य मला सरून, तें खरें असें अनुभवास आलें!

ह्या प्रांतांतच मानारदी नांवाच्या गांवीं एक भविष्यवादी आहे तो तर चेटीपेक्षांही फार अद्भुत व जबरदस्त विद्वान् आहे, असें माझ्या समजण्यांत आलें आहे. तो भविष्यवादी एक योगाभ्यासी आहे व तो योगी मोठमोठ्या ज्वाला चाललेल्या अग्निकुंडांत तासचेतास ध्यानस्थ बसतो असेंही सांगतात! ह्याप्रमाणें ह्या हिंदुस्थानांत कोणकोणत्या प्रकारचीं व अद्भुतशक्तीचीं माणसें आहेत हें कांहीं सांगतां येत नाहीं!"

केवढी लोकोत्तर विद्या! काय अद्भुत गुण हा! असले अद्भुत चमत्कार व असल्या अप्रतिम मूर्ति आपल्या उशाशीं असतां, त्यांचें दर्शन घेणें सुद्धां जर आमच्या नशिबांत येत नाहीं, तर आमच्यासारखे सुस्त आणि आळशी आह्मीच. दुसरें काय ह्मणावें? युरोपियन लोकांनीं हजारों कोसांवरून पत्ता पाडीत येऊन त्यांची कीर्ति गावी

आणि आमच्या स्वदेशबांधवांस त्या आपल्या अपूर्व बंधूचें नांव गांव सुद्धां माहित असूं नये, केवढी शोचनीय स्थिति ही ?

जुळल्यास एकवेळ अवश्य जाऊन गोविंदचेटीचें दर्शन घ्यावें अशी अत्युत्कट इच्छा आहे. परमेश्वर सफल करो.

---

## (१५) नरमांस भक्षक लोक.

दया ह्मणून जो पदार्थ आहे, तो श्रेष्ठ आहे ही गोष्ट जर कबूल असेल, व हिंसाकर्म हें नीच आहे असें मानणें असेल, तर मनुष्यांनीं नरमांस भक्षण करणें, ह्याइतकें हलकट, नीच, आणि द्वेष्य असें जगांत कर्मच उरलें नाहीं. कोंबडीं, बकरीं, गाई ह्यांचे मांसमय सांगाडेच्या सांगाडे भरबाजारांत राजरोस लटकलेले पाहतांना देखील असल्या लालचावलेल्या राक्षसी जिभेचा, आणि पाषाण हृदयी मनुजासुरांचा तिटकारा व त्वेष आल्यावांचून राहत नाहीं. मग जे प्रत्यक्ष मनुष्यमांसभक्षक असतील त्यांजविषयीं काय बरें वाटावें ?

आपणांस भोपळा किंवा फणस कापतांना, जसें कांहीं विशेष वाटत नाहीं, तसें खाटकांस भसाभस बकरीं, कोंबडीं, बैल, गाई, कापतांनाही कांहीं विशेष वाटत नाहीं! आणि इतर प्राण्यांचा जीव घेतांना खाटकांस जसें कांहीं वाटत नाहीं, तसेंच कित्येक रानटी लोकांस मनुष्यांचा जीव घेतांनाही विशेष वाटत नाहीं. **टेरा डेलफ्यूगो** (Tierra delfuego) येथील राहणारे जे लोक आहेत, त्यांची हिंवाळ्याच्या दिवसांत खाण्याची चणचण झाली कीं ते लोक कुत्र्यापेक्षांही निर्दयपणानें ह्मातार्‍या मनुष्यांस फाडून खातात. कारण कुत्रे सशाला किंवा हरणालाच मारतात पण **फिजिअन** लोक मनुष्याची किंमत सशापेक्षां किंवा हरिणापेक्षां अधिक समजत नाहींत. हरएक कृत्यांत मंगलदायक काय? तर नरमेध. ह्मणजे मनुष्यांचा बळी. राजाची लहानशी होडी जरी पाण्यांत ढकलावयाची असेल, तरी त्या समारंभास—हा आपला छोटासा समारंभ ह्मणून—त्या होडीच्या सुकाणूवर दहा मनुष्यांच्या रक्ताचें सिंचन करावें लागतें. त्यांच्यांत खून करणारा मोठासा अपराधी ठरत नसे. कारण खुनी ठरला, कीं फिजिअन लोकांस नवें खाद्य तयार झालें. कारण ह्या

भक्ष्याची गणना तेथें श्रेष्ठ पक्वान्नांत करीत. ते लोक मनुष्यमांसाचे इतके शोकी असत, कीं त्यांच्यांत एखाद्या पदार्थाची अत्यंत स्तुति करावयाची झाली तर "तो पदार्थ इतका कांहीं चांगला होता कीं, जसें कांहीं मनुष्यांचें मांस" असें ह्मणण्याचा त्यांच्यांत परिपाठ असे. तथापि गोरा मनुष्य त्यांस अगदीं आवडत नसे. ह्याचें कारण असें कीं, गोरे लोक तंबाकू फार ओढीत असल्यामुळें, त्यांच्या मांसास तंबाकूचा वास मारतो. आणि खलाशी लोकांवरून पाहिलें तर त्यांचें अनुमान खरें ठरतें. त्यांस बायका फार आवडत असत. आणि त्यांत त्यांचे कोपरावरचे हात, आणि मांड्या, फार आवडत. दक्षिण महासागरांतील कांहीं बेटांतील लोकांस तरुण मुलींचे पंजे आवडत असत. **न्यूझिलांड**मधील लोकांची पायांवर फार प्रीति असे. **फिजिअन** लोकांच्या राजेरजवाड्यांत मोठा मेजवानीचा वगैरे थाट झाला, तर पहिलें आणि मुख्य पक्वान्न नरमांस. लढाईंतलीं मनुष्यें खाण्यास पुरलीं नाहींत, तर ते लोक चांगले खाऊन पिऊन माजविलेले गुलाम, बाजारांत विकावयास आणीत. स्त्रियांचें मांस चांगलें लागतें असें ठरल्यामुळें, त्यांनीं तो पदार्थ खाऊं नये असा प्रतिबंध होता. **फिजिअन** लोकांस नरमांस भक्षण केल्यांत मोठी प्रतिष्ठा वाटत असे. ते जेव्हां जेव्हां आत्मस्तुति करूं लागत, तेव्हां तेव्हां मोठ्या दिमाखानें सर्वांस सांगत, कीं मीं अमुक मनुष्यें खाल्लीं आहेत. **राकीराकीचा राजा राऊंडे उंडरे** आपण ९०० मुडदे खाल्ले ह्मणून शेखी मिरवित असे. उत्तर **अमेरिकें**तील ताम्रवर्ण लोकांतही असाच अभिमान दृष्टीस पडतो. जेव्हां एखाद्या राष्ट्राशीं लढाई मारण्याचा प्रसंग येईल, तेव्हां ते आवेशानें ह्मणतात, "चला, चला, तें राज्यचें राज्यच खाऊन टाकूंया." हे लोक शत्रूच्या रक्ताची कढी करून ती पिण्यास शेजाऱ्यापाजाऱ्यांस मोठ्या समारंभानें आमंत्रण देतात. ही चाल प्राचीन कालांतील चालींपैकीं शिलकीची असावी.

**बटइन्लेट ट्राय** येथें सन १८६४ मध्यें **चिलकोटन** इंडिअन लोकांनीं **वाशिंगटन**च्या लोकांचे खून केले. आणि त्या सर्वांचीं काळिजें कापून काढून रानटी लोकांस खाऊं घातलीं. आणि आतां गोऱ्या लोकांच्या धैर्याचे ह्याप्रमाणें तुकडे झाले असें मानिलें. दुसऱ्या कांहीं जातींनीं शत्रूंचीं काळिजें कांहीं धान्याबरोबर कढईंत तळलीं, आणि

खाल्लीं. व दुसरे कित्येक लोक आंतील रक्ताचें सरबत करून घटाघट प्याले!*

**न्यूझिलांडांतील** योद्धे आपला शत्रु मारल्यावर त्याचें मस्तक छेदीत; आणि धडापासून निघालेलें रक्त **भीमसेना**प्रमाणें मोठ्या जयोत्साहानें प्राशन करीत.

आपण ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, रानटी स्थितींतील मनुष्यें आपणांइतकीं चोखाळ नसतात. आणि त्यांस खाण्यास हिडिस्स असा पदार्थ सर्व ब्रह्मांडांत देखील असेल कां नसेल याचा वानवाच. **न्यूसाउथ वेल्स** येथील राहणाऱ्या एका मनुष्यास आमच्या प्राचीन वस्तींतील कांहीं मनुष्यांनीं गांठलें, तेव्हां त्यानें लगबगीनें आपली होडी पाण्यांत ढकलली. पण त्या धांदलींत त्याचें जेवण किनाऱ्यासच राहिलें. तें त्याचें जेवण किती सुंदर होतें ह्मणून सांगावें!! त्यांतील मुख्य पक्वान्न ह्मटलें तर पाण्यांतील स्पंजासारख्या शेवाळींतील किडे!! ती शेवाळ आणि ते किडे ह्यांस इतकी कांहीं दुर्गंधी येत होती, आणि दिसण्यांत तर तीं इतकीं कांहीं हिडिस्स होतीं, कीं त्यांचें वर्णन सुद्धां करतां येणार नाहीं. तेव्हां अशा स्थितींतील मनुष्यांचा, एक मनुष्याचें प्रेत व्यर्थ गेल्यामुळें आत्मा तळतळेल हें उघड आहे, आणि ह्मणूनच त्यांच्यांतील कोणी मनुष्य आजारी पडल्यास, तो कापण्यापूर्वी मेल्यास आपला भक्ष्य व्यर्थ जाईल असें समजून ते त्याचा पूर्वीच प्राण घेत. कारण त्यास जिझूं दिलें, किंवा मरूं दिलें तर मांस फुकट जाणार!! हे लोक एकाद्या तरुण पुरुषास किंवा बायकोस, ती अंमळ आजारी आहे, अशी सबब काढून कापून मेजवानी करीत. व त्यांनीं आत्मसंरक्षणासाठीं कितीही सबबी सांगितल्या तरी ऐकत नसत. त्यांत आकस असला ह्मणजे तर बोलावयासच नको! प्रसंगोपात आईच्या स्तनापासून तिचें तान्हुलें खावयासाठीं कोणीं हिसकून घेतल्यास तीस तें निमूटपणें अर्पण करणें भाग पडे. आणि आत्मसंरक्षणासाठीं पोटची ममता, स्नेह, सर्व गुंडाळून ठेवावें लागे. बुडालेल्या तारवांवरून, आणि

---

* आमच्यांत भीमसेनानें रक्त प्राशन केल्याचें तर असोच, पण रा० रघुनाथराव पेशव्यांनीं दुराणीस मारून त्याचें रक्त पिण्यास हातांत घेतलें होतें. पण रणजीतशिंगानें हात धरला!!

वेढा पडलेल्या शहरांच्या कागदपत्रांवरून, जरूरीच्या वेळीं सुधारलेल्या लोकांनीं देखील ही घाणेरी चाल प्रचारांत आणल्याचें दिसून येतें.

खरोखर, कांहीं सत्तेच्या अधिकाराची धांव वाढतां वाढतां नरमांसा-पर्यंत देखील पोंचलेली आहे,* आमच्याच ह्या बेटांत भूगर्भशास्त्रज्ञास ज्या विपुल मनुजाति सांपडल्या आहेत, त्यांवरून खास ठरतें कीं, आमचे पूर्वज नरमांस भक्षक होते. **डायडोरस** आणि **स्ट्र्याबो** ह्यांच्या कारकीर्दीत **आयर्लंड**च्या लोकांनीं एकमेकांस स्नेहभावानें एकमेकांच्या घरांतील आजाऱ्याचें मांस उसनें मागितल्याबद्दल दाखला मिळतो. **सेंट जेरोमनें** तर स्वतां पाहिलेली गोष्ट सांगितलेली आहे. ती अशी—

**अटया कोटी** ह्मणून **स्कॉच** लोकांची एक जात आहे. ती आपला निर्वाह नरमांसावर करते. आणि तो पुढें सांगतो कीं "मी लहान असतांना **गॉल** येथें राहत असें. त्यावेळेस पाहिलें आहे कीं, तद्देशीय लोकांस धनगराच्या मांडींतील मांस फार आवडतें. आणि मोठ्या मेजवानींत उंचें पक्वान्न ह्मटलें ह्मणजे बायकांचीं तळलेलीं थानें!!!"

फार लांब कशाला? फ्रेंचांच्या राज्यक्रांतीच्या वेळीं एका कोळ्यानें **ल्यांबेल** राणीचें काळीज तोडून नेऊन शिजवून खाल्याचें आपण वाचलें आहे. पांच वर्षांच्यापूर्वीं (सन १८८० मध्यें)* सदरहू लेखकास (मूळ) एक खलाशी भेटला होता. त्यानें आणि त्याच्या आणखी चार सोबत्यांनीं मिळून आपल्या एका संवगड्यास फाडून खाऊन त्याचा फडशा पाडला!

ह्यावरून येवढें दिसून येतें कीं, आवश्यकता हें नरमांस भक्षणाच्या प्रघाताचें मूळ कारण होय. परंतु रानटी स्थितीमध्यें जनावराच्या मांसाची उणीव पडली, कीं मारला ह्यावर ताव!! **कयाथोलिक** धर्मांत तर उ-पोषणांत मासे पुरेनासे झाले, तेव्हां त्यांनींही खुशाल गुरांवर संक्रांत बसविली!! तसेंच ह्या जंगली माणसांच्या उपाध्यायांनींही, नरमांस-दानाची गणना महादानांत करून सोडली!! येवढेंच नव्हें, तर ते केवळ पशूंवरच निर्वाह करणाऱ्यांचा धिक्कार करूं लागले.

**बेकननें** एके ठिकाणीं नरमांसाविषयीं लिहितांना ह्मटलें आहे कीं "ते लोक नरमांस ह्मणजे आपलें साधारण अन्न असें समजत नाहींत, तर

---

* सदरहू लेख एका इंग्रजी ग्रंथाधारें लिहिला आहे, तेव्हां ह्यांतील आत्मपर आलेले उद्गार त्या इंग्रजांचे आहेत असें समजावें.

तें एक उंचें पक्वान्न असें समजून, जपून ठेवतात" आतां इतकें खचीत आहे कीं, कित्येक जंगली लोकांच्या जाति नरमांसाविषयीं इतक्या कांहीं आतुर असतात, कीं दुसऱ्या जातींतीलच नव्हेत, तर आपल्याच जातींतील लोकसुद्धां चोरून नेतात, आणि त्याचा स्वाहा करतात. एका जातींतील लोक दुसऱ्या जातींत गेले, आणि ते सुखरूप परत आले, अशी गोष्ट विरळा. **प्यायुअन** लोकांत तर हा धंदाच आहे कीं **टाप्युमनि** बेटांत कोणी मनुष्य गेल्यास, अथवा डोंगराखालीं उतरलेला पाहिल्यास, तो ह्मणजे परत जाईल ही गोष्ट दुरापास्तच !!!

नरमांसाच्या गोडीची सीमा मनुष्यमात्रांत इतकी प्रबळ कीं, देवास देखील नरमांसाइतका पवित्र आणि इष्ट पदार्थ दुसरा नाहीं. असें वाटतें मनुष्यास पशूंच्या बलिदानांत जसें त्याच्या जिवांचें कांहींच माहात्म्य वाटत नाहीं, तसें रानटी लोकांस मनुष्याचा बळी देतांना त्याच्याही जिवाचें कांहीं वाटत नाहीं. कारण जीव जाईना ! मांस गेलें नाहीं ह्मणजे झालें !

कित्येक वेळां अंगांत अवसर आणणारे लोक देखील, नरमांस भक्षण करतात. त्यांचा तो विधि इतका भयंकर आणि ओंगळ आहे कीं, त्या विषयावर चाल करतांना आमची लेखणी बोथट होते. मूळ यज्ञांस नरमांसाची गरज लागत होती; प्राणाची नव्हे. पण होतां होतां मांसावरची संक्रांत प्राणावर येऊन बसली.

**फिजिअन** लोकांस मनुष्यजीव ह्मणजे कःपदार्थ ! त्यांत कांहीं विशेष नाहीं. पण मांसांत सर्व कांहीं आहे. त्याच्याइतका **श्रेष्ठ** पदार्थ जगतांत नाहीं!

असो; वरील हकीगतीवरून मनुष्याच्या आंगांत एकदां क्रौर्याचें बीज उत्पन्न झालें, कीं, त्याचा परिणाम कोणत्या थरास जाऊन पोंचतो हें स्पष्ट कळून येतें. प्रथम ढेंकूण पिसा मारण्याची संवय होते; ढेंकूण पिसा मारण्यांत तरबेत झाल्यावर उंदीर घुशी मारावयास कांहीं दिक्कत वाटत नाहीं. उंदीरघुशींवरून मास मासळी; मास मासळीवरून कोंबडीं बदकें; कोंबड्या बदकांवरून शेळ्या मेंढ्या; शेळ्या मेंढ्यांवरून गाई ह्मशी. आणि शेवटची परीक्षा ह्मटली ह्मणजे मनुष्यहत्या. एवंच हा सर्व तामसप्रकृतीचा प्रभाव होय. ह्याकरितां प्रथमपासूनच आपल्या कोमळ स्वभावांत अदयत्वाचें बीजारोपण न होण्याविषयीं जपावें. गुजराथी लोकांत अहिंसा न करण्याविषयीं फार फार काळजी

घेतात. ह्याचें तरी बीज हेंच आहे. व ह्या गुणाबद्दल त्यांची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच होईल.

प्रस्तुतचा विषय अत्यंत अनुच्चारणीय आहे, ह्यांत संशय नाहीं. व असला विषय हातांत सुद्धां घेऊं नये, हें खरें. परंतु मानवजातीच्या क्रौर्याची सीमा कळावी, व यत्किंचित् सुखाकरतां जे लोक दुसऱ्याच्या प्राणहानीस कारणीभूत होतात, अशा लोकांच्या हृदयांस कांहीं अंशीं तरी द्रव यावा, ह्मणूनच ही माहिती दिली आहे. आतां सरतेशेवटीं आमच्या मनोगताचा अत्यल्पांश तरी सिद्धीस जावो, अशी परमेश्वराची मनोभावें प्रार्थना करून हें भ्रष्ट कलम फेंकून देतों.

## (१६) २१०० वर्षांचा वटवृक्ष.



बुद्धाची योग्यता, आणि त्याच्या धर्माचा विस्तार, ह्यांचें थोडेंसें

वर्णन आह्मीं त्याच्या दांताच्या वर्णनांत दिलेंच आहे. व ह्या धर्माचें एक मुख्यस्थान **क्यांडी** शहर आहे, हेंही सांगितलेंच आहे. **क्यांडी** शहराची रचना दिसण्यांत जशी मनोहर आहे, तसाच त्याचा बाह्यप्रदेशही फार मनोरम आहे. पुण्याजवळ जशी पर्वतीची टेंकडी आहे, तशी **क्यांडी**-जवळही एक टेंकडी आहे. ह्या टेंकडीवरून पाहिलें ह्मणजे भोंवतालचा देखावा अत्यंत चित्तवेधक दिसतो. तुडुंब पाण्यानें भरलेला एक भव्य तलाव; त्याजवरून गेलेला वर्तुळाकार सार्वजनिक रस्ता; एका हारीनें लागलेले सुंदर आणि चित्रविचित्र बंगले; जंगलांत शिरलेला **"लेडी हारटन्स वॉक"** नांवाचा प्रशस्त मार्ग; लहान लहान पर्वत श्रृंखळा; आणि दुतर्फा लागून गेलेली **डम्बेराची** भव्य थड; हीं इतकीं कांहीं चित्तास आकर्षण करून घेतात कीं, कसलाही दुःखी प्राणी असला तरी, तें पाहून त्याचें कांहीं वेळ तरी समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं. तशीच तेथें **महावेली** गंगा मोठ्या वेगानें वाहते, ती तुफान आलेली नागीणच चवताळत आहे कीं काय असा भास होतो.

शहरापासून सुमारें ३ मैलांवर **"पेरिटेनिआ"** नांवाची एक नानावनस्पति, व लताफलपुष्पयुक्त बाग आहे. तिचा विस्तार १५० **एकर** आहे. तिच्या सभोंवार नानाप्रकारचे गगनचुंबित वृक्ष आहेत. इंडिआरबर, ताड, माड, नारळी, पोफळी इत्यादि तुंग वृक्षांच्या दुतर्फा एकसारख्या रांगा लागून राहिल्या आहेत. मध्यें एक भव्य ताडांचें बन असून, त्याच्या दोन्ही बाजूंकडून नदीचा विळखा आहे. आणि सर्व पासून, त्यावर कळकींच्या झाडांचा मंडप झालेला आहे. ह्या मैदानांतच **सिंगलीज** लोकांचा अति प्राचीन व अजस्र वटवृक्ष आहे. ह्यास बौद्धधर्मी लोक फार पूज्य मानतात.

तद्धर्मी लोक सांगतात कीं, **बुद्धानें** स्वतः सांगितलें आहे कीं, हा वृक्ष ही माझ्या धर्मवृद्धीची खूण आहे. माझा धर्म आहे तावत्काल हा वृक्ष ही असणार. आणि त्याच्या शाखा जसजशा वृद्धिंगत होतील तसतशा माझ्या धर्माच्याही शाखा वृद्धिंगत होतील. हा वृक्ष कांहीं अंशीं वटवृक्षासारखाच आहे. पण शुद्ध वट नव्हे. वडास पारंब्या फुटतात;

१. अशाच तऱ्हेची महाराष्ट्र देशांत बत्तीसशिराळें येथें एक चमत्कारिक चिंच आहे तीस "गोरख चिंच" असें म्हणतात. ही गोरख ह्या नांवाच्या साधूनें लावली आहे असें

तशा ह्यास नाहींत. ह्याचीं पानें इतर वडांप्रमाणें बदामी आकाराचीं असून, त्यांचे देंट इतके बारीक असतात कीं, त्यामुळें तीं अहोरात्र हालत असतात. जणूं काय तीं बुद्धाच्या वेळचें वैभवच आनंदातिशयानें सर्वांस जाहीर करतात असें वाटतें.

ह्या झाडांपैकीं पहिलें झाड **मगध** देशाचा राजा **अशोक** ह्यानें प्रथम **सिलोनांत** पाठविलें. ही ढाळी **उरूवेला** येथील वृक्षाची होती. आणि ती इ. सनापूर्वीं २४९ व्या वर्षीं पूर्वींची जुनी राजधानी अनराजापूर येथें लावली गेली. ह्यावरून पाहतां हा जगांतील अत्यंत प्राचीन वृक्ष होय. आणि **सिलोनास** ह्या जातीचे वटवृक्ष जे सारे पसरले आहेत, ते सर्व ह्याचींच अपत्यें होत. हल्लीं ह्याच्या भोंवतीं तट बांधून आवार केलें आहे. आणि महाद्वारापाशीं चढण्याउतरण्यास दगडांच्या पायऱ्या बांधल्या आहेत.

ह्या पवित्र वृक्षाच्या दर्शनार्थ **चिनांतून** व **जपानांतून**ही यात्रा येते. ह्याच्या उजव्या हातास जो स्तंभ आहे, तो **इरारी** राजाचा स्मारक आहे. ह्या राजानें सर्व मलबार जिंकून मोठ्या न्यायानें आणि धिमेपणानें राज्य केलें होतें. हा राजा इ. स. पूर्वीं १६० व्या वर्षीं येथें लढाईंत पडला. त्यानें जो पराक्रम केला, व जें शौर्य गाजविलें, तत्प्रीत्यर्थ हा स्तंभ उभारला गेला आहे. व त्यास अद्यापिही लोक फार मान देतात. आसोपासाच्या मोडकळींत एक प्राचीन मोठा कोरींव कामाचा पाषाण आहे. हा दरवाज्यावरील अर्धवर्तुळाकृति कमानीच्या आकाराचा दिसतो. ह्याच्यामध्यावर सुंदर आणि ढबदार पाकळ्यांचें क-

---

ह्मणतात. हिचें चिंचेशीं मुळीं सारखवट नाहीं. चिंचेच्या वृक्षाचा वर्ण काळसर असतो. हे वृक्ष पांढऱ्या रंगाचे आहेत. चिंचेचीं पानें अतिशय बारिक असतात. ह्या चिंचेचीं पानें चांगलीं वडाच्या पानायेवढीं मोठीं असतात. ह्याच्या चिंचा (फळें) तर फारच विलक्षण असतात. त्या घोसाळ्याच्या आकाराच्या असून त्यांत चिंचोका वगैरे कांहींएक नसतो. हीस गोरखचिंच असें ह्मणतात. जो कोणी गोरखनाथाच्या यात्रेस बत्तीसशिराळ्यास जाईल, त्यानें परत येतांना येथील एक चिंच (फळ) आणावी अशी चाल आहे. ही चिंच कोणी पवित्र समजून देव्हाऱ्यांत ठेवून तिची पूजा करतात. कित्येक औषधींत हिचा फार उपयोग होतो. गोरखचिंचेचें बत्तीसशिराळ्यांत मात्र ५।६ वृक्ष आहेत. हे वृक्ष दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं आढळत नाहींत.

मळ कोरलें असून, वरच्या ह्मणजे शेवटच्या खणांत हत्ती, मृग, कुत्रे, ससे, वगैरे जंगली जनावरें पळत सुटलीं आहेत असें दाखविलें आहे. व मधील आखणांत हंसपंक्ति वेगानें धांवतात असें दाखविलें आहे. ह्याशिवाय अनेक तऱ्हेचें वेलपत्तीचें काम, ह्या दगडावर फारच सुरेख कोरलेलें आहे.

## (१७) विजातीयकुत्रा.

सुमारें सत्तर वर्षां पूर्वी म्यान्चेस्टर येथील राहणारी एक स्त्री, एका प्रसंगीं ब्ल्याकले ह्मणून एक तीन मैलांवर खेडें होतें, तेथें जावयाची होती. ती उन्हाळ्यांत एके दिवशीं एकटीच ऐन दोन प्रहरीं जाण्यास निघाली. परंतु मनांत कांहींशी भ्यालेली होती. शहर सोडून बरीच दूर गेल्यावर एकाएकीं तिला एक भल्ला मोठा धिप्पाड कुत्रा दिसला. आणि त्याच्या चर्येवरून व पुच्छ हलवण्यावरून तो आपणांशीं लाडिकपणा करतो असें तिला वाटूं लागलें. तिनें त्यास हांकून लावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तो कांहींकेल्या जाईना. शेपटी हालवीत हालवीत तिच्या मागेंच जाऊं लागला. तिची पाठ ह्मणून सोडीना. ती आपल्या पाहुण्याच्या घरीं गेल्यावर हा कुत्रा दरवाजाच्या पायरीवर तिची वाट पहात बसला. दरवाजांतून येणारे जाणारे सर्व लोक तीस विचारीत कीं, हा कुत्रा तुमचा कीं काय ? तिनें सांगितलें, नाहीं. नंतर तिनें त्याबद्दलची घडलेली गोष्ट मंडळीस सांगितली. त्या बरोबर जो हशा पिकला तो काय सांगावा ! त्यांनीं त्या कुत्र्यास आंत बोलाविलें. पुष्कळ भवति न भवति झाली. शेवटीं ती जाण्यास निघाली तेव्हां तो कुत्राही तिच्या बरोबर शेपूट हालवीत हालवीत सवईच्या कुत्र्याप्रमाणें तिच्या मागोमाग निघाला. सायंकाळच्या सुमारास थंडीच्यावेळीं तो मोठ्या आनंदानें तिच्या बरोबर चालत होता.

अंमळ काळोख पडला होता, व ती स्त्री एका अरुंदशा रस्त्यांतून चालली होती. इतक्यांत कुत्रा जवळच्या आजूबाजूंच्या झाडांझुडांत घुसून किंचित् गुरगुरूं लागला ! भोंकूं लागला ! व त्याची वृत्ति कावरी बावरी दिसूं लागली. शेवटीं शेवटीं तर तो तिच्या पायांतून पायांतून घोटाळूं

लागला. त्यास शांत करण्याकरतां त्या बाईनें चुचकारून पाहिलें; गों-जारून पाहिलें; भाकरीचा तुकडा देऊन पाहिला. नानाप्रकार केले. पण तो शांत होईना. त्याचा राग अधिक अधिकच वाढूं लागला. तेव्हां ती बाईही घाबरल्यासारखी झाली. इतक्यांत त्या झाडींतून एक दांडगा मनुष्य नागवा सुरा हातांत घेऊन बाहेर आला. त्यास पाहतांच ह्या बाईनें किंकाळी फोडली. आणि तो कुत्रा त्या मनुष्यावर झडप घालून त्याच्या छातीवर बसला. त्या मनुष्यानें त्या बाईस तूं आपल्या कुत्र्यास बोलाव ह्मणून पुष्कळ आरडा ओरड केली. परंतु व्यर्थ. कारण तीस कुत्र्याचें नांव माहीत नव्हतें. ती कोणी तरी मनुष्य दृष्टीस पडेल या आशेनें पुढें धांऊं लागली. इतक्यांत कुत्र्यानेंही तीस गांठलें, आणि तिच्या बरोबर ममतेनें वागडत चालूं लागला. ह्याप्रमाणें तीं दोघेंही चालत असतां ज्या जागीं पूर्वीं कुत्रा भेटला त्या जाग्यावर येऊन पोंचतांच तो कुत्रा एकाएकीं गुप्त झाला. आणि त्या नंतर तो पुन्हां दृष्टीस पडला नाहीं ! !

---

# (१८) २२०॥ रुपयांचा शब्द.

## अथवा

## क्विझ् (Quiz) शब्दाची चमत्कारिक उत्पत्ति.

कोणताही अर्थविरहित, जो कधींकोणीं ऐकलेला नाहीं, असा शब्द, एकाएकीं कोणाच्यानें प्रचारांत आणवेल काय? कधीं आणवणार नाहीं. कारण सारे लोक का कुणाच्या हुकमांत आहेत? नाहींत. तेव्हां अशी गोष्ट होणें केवळ अशक्य आहे असें वाटतें. तरी ती एका गृहस्थानें शेवटास नेली. तो प्रकार असा. इ०स० १७९१ त **दब्लिन** येथील **स्मोक आले**; ह्या नांवाच्या थिएटरचा मालक **रिचार्ड डार्ली**; ह्यानें एक चमत्कारिक पैज जिंकून वर लिहिलेल्या **क्विझ्** शब्दास अजरामर केलें. एवढेंच नव्हें, तर **डार्ली** स्वतःही त्या शब्दाबरोबर अजरामर झाला. कारण जोंपर्यंत वरील शब्द कोशांत आहे, तावत्कालपर्यंत डालीच्या नांवाची स्मृति असणारच. त्याचा वृत्तांत येणेंप्रमाणें:—

वरील थिएटरांत एका रात्रीं एका सोंगाड्यानें एक विलक्षण शब्द उच्चारिला ! त्याचा अर्थ कोणासच कळला नाहीं. तेंव्हां अर्थातच प्रेक्षकांची टाळी पडून जिकडे तिकडे हशा पिकला. आणि खेळ आटोपल्यानंतर कांहीं थोड्या उरलेल्या मंडळींत पुन्हां त्या विषयावर वादविवाद सुरू झाला. पुष्कळ भवति न भवति झाल्यानंतर त्या मंडळींत **अंडरमन मान्की के** ह्मणून कोणी एक गृहस्थ होता, तो मोठ्यानें ह्मणाला, कोणी नवाच अन्वर्थक शब्द उत्पन्न करील काय? कीं तो एका आठवड्याच्या आंत या साऱ्या **दब्लिन** शहरवासी लोकांच्या तोंडीं व्हावा. व एक महिन्याच्या आंत, त्यास कांहीं तरी अर्थ प्राप्त होऊन तो सर्वांच्या उपयोगांत यावा. ह्यावर कांहीं वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं. पण अंमळ वेळानें **डाली** उठला, आणि त्यानें मोठ्या आवेशानें विचारिलें:—बरें, तसें झाल्यास आपण काय द्याल? वरील गृहस्थ ह्मणाला एकवीस गिनी (२२०॥ रु०) देतों. **डाली** ह्मणाला द्या हवाला. वरील गृहस्थानें कबूल केलेली रक्कम लगेच अनामत ठेवली. सर्व मंडळी थिएटरांतून निघून गेल्यावर, **डालीनें** पांच पंचवीस कागदाचे तुकडे घेऊन, त्या प्रत्येकावर Quiz हा निरर्थक शब्द लिहिला. आणि कितीएक चुनखडूचे तुकडे मागविले. व थिएटरांतील सर्व कामदार, ह्मणजे हुजरे, सुतार, गडी, माणसें, कामाठी ह्या सर्वांस त्यानें हाक मारून प्रत्येकास एक एक कागदाचा तुकडा, व कांहीं खडूचे तुकडे त्यांस देऊन रात्रीच्या रात्रीं ताकीद दिली, कीं सर्वांनीं आतांच्या आतांच गांवांत जावें, आणि उजाडेपर्यंत होईल तितक्या घरांच्या दरवाजांवर हा शब्द लिहावा. सर्व कामदारांनीं ती कामगिरी उत्तम बजाविली.


सकाळच्या प्रहरीं नगरवासी पहातात, तों प्रत्येकाच्या दारावर एक चमत्कारिक शब्द ! ! ह्या शब्दाचा अर्थ काय, कोणीं लिहिला असावा, ह्यांत लिहिणाराचा हेतु काय असावा, वगैरे विपर्यां कांहींच अनुमान

न झाल्यामुळें सर्व लोक अगदीं बचकळ्यांत पडले!! कोणी ह्मणत, हें कोणा रिकामटवळ्याचें काम असावें. कोणी ह्मणत, छे! रिकाम्याचें हें कामच नव्हे. रिकामा मनुष्य रात्रीच्या रात्रीं एवढी उठाठेव कशाला करणार? तें कांहीं नव्हे. ह्यांत कांहीं तरी गूढ असलें पाहिजे. कोणी ह्मणत हें मानवी कृत्यच नव्हे!! कोणी ह्मणत, हा कोणी बंडवाल्यांचा सांकेतिक शब्द असावा. कोणी ह्मणत, ह्या शहरीं एक गुप्त मंडळी स्थापन झाली आहे. तिचें हें नांव असावें.

ह्याप्रमाणें दुसऱ्या दिवसापासून हजार लोकांच्या हजार कल्पना सुरू झाल्या. सर्व शहरांत जिकडे पाहवें तिकडे ह्याच गोष्टी सुरू! ज्याच्या त्याच्या तोंडीं "क्विझ्". एका आठ दिवसांत क्विझ् शब्द अगदीं बायका-मुलांच्या सुद्धां तोंडीं झाला. आणि हें प्रकरण काय असावें ह्मणून जो तो चौकशी करूं लागला. अखेर सर्वांस समजलें कीं, ह्या शब्दांत कांहीं-एक अर्थ नाहीं. ती केवळ थट्टा होय. इतकें झालें खरें, तरी पुढें त्यास अर्थ प्राप्त झाला. तो कोणचा? तर थट्टा. किंवा फसवणूक! कोणीं कोणास ठकविलें कीं, तेथें क्विझ् शब्दाचा उपयोग लोक करूं लागले. तेणेंकरून अर्थातच, तो शब्द प्रचारांत आला. आणि कांहीं कालानें तो इंग्रजी कोशांतही येऊन बसला. ह्याप्रमाणें आज हा ठकबाजी, किंवा फसवणूक असा अर्थ देणारा शब्द सुमारें १०० वर्षांपूर्वीं केवळ निरर्थक (Q-u-i-z) असा होता. **वेबस्टरनें** ही गोष्ट आपल्या थोरल्या कोशांतही संक्षेपानें लिहिली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# (१९) विमान.



सांप्रत कालीं जमिनीवरून प्रवास करावयास अत्यंत सुखकर, नियमित, व शीघ्रवाहक, अशा आगगाड्या झाल्या आहेत. समुद्रांतून प्रवास करावयास अत्यंत सोईकर, भक्कम, आणि सुरक्षित आगबोटी झाल्या

आहेत. आतां हवेंतून प्रवास करण्यासाठीं विमानें तयार करण्याच्या खटपटींत उद्योगी लोकांचें लक्ष्य लागलें आहे. आणि त्या कामांत सर्वांशीं नाहीं तरी, बऱ्याच अंशानें यश आलें आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. व थोड्याच कालांत मनुष्यें सुखानें अंतरिक्षांतून प्रवास करतील, हीही गोष्ट कांहीं असंभवनीय नाहीं. कारण प्राचीन कालीं ही कला प्रचारांत होती असें दिसतें. विमान हा शब्द पूर्वींचा आहे. त्यास घंटा वगैरे लावून तें सुशोभित केलेलें असे, असें वर्णन आहे. दाशरथी **रामचंद्र** लंकेहून विजय करून अयोध्येंत आले, ते **पुष्पक** विमानांतून. असें असतां कालांतरानें ही कला अस्तंगत कशानें झाली, समजत नाहीं.

हवेंतून गमन करतां यावें, ही मनुष्याची इच्छा कांहीं आज कालची नाहीं. ह्या बाबतींत कित्येक शतकें मनुष्यांची खटपट चालूच आहे. पूर्वीं निरनिराळ्या काळांत निरनिराळ्या लोकांनीं यांत्रिक कलेचे पंख तयार करून, त्यांच्या योगानें पांखरांप्रमाणें आकाशांत संचार करण्याविषयीं अनेक प्रयत्न केले. पण ते सर्व निष्फळ झाले. पक्ष्यांचें शरीर हलकें आहे. आणि त्यांचे पंख जोरदार व भक्कम स्नायूंच्या योगानें हालविले जातात. मनुष्याचें शरीर पक्ष्यांपेक्षां फार जड आहे. आणि तें तोलून धरण्या येवढे पंख हालवावयास हातांचा जोर पुरत नाहीं. डाक्तर जान्सननें आपल्या "रासेलस" नामक कादंबरींत अशा युक्तीचा परिणाम, आणि तिच्या योजकांचा फज्जा कसा उडाला, तें सुरेख रीतीनें व्यक्त केलें आहे.

तेल पाण्यावर टाकलें, तर तें तरंगतें. कारण तें पाण्यापेक्षां फार हलकें आहे. हवा तापविली, तर ती साधारण हवेपेक्षां हलकी होते, आणि वर जाऊं लागते. विवक्षित पात्रांतील हवा, त्यांत जाळ करून तापविली असतां, ती धुराच्या रजःकणांसहवर्तमान साधारण हवेच्या वर वर जाऊं लागते. ह्याच तत्वावर विमानाचे प्रयत्न चालू आहेत. सन १७८२ मध्यें **'मांट गोल फीर'** ह्या नांवाचे दोन कागदाचे कारखानदार होते. ह्यांनीं आपल्या कारखान्यांत कांहीं कारणासाठीं एका थैलींत उष्ण हवा भरली. तेणेंकरून असा चमत्कार झाला कीं, ती थैली तेथील आढ्यास जाऊन लागली. तीच कल्पना मनांत धरून

त्यांनीं महाप्रयत्नानें एक मोठें विमान तयार केलें, आणि सोडलें. तें उंच गेलें. त्यामुळें त्यांस पुष्कळ धीर आला. आणि पुन्हां त्यांनीं सन १७८३ च्या जून महिन्यांत पसतीस फूट व्यासाचें आणखी एक विमान तयार केलें. आणि हजारों लोकांसमक्ष आकाशांत सोडलें. तें १७०० फूट उंच गेलें! हें विमान खरबरीत तागाच्या कापडाचें करून, वरून त्यास कागद लावले होते. त्याच्या तळाशीं लोकर व गवत पेटवून हवा तापविली होती. प्रथमतः विमानांत बसण्याचें कोणास धैर्य होईना. ह्यास्तव एक बकरा, एक कोंबडा, आणि एक बदक पाठविलें होतें. त्यांस बसावयास पिंजरे केले होते. हे प्राणी जेव्हां सुरक्षित खालीं उतरले, तेव्हां सन १७८३ च्या नोवेंबरांत वरील प्रमाणेंच एका मोठ्या विमानांत बसून दोन फ्रेंच मनुष्य गेले. ते २७ मिनिटें अंतरिक्षांत होते. व पारीस शहरच्या चांगल्या प्रदेशावरून फिरले. विमानांत मनुष्यें बसल्याचा पहिला प्रसंग हाच.

हा समारंभ फारच मोठ्या थाटाचा झाला. तो पाहाण्यास शेंकडों कोशांवरून लोक आले होते. आणि त्यांच्या मेळ्यानें पारीस शहर अगदीं फुलून गेलें होतें. प्रथमतःच विमानांत बसून आकाशांत जाण्याचें ज्या दोन फ्रेंच मनुष्यांनीं कबूल केलें, त्यांचीं नांवें **मारक्कीस डी आरल्यान्डस;** व **एम् पिलेट रोझियर** अशीं होतीं. ज्या दिवशीं हा प्रयोग करून पाहाण्याचें ठरलें होतें, त्या दिवशीं आकाशांत थोडथोडीं ढगें होतीं. वारा वायव्य दिशेनें वाहत होता. दोन प्रहरीं बारा वाजून आठ मिनिटें झाल्यानंतर तोफ झाली. व असें सुचविण्यांत आलें कीं, विमान धुरानें भरत आलें. विमानांत बसूं ह्मणून कबूल केलेले गृहस्थ हजर होतात किंवा नाहींत, हा लोकांस मोठाच संशय होता. व वाराही अंमळ जोराचा होता तरी, सदरहू दोन्ही गृहस्थ तोफ झाल्यापासून आठ मिनिटांच्या आंत गाडींत बसून येऊन विमानापाशीं हजर झाले.

प्रथमतः विमानाच्या दोऱ्या धरून, तें खालवर सोडून पाहिलें व किती ओझें त्यास सहन होईल, सर्व बरोबर आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींचा चांगला तपास केला. आणि विमान सोडलें. परंतु त्याच्या ऊर्ध्व गमनास वाऱ्याचा प्रतिबंध झाला. आणि रस्त्याच्या बाजूस एक

वाग होता त्याकडे त्याचा कल झुकला. विमानास बऱ्याच लांब लांब दोऱ्या खालीं सोडलेल्या होत्या. त्यास धरून तें पुन्हां खालीं उतरलें. आणि सुमारें दोन तासांत तें पुन्हां सरळ केलें. ग्यास भरून पूर्ण तयार होण्यास ४९ मिनिटें लागलीं. नंतर वरील दोन गृहस्थ आंत बसल्यावर पुन्हां सोडलें. तें उत्तम रीतीनें अंतरिक्षांत चढलें. सुमारें २७० फूट उंच गेल्यावर आंतील उतारूंनीं आपल्या टोप्या काढून सर्व प्रेक्षकांस मुजरे केले. त्या समयीं कोणाचेंही अंतःकरण भयानें आणि आश्चर्यानें गुंग झाल्यावांचून राहिलें नाहीं. नंतर थोड्याच अवकाशांत उतारू दिसेनासे झाले. परंतु विमान आकाशांत भ्रमत होतें. व त्याची ती बिंदुमय रमणीय आकृति सर्वांच्या नेत्रांस संतोषवीत होती. तें २००० फूट उंच गेलें होतें. तरी अदृश्य झालें नाहीं. पारिसांतील चांगल्या चांगल्या प्रदेशावरून तें चालत होतें. उतारूंस आपला प्रयत्न सफळ झालेला पाहून किती संतोष वाटला असेल? थोडा वेळ गेल्यावर उभयतांनीं विमान खालीं उतरण्याचें मनांत आणलें. बरेंच खालीं आलें, तेव्हां तें चांगल्या ठिकाणीं उतरत नाहीं असा त्यांचा कयास झाला. तेव्हां थोडें वर चढविण्यासाठीं त्यांनीं आग पेटविली. आणि त्याचा वेग वाढवून ते सर्व पारीस शहर ओलांडून पलीकडे गेले, आणि एका मैदानांत सुमारें दोन मैलांवर सुखानें खालीं उतरले. उतरतांना त्यांजपाशीं दोनतृतियांश सर्पण शिल्लक राहिलें होतें.

ह्या विमानाची उंची ७० फूट असून, ४९ फूट त्याचा व्यास होता. आंतील अवकाश ६०००० घनफूट असून, तें १६०० पासून १७०० रत्तल वजन नेण्यास समर्थ होतें. ह्या विमानामागून हजारों लोकांनीं हजारों विमानें उडविलीं. सन १७८५ मध्यें तर **ब्ल्यांचर्ड** या नांवाचा मनुष्य विमानमार्गानें फ्रान्स व इंग्लंड ह्यांमधील समुद्र ओलांडून गेला. पुढें शंभर वर्षांनीं तर ह्या कामास पुष्कळ लोक सरसावले. सन १८५९ मध्यें अमेरिकेंतील एक मनुष्य एका तासांत ११९० मैल विमानांत बसून गेला. आजपर्यंत विमानमार्गानें सर्वांत दूरचा प्रवास हाच होय. मिस्तर **ग्लेसर** हा इंग्रजी मनुष्य साडेसात मैल—ह्मणजे हिमालयाच्या दीडपट उंच—गेला होता!! तेथें बाटलींतील शाई आपोआप गो-

टून जाई ! आणि एखादा सजीव पक्षी तेथून सोडला तर दगडासारखा धाडकर जमिनीवर आपटे ! ! !

शेंकडों मुलें आकाशदिव्यासारखा एक मजबूत फुगा करून त्याखालीं जाळ लावून, आंतील हवा तापवून विमानें उडवितात. ह्या विमानांतील जाळ कमी होऊन हवा थंड झाली, कीं तीं तत्काळ कोसळून खालीं पड-तात. खालीं जाळ लावून विमान उडविण्याचें मोठें जोखमाचें काम आहे. गवती घरावर पडल्यास घर जळण्याची भीति. ह्याकरितां आलीकडे त्यांत एक अति हलका वायु घालण्याची युक्ति काढली आहे. साधारण तीन फूट औरस चौरस पेटींतल्या हवेचें वजन एक शेर भरतें. आणि हैड्रोजन ह्मणून एक ग्यास ह्मणजे वायु आहे, तो वजनांत इतका हलका आहे कीं, वरील पेटींतल्या ग्यासाचें वजन दोन तोळे भरेल न भरेल ! ! ह्यामुळें तापविलेल्या हवेपेक्षां हैड्रोजनानें भरलेलें विमान उत्तम चढतें. स्वच्छ हैड्रोजन तयार करणें फार कठीण आहे. विमानांत भरण्यासाठीं जो हैड्रोजन तयार करतात तो तितका शुद्ध नसतो. साधारणच असतो. व तो उत्पन्न करण्यास फारशी खटपटही पडत नाहीं. हा जरी खऱ्या हैड्रोजनाइतका हलका नसतो, तरी विमान उडविण्यास हाच कामी लावतात.

विमान रेशमाचें करतात. व त्याचा आकार लंब मौक्तिकासारखा असतो. आंतील धूर बंदोबस्तानें रहावा ह्मणून त्यास पक्कें वारनीस केलेलें असतें. सर्व विमानावरून एक जाळ्याचें आच्छादन घालून त्याचे सर्व बंद खालच्या एका कड्यास बांधलेले असतात. आणि एक चांगल्या फोकाची झोळीच्या आकाराची, मनुष्यास बसावयासाठीं के-लेली टोपली त्याच कड्यांस गच्च बांधलेली खालीं लोंबत असते. जा-ळ्याच्या योगानें झोळीचें वजन सर्व विमानावर सारखें पडतें. असें कीं तेणेंकरून विमान फाटूं नये, किंवा एकारूं नये. पाळण्यामध्यें किंवा डोळीमध्यें दोन तीन मनुष्यें, व कांहीं वाळूनें भरलेल्या थैल्या रहाण्या पुरती जागा असते.

विमान प्रथम दोऱ्यांनीं घट्ट बांधून त्यांत ग्यास भरतात. जसजसा त्यांत ग्यास भरूं लागतो, तसतसें तें वर उठण्यास जोर करूं लागतें. आंत ग्यास पूर्णपणें भरून साऱ्या दोऱ्या जोरानें ताणल्या, कीं प्रत्येक

दोरीपाशीं एकेक असामी हातांत तरवार घेऊन उभा राहतो. व विवक्षित खूण होतांच प्रत्येक असामी झटकर एका फटकाऱ्या बरोबर आपआपली दोरी तोडतो. दोऱ्या तुटतांच विमान अंतरिक्षांत जाऊं लागतें. विमानास कांहीं लहान मोठ्या खिडक्या केलेल्या असतात. आंत बसणारास जेव्हां विमान खालीं उतरावयाचें असेल, तेव्हां तो त्या खिडक्यांपैकीं एक खिडकी खुली करतो. ह्मणजे तींतून ग्यास बाहेर जाऊन, विमानांत जड हवा भरते. आणि तें खालीं खालीं येऊं लागतें. समुद्रावर किंवा कड्यावर अशाच दुसऱ्या अडचणीच्या ठिकाणीं विमान उतरण्याच्या बेतास येईल, तर आंतील लोक वाळूच्या थैल्यांपैकीं कांहीं थैल्या खालीं टाकून विमान हलकें करतात ह्मणजे तें पुन्हां वर चढतें. ह्याप्रमाणें ह्या दोन युक्तींनीं विमान खालीं व वर जाऊं शकतें. परंतु त्यांत न्यून हें आहे कीं, कोणत्याही इच्छित दिशेस तें वळवितां येत नाहीं. कारण त्यास सुकाणू नाहीं. तेवढें साधलें ह्मणजे आगगाड्या, व आगबोटी ह्यांचें तेज कमी होईल, असा रंग दिसतो.

**एम् ब्ल्यांचर्ड** यानें प्रथमच विमानानें समुद्र ओलांडला. तो जेथें जमिनीवर उतरला, तेथें एक जयस्तंभ उभारलेला आहे. गेल्या शतकांत ज्या अद्भुत गोष्टी घडून आल्या, त्यांतील ही एक होय.

---

# (२०) बर्फांत गढलेली बाई.

इ. स. १७९९ फेब्रुवारीच्या दुसऱ्या तारखेस सूर्यास्तानंतर गर्द काळोख पडला असतां, **इलिझाबेथ वुडकाक** नामें सुमारें ४२ वर्षांच्या उमरीची शेतकऱ्याची बायको केम्ब्रीजचा बाजार करून घोड्यावर बसून **इम्मींगटन** येथील आपल्या घराकडे येत होती. सुमारें सहा सात वाजण्याचा अदमास होता, तेव्हां ती आपल्या घरापासून अदमासें अर्ध मैलावर येऊन पोंचली. इतक्यांत एक तेजोमय तारा आकाशांतून पतन पावला. त्यासरशी घोडा व वर बसणारीण दोघेंही दचकलीं. घोडा जो बुजाला तो बेफाम होऊन आड रस्त्यानें वांकडा तिकडा पळूं लागला. पळतां पळतां जेव्हां तो एका बर्फाच्या खाचींत शिरला, तेव्हां **इलिझाबेथ** झटकर खालीं उतरून त्यास धरूं लागली. परंतु तो तिच्या हातां-

तून तेथूनही निसटून मोठ्या मैदानांत शिरला. तीही त्याच्या मागें धांवूं लागली. पण तो कसचा तिला सांपडतो! आणि तशांत ती बोलून चालून अबला! वाटेंत तिचा एक जोडाही हरवला. शिवाय घरगुती सामानानें भरलेली मोठी टोपली हातांत होती, त्यामुळें तिला फारच अडथळा झाला. तरी तितक्यांतूनही तिनें घोड्यावर नजर ठेवून पाव मैल सुमार बर्फ तुडविला. पण सरशेवटीं तिची मजल थकली. तिला दम छाटेनासा झाला; तरी तिनें अखेर घोडा धरला. आणि त्यास धरून ती हळू हळू घराकडे चालली होती. पण शेवटीं शेवटीं अगदीं थकली. तिचे हात गारठ्यानें बधिर झाले. लगाम धरण्याची शक्ति उरली नाहीं. हातांतलें ओझेंही सुटून पडलें. आणि ती बर्फाच्या प्रवाहांत सांपडून ह्मणाली "हे बुडव्या, तुला आतां मजवांचूनच घरीं गेलें पाहिजे; कारण मला कांहीं आतां पुढें येववत नाहीं" इतकें बोलून ती झटकर खालीं बसली!!

बर्फाचा प्रवाह जोरानें सुरू होता. आठ वाजतांना शहरच्या देवालयांतील घांट वाजली. त्या वेळीं त्या बिचाऱ्या शेतकरणीच्या डोक्यावर सुमारें दोन फूट जाडीचा बर्फाचा थर झाला. तेव्हां अर्थातच ती बर्फांत पुरली गेली, हें सांगणें नकोच. सर्वांग बधिर होऊन गेलें होतें. तेथें झोंपेचें नांव कशाचें? सकाळच्या प्रहरीं थोडें थोडें बर्फ वितळून तिच्यावर सुमारें अर्ध फूट व्यासाचें एक छिद्र पडलें. तेव्हां इलिझाबेथ हिनें एक युक्ति काढली. ती ज्या झुडपापाशीं बसली होती त्या झुडपाची एक फांदी घेऊन त्यास तिनें आपला हातरुमाल बांधला. आणि ती फांदी त्या भोंकांतून वर घातली. ह्याप्रमाणें तिनें आपल्या संकटाचा झेंडा वर लावला; आणि त्या ढाळीनेंच हळू हळू तें छिद्र साफ करून, मध्यंतरीं असलेला सर्व आडपडदा काढला. व दोन फुटींहून अधिक लांबीचें द्वार साफ केलें!! ह्यापासून फारसा जरी तीस उपयोग झाला नाहीं, तरी बाहेरील यत्किंचित् हवेनें तिच्या अंगाचा बधिरपणा किंचित् कमी झाला.

ह्याप्रमाणें ती केवळ निराहार व निराश्रित; तिला हालावयास येईना व बोलावयास येईना. दररोजच्या देवळांतील घंटा, व रविवारच्या घंटा तीस ऐकूं येत होत्या. दिवसाच्या घंटा ऐकूं येत. पुन्हां रात्रीच्याही घंटा ऐकूं येत. ह्याप्रमाणें एक एक दिवस चालला होता. तिनें देव-

ळांतील सर्व घंटा ऐकिल्या. तासाचा प्रत्येक ठोका तीस ऐकूं येत होता. रस्त्यावरून जाण्याऱ्या गाड्यांचीं चाकें, घोड्यांच्या टापा, कुत्र्यांची भोंक; गुरांचें हंबरणें, आणि मेंढरांचे शब्द सुद्धां तीस स्पष्ट ऐकूं येत होते. नंतर तिनें आपली तपकीरीची डबी बाहेर काढली. व दोन चिमटेही घेऊन पाहिले. परंतु ते अंगांस फारच थोडे जाणवले. सर्व गोष्टींनीं उपाय हरला! दिवस मावळला ह्मणजे रात्र यावी; आणि रात्र संपली ह्मणजे दिवस यावा. असा क्रम सुरू झाला. एके दिवशीं दोन वडार आपल्या सांडलेल्या गाढवाच्या संबंधानें बोलत बसले होते, तें बोलणें तिनें स्पष्ट ऐकिलें. दुसरे दिवशीं तिचा डावा हात सुजूं लागलासा वाटल्यावरून तिनें दोन्ही बोटांतील दोन लग्नमुद्रिका काढून—कारण तिचीं दोन लग्नें झालेलीं होतीं—त्या, आणि कडूसरीला कांहीं पैसे होते, ते काढून तिनें तपकीरीच्या डबींत घालून ठेविले. कोणाचीं जवळ पावलें ऐकूं येऊं लागलीं, कीं ती हाक मारी. परंतु कोणास ऐकूं जाईना!!

अखेर आठवी तारीख आली. उजाडतां शुक्रवार लागला. बर्फाला आंत पाझर सुटून तें वितळूं लागलें. तिचीं चिरगुटें भिजून दगडासारखीं जड झालीं! गात्रें शिथिल पडलीं! हात पाय हालविण्याची सुद्धां शक्ति उरली नाहीं. तिनें जीव जगण्याची आशा सोडून दिली. शेवटीं फेब्रुआरीच्या दहाव्या तारखेस आदित्यवारीं सुमारें १२ वाजतां **जोसेफ मुनशी** या नांवाचा एक तरुण शेतकरी **केम्ब्रीज**हून येत होता तो ती ज्या जाग्यावर पुरली गेली होती, तिच्या अगदीं नजीक आला तों त्यास एका फांदीस बांधलेला हातरुमाल दिसला. त्याचा त्यास चमत्कार वाटून तो त्याच्या जवळ गेला. आणि ज्या भोंकांतून तो वर आला होता त्या भोंकाशीं त्यानें कान लावला. तों आंत उगाच बारीक शब्द व तुरळक सोडीत असलेला श्वासोच्छ्वास त्याच्या कर्णीं आला. ह्मणून तो त्या बर्फांतून आंत नीट न्याहाळून पाहूं लागला. तों आंतही एक धुंदुक धुंदुक स्त्रियेची आकृति दिसूं लागली. थोड्या दिवसापूर्वीं ती सांडल्याचें त्यास माहीत होतें, त्यावरून त्यानें तीस ओळखलें. तो तत्काळ धांवत धांवत जाऊन जवळच्या शेतांत काम करीत असलेल्या एका धनगरास आणि शेतकऱ्यास मोठ्या लगबगीनें घेऊन आला. धन-

गर मोठें आश्चर्य मानून त्या भोंकापाशीं तोंड लावून ह्मणाला "इलि-झाबेथ, तूं आहेस का येथें?" मोठ्या कष्टानें व कापऱ्या स्वरानें ती ह्मणाली "जाना! परमेश्वर दयेनें तुझा शब्द मीं ओळखला! पण आधीं मला बाहेर काढारे!!" त्यांनीं तत्काळ बर्फ काढण्यास सुरवात केली. आणि जानानें जेव्हां आपला उबदार हात तीस दिला, त्या वेळेस तिनें तो बहुत प्रेमानें गच्च धरला. आणि वर ओढून घेऊं नका ह्मणून ती दीनवाणीनें प्रार्थना करूं लागली. व कपाळावर हात मारून कुथत कुथत ती ह्मणाली "अरे देवा! इतक्या दिवस मी येथें होतें काय?" जान ह्मणाला "होय. गेल्या शनिवारपासून." ती ह्मणाली "गेल्या शनिवार-पासून ना? होय. मींही दोन रविवाराच्या घंटा ऐकिल्या!!"

जानानें तात्बडतोब तिच्या नवऱ्यास बोलवावयास मनुष्य पाठविला. नवऱ्याच्या कानावर ही सुवार्ता पडतांच, तो बरोबर कांहीं जिवलग इष्टमित्र, उबदार कपडे, कांहीं खाण्याचे गरम पदार्थ, एक घोडा, एक बगी, एक झगा, व मद्य घेऊन धांवतच तेथें आला. आणि त्यानें ते खाण्याचे पदार्थ तिच्यापुढें ठेविले. त्यांतील एक दोन बिस्कूट तिनें मागून घेतले, व ते खाऊन त्यावर ती थोडें मद्य प्याली. तिचा पहिला भिजका पोषाख काढून नवा घालतांना तिच्या डाव्या पायांतील पायमोजा गोठून जाऊन इतका पायांस चिकटला होता कीं, तो काढतांना तीस घेरी येऊन ती पडली!! त्यांतून तीस सावध करून, लगेच तीस गाडींत घालून घराकडे घेऊन आले.

बिचारा नवरा तीस दाही दिशांकडे शोधून शोधून दमला होता. ती ज्या रात्रीं नाहींशी झाली, व तिचा एकटा घोडा परत आला, त्याच वेळेस तो दुसऱ्या घोड्यावर बसून एक फाणस व दुसरे मनुष्य बरोबर घेऊन केम्ब्रीजपर्यंत सर्व रस्ता शोधून आला. परंतु ठिकाण नाहीं. आठ दिवसपर्यंत कोठें कांहींच जेव्हां मागमोस लागेना, तेव्हां त्यानें मनांत निश्चय केला, कीं, तिला खचीत कोणी तरी चोरून नेऊन तिचा प्राण घेतला असावा!! अशा दुःखसागरांत तो बुडून गेला असतां, त्यास जेव्हां ही बातमी समजली, त्या वेळेस त्यास किती आनंद झाला असेल बरें? परंतु तो त्याचा आनंद कायमचा नव्हता!

कारण डाक्तर येऊन त्यानें तीस जेव्हां पाहिलें, तेव्हां तिची अ-

त्यावस्था असल्याचें त्यास दिसून आलें. तिचे पाय अचेतन झाले होते. एका बोटाशिवाय दुसरें कोणतेंही तिचें बोट हालत नव्हतें. कितीएक ठिकाणचीं हाडें निखलास उघडीं पडलीं होतीं. अशा स्थितींत खितपून खितपून ती जुलैच्या १३ व्या तारखेस वारली. ह्मणजे सहा महिने जगली ! ! !

# (२१) खरा शूर.

## ( मादागास्कर बेटांतील गोष्ट. )

**अन्टानानारिव्हो** हें प्रख्यात शहर ज्या टेकडीच्या शिखरावर बांधलें आहे, त्याच टेकडीवर एक प्राचीन गगनचुंबित, व भव्य राजवाडा आहे. त्यास **बिसाकाना** असें ह्मणतात. **बिसाकाना** याचा अर्थ "अजस्र" असा आहे. हें त्याचें नांव त्याच्या विस्तीर्णतेवरूनच पडलें आहे. हा राजवाडा **अनई आना मासिना व्हालोना** ह्या राजानें बांधला. ह्याची मूळ कथा फारच हृदयद्रावक आहे, ह्यास्तव ती सांगण्याची परवानगी घेतों.

ह्या विस्तीर्ण आणि भव्य राजवाड्याच्या पायाची कोणशिला ठेवण्यास शुभ मुहूर्त पाहण्यासाठीं, व तो समारंभविधि कोणत्या प्रकारें करावा, तें ठरविण्यासाठीं, तेथील राजानें मोठमोठ्या नामांकित ज्योतिषांस, व शकुनवाद्यांस आमंत्रण चिठ्या पाठवून बोलावून आणलें. व सर्वांस प्रश्न केला, कीं हा राजवाडा निर्विघ्नपणें शेवटास जाण्यासाठीं, त्यांत मला यश, आयुष्य, संतति, संपत्ति ह्यांची वृद्धि होण्यासाठीं उत्तम मुहूर्त कोणता ? व प्रथमदर्शनीं ह्यास बलिप्रदानें वगैरे काय केलीं पाहिजेत ?

हा प्रश्न ऐकतांच कोणी कवड्या घोळून एकीबेकी मेजूं लागले ! कोणी नाकपुड्या दाबून श्वास पाहूं लागले ! कोणी आपलें पंचांगाचें पातडें सोडून भराभर बुधावर मंगळ, व गुरूवर शनि बसवूं लागले ! ! कोणी बोटांची उघडझांप करून पांचांतून सात, व सातांतून बारा वजा करूं लागले. कोणी थाळ्यास काजळ लावून करपुतळी पाहूं लागले. कोणी देवास डावा उजवा कौल मागूं लागले. ह्याप्रमाणें बिचाऱ्यांची अगदीं तारांबळ उडून गेली.

अखेर सर्वांनीं कयास करून राजास कळविलें कीं, येवढें अचाट काम निर्विघ्नपणें तडीस जाण्यासाठीं, व महाराजाची व राज्याची निरंतर चढती कळा राहण्यासाठीं, ह्या प्रीत्यर्थ मनुष्याचा एक तरी बळी देणें आवश्य आहे. पायाच्या मुहूर्तशिळेवर एका मनुष्याचें तरी रक्तसिंचन झालेंच पाहिजे.

हें ऐकतांच राजानें तमाम राज्यांत दवंडी पिटविली कीं, आपल्या राज्याच्या सबंधानें कांहीं महत्वाचा विचार करावयाचा आहे, ह्यास्तव झाडून सर्वांनीं उदयीक बारा वाजतां राजवाड्यापुढें हजर व्हावें. ह्या प्रमाणें राजाज्ञा फिरतांच नेमलेल्या वेळीं हजारों लोक राजवाड्यापुढें जमा झाले. व राजाचा कोणता विचार आहे, तो ऐकण्याविषयीं उत्सुक झाले. सर्व लोक जमले असें पाहून, राजा उच्चस्थळीं उभा राहिला, आणि ह्मणाला "हे माझे प्रजाजन हो, हे मीं बोलावून आणलेले ज्योतिषी व मांत्रिक ह्मणतात, कीं मीं आरंभलेला राजवाडा निर्विघ्नपणें शेवटास जावा, व माझ्या राज्याचा उत्कर्ष व्हावा असें असेल तर, ही कोणशिळा बसवितेवेळीं एक तरी नरमेध केला पाहिजे. ह्मणजे कोणत्या तरी एका पुरुषाचा प्राण घेऊन त्याचें रक्त त्यावर सेचन केलें पाहिजे. प्रजाजन हो! तुह्मांस कळवावयाचें ह्मणून जें काय तें हेंच. हें राज्य मला परमेश्वरानें दिलें आहे. व आतां ह्या संकटांतून मुक्त करणाराही तोच आहे. ह्याकरितां आपल्या राज्यासाठीं, जो उदार पुरुष आपली भूमी, बायका, मुलें, आईबाप सोडून देण्यास व माझ्याकरितां आपला दुर्लभ प्राण खर्ची घालण्यास आपल्या राजीखुषीनें तयार असेल, त्यानें पुढें यावें. कारण मला नरमेध तर केलाच पाहिजे. त्यावांचून सुटका नाहीं."

हीं अक्षरें राजाच्या तोंडांतून निघालीं मात्र! तों जशा पाऱ्याच्या गोळ्या उसळतात, त्याप्रमाणें सारे लोक दाही दिशांनीं पळत सुटले. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं असें झालें. जो तो पाठीस पाय लावून धूम ठोकूं लागला. जेथें मुंगी फिरकावयाला रीघ नव्हता, तेथें क्षणांत चिटपांखरूही नाहींसें झालें! फक्त भांभावलेला व आश्चर्यानें चक्क झालेला एकटा राजा मात्र शिल्लक राहिला!!

ही गोष्ट ज्या ठिकाणीं घडली, त्या ठिकाणापासून थोड्याच अंतरावर

पश्चिमेस एक सुंदर टेकडी असून तीवर **अनासिझावो** ह्या नांवाचें खेडेगांव होतें. व खालीं दरींत एक पिकाऊ हिरवीचार भाताची मोठी खेती लागलेली होती. ह्या खेतींत वरील गांवचा **रात्रिमो फोलोलिना** ह्या नांवाचा शेतकरी, हातांत कुदळ घेऊन आपलें शेत खणीत बसला होता.

इतक्यांत ही वरील लोकांची धांव आली ! जो पहावा तो धापा टाकित पळत सुटला आहे !! जणूं का एखादा वाघ लागला आहे पाठीस !! हा चमत्कार पाहून **रात्रिमोस** फार आश्चर्य वाटलें. व तो पुढें जाऊन कांहीं लोकांस कां पळतां ? ह्मणून विचारूं लागला. परंतु ह्यास उत्तर देतो कोण ? जो तो हाहा करींत धूम ठोकीत आहे !! फार झालें तर कोणी "राजाला ह्मणे माणसाचा बळी पाहिजे ! बळी !!" इतकें अर्धेमुर्धें बोलत आणि धूम ठोकीत. तत्रापि शेवटीं एका मनुष्यानें त्यास इत्थंभूत हकीगत सांगितली !

**रात्रिमोनें** ती हकीगत ऐकून घेतली, व तो मुकाट्यानें परत शेतांत आला. पण कामास लागला नाहीं. त्यानें एका डबक्यांत जाऊन आपले हात पाय व कुदळ धुतली, आणि तो घराकडे गेला. तेथें आपल्या त्या गवती झोपडीच्या एका कोपऱ्यांत त्यानें आपली कुदळ नेऊन ठेवली. घरांत मुलाबाळांस व बायकोस कांहींएक न विचारतां व न पुसतां, तो जो निघाला, तो तडक राजवाड्याच्या पटांगणांत येऊन दाखल झाला. आणि त्या राजवाड्याच्या उत्तरेच्या बाजूस एक जुना दगडी दरवाजा होता, त्यांतून तो आंत शिरला. आणि पहातो तों राजा, खालीं पटांगणांतच, कपाळपट्टी बांधून खिन्नवदन होत्साता अधोदृष्टी करून हिकडून तिकडे तिकडून हिकडे निराशमुद्रेनें खेपा घालीत आहे. व त्याच्या एकंदर चर्येवरून तो अगदीं गहन विचारांत निमग्न झाल्याचें दिसत होतें. **रात्रिमो** अम्मळ पुढें गेला, आणि त्या देशच्या रिवाजाप्रमाणें फार अदबीनें मुजरा करून तो ह्मणाला "राजाधिराज उदंड आयुष्यवान् होवोत. वार्धक्यदशेचा उपभोग घेवोत. महाराजांस अशक्तेचा वारा कधींही न लागो. आपल्या सुखसागराला निरंतर भरती असो ! महाराज ! आज राजेसाहेबांनीं सर्व प्रजाजनांस बोलावून आणून आज्ञा केली, तो भाग कोणता होता, हे मायबापांनीं मला निवेदन केल्यास म-

जवर बहुत उपकार होतील. कारण महाराजांचा आशय ऐकण्यास मी हजर नव्हतों."

हें ऐकून राजानें उत्तर दिलें "माझ्या राज्याची भरभराटी व्हावी, एतदर्थ एक मनुष्याचा बळी पाहिजे होता. परंतु माझ्या प्रीत्यर्थ मरण्यास तयार होण्याइतका मजवर प्रीति करणारा मनुष्य साऱ्या राष्ट्रांत एकही नाहीं. नरमेधाची गोष्ट काढतांच सारे लोक माझ्यापुढून पळून गेले. तर बाबा, ह्याबद्दल तुझें काय मत आहे?"

हे शब्द ऐकतांच **रात्रिमोनें** आपला पोषाख चटकर काढून ठेवला. आणि राजापुढें होऊन तो ह्मणाला "महाराज, हा मी आपल्याकरितां बळी जाण्यास तयार आहें. जर आमच्या महाराजांचा वाडा निर्विघ्नपणें तडीस जातो, व सर्व राष्ट्रास सुखसमृद्धि होते, तर आमच्या प्रभुप्रीत्यर्थ मी आपला प्राण देण्यास सिद्ध आहें." राजानें विचारलें "काय तूं आपलें मस्तक कापून घेण्यास खुषी आहेस?"

**रात्रिमो** ह्मणाला "हो. अगदीं एका पायावर." राजा पुन्हा ह्मणाला "काय? खरोखरच तूं मरण्यास तयार आहेस?" तो ह्मणाला "होय आवश्य. आपल्या बऱ्याकरितां मरण्यास मी फार खुषी आहें."

राजा ह्मणाला "बरें तर. तूं एक काम कर. आतां फिरून आपल्या घरीं जा. आणि आपल्या बायकामुलांस विचारून त्यांचा सल्ला घे; आणि हाच निश्चय कायम राहिल्यास तूं उद्यां सकाळीं हिकडे ये. ह्मणजे तुला बळी देऊं." **रात्रिमो** आपल्या घरीं निघून गेला. परंतु ह्या बाबत बायकामुलांपाशीं एक चकार शब्द बोलला नाहीं. उजाडतांच संकेताप्रमाणें पुन्हां राजवाड्यांत आला. राजा पूर्व दिवसाप्रमाणेंच हिकडे तिकडे खेपा घालीत होता. **रात्रिमोनें** मोठ्या अदबीनें मुजरा करून विनंती केली "महाराज, हा मी आलों आहें. व माझा कालचाच निश्चय कायम आहे. आमच्या प्रभूचा वाडा नीटपणें शेवटास जावा, व आमच्या राष्ट्राची उन्नति व्हावी, एतदर्थ मी खुशीनें बळी जाण्यास तयार आहें."

हा निश्चय पाहून राजा आपल्या कामदारांकडे वळून ह्मणाला, "कोण आहेरे तिकडे? तो लांकडाचा ओंडका हिकडे घेऊन या. आणि त्या पलीकडे दोऱ्या पडल्या आहेत, त्याही आणा हिकडे." नंतर त्या

तुळवटाकडे व दोऱ्यांकडे बोट करून जवळच्या लोकांस आज्ञा दिली कीं "ह्याला खालीं पाडा; बांधा; आणि फटके मारा."

असें ह्मणतांच त्या बिचाऱ्यास तेथील लोकांनीं त्या तुळवंडाशीं करकरावून बांधून टाकलें! व मारण्यास सुरवात केली. व शेंकडों लोकांचा त्याभोंवतीं पाळा पडला. कोणी हातांत भाले, कोणी तरवारी, कोणी सुऱ्या, अशीं नानाप्रकारचीं शस्त्रें घेऊन आले. त्या वेळेचा तो भयंकर देखावा काय सांगावा? राजानें मात्र एकसारखी त्याच्याकडे नजर लाविली होती, कीं हा आंग चोरतो, कां धैर्य धरतो तें पहावें. पण **रात्रिमो** केवळ बहाद्दरगडी! त्यानें तें सर्व फार धैर्यानें सोशिलें. हुं का चूं केलें नाहीं, येवढेंच नव्हे, पण त्याची मुद्रासुद्धां फिरली नाहीं!! हा प्रकार चालला असतां राजवाड्याच्या कम्पाउंडा भोंवतीं जमलेले लोक मोठमोठ्यानें गर्जना करूं लागले "हे **रात्रिमो!** तूं निखालस मूर्ख आहेस. हकनाक आपला जीव दवडतोस. आणि बायकापोरांस उघडीं टाकतोस. हा आत्मघात करणाऱ्या कपाळकरट्या!!"

ह्याप्रमाणें उमेद खचण्याचीं साधनें चालली असतां देखील **रात्रिमो**चा निश्चय तिळमात्र ढळत नाहीं, किंवा डोळ्यांतून अश्रुबिंदु येत नाहीं, असें जेव्हां राजानें पाहिलें, तेव्हां तेथील कामदारांस एका बाजूस नेऊन राजा ह्मणाला "हं त्याला मारूं नका! मारूं नका! हं, हात आटपा! हात आटपा! एक लाल रंगाचें भांडें आणून त्याच्या आंगावर ओता. ह्मणजे बस्स!" आणि दुसऱ्या एकाकडे वळून ह्मणाला "त्याच्या कानाचा एक लहानसा तुकडा तोडा; ह्मणजे झालें!"

असें ह्मणतांच एक जण एका हातांत एक रक्तानें भरलेला लाल सुरा घेऊन आला. आणि एका झटक्या सरशी त्यानें एक कानाचा तुकडा तोडून टाकला. व सर्वांगावर लाल रंग ओतून दिला. सभोंवतालचे लोक बऱ्याच अंतरावर होते. त्यांस हा भयंकर देखावा पाहतांच **रात्रिमो**चा शिरच्छेद झाला असेंच वाटलें! आणि सारेजण भरारा पळत सुटले. कारण त्यांस वाटलें कीं, आतां ही संक्रांत आह्मांवर बसते कीं काय कोण जाणे!!

**रात्रीमोस** जरी येवढी मोठी जखम झाली होती, तरी त्यानें हूं का

चूं सुद्धां केलें नाहीं. हें त्याचें शूरत्व आणि उदारत्व पाहून राजाचा कंठ भरून आला. तो आवेशानें ह्मणाला "हं पहातां काय? दोऱ्या तोडा. दोऱ्या तोडा. त्याला उभा करा" आणि जेव्हां तो उभा केला, तेव्हां त्याचें आंग रक्तानें आणि लाल रंगानें थबथबत होतें.

राजानें स्वतः पुढें होऊन उंची सरबतानें भरलेला सुवर्णकलश प्यावयासाठीं त्याच्या हातांत दिला. आणि प्रसन्न मुद्रेनें राजा त्यास ह्मणाला "**रात्रिमो**, अरे, तुझी माझी पूर्वींची ओळखसुद्धां नसतां मजकरितां तूं आपला प्राणही खर्ची घालण्यास तयार झालास, ह्याबद्दल मीं तुला काय बरें द्यावें? काय? दुभत्या गाई देऊं? आणि एखादी अटली कीं दुसरी पाठवून देऊं? का एखादा झुजणारा बैल देऊं? एक थकला तर दुसरा पाठवीन. का एखादी भाताची जमीन देऊं? नाहीं पिकली तर दुसरी देईन. का माझ्या प्रजांनीं दरघरीं तुला एक एक रुपया द्यावा, ह्मणून हुकूम फर्मावूं? का माझ्या राजघराण्यांत तुझा एक हक्क कायम करूं? काय करूं? सांग. ह्यांतून कोणतें तुला पसंत होतें? सांग; कीं लगेच तें तुला बक्षीस देतों."

हें ऐकून **रात्रिमोस** परम आनंद झाला, तो ह्मणाला "राजाधिराज, आपले मजवर अत्यंत उपकार आहेत! परंतु मी अगोदर आपल्या घरीं जातों आणि ह्याबद्दल माझ्या बायकामुलांची मी सल्ला घेऊन येतों." राजानें सांगितलें "ठीक आहे. जा घरीं. आणि बायकामुलांस विचारून, काय पाहिजे त्याचा निश्चय कर. आणि सकाळींच येऊन कळीव. ह्मणजे मी तें ताबडतोब तुझ्या पदरांत घालतों."

**रात्रिमो** घरीं गेला. आणि आपण आपल्या स्त्रीमुलांसहवर्तमान त्या रात्रीं, राजापाशीं काय मागून घ्यावें, त्याचा त्यानें विचार ठरविला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजवाड्यांत जाऊन त्यानें राजास विनंती केली "महाराज, गाई किंवा बैल ह्या नाशिवंत वस्तु आहेत, त्या कांहीं चिरकाल टिकणाऱ्या नव्हेत; तसेंच माझ्याकरतां आपल्या प्रजेनें कराच्या ओझ्याचें दुःख सोसावें हेंही उचित नाहीं. व माझी तशी इच्छाही नाहीं. आपल्या राजकीय हक्कांत शिरून विनाकारण आपल्या एका औरसाचें नुकसान करणें, माझ्या हातून कधीं होणार नाहीं. ह्या राष्ट्रावर चिरकाल आपल्याच वंशाचें आधिपत्य असावें,

अशी माझी इच्छा आहे." इतकें बोलून छातीवर हात ठेवून पुन्हा ह्मणाला "महाराजांच्या मनांत द्यावयाचें आहेच, तर माझ्या मुलबाळांची आठवण ठेवावी! माझ्या भावी संततीचीही आठवण ठेवावी. आणि माझ्या कोणत्याही वंशजास असा दुःखकारक मृत्यु न येईल अशी सरकारांनीं तजवीज ठेवावी. येवढेंच सरकारचरणापाशीं मागणें आहे."

ही मागणी ऐकून सद्गदित अंतःकरणानें राजा ह्मणाला "**रात्रिमो,** तूं फार दूरदर्शी मनुष्य आहेस; तरी मी तुझी मागणी मान्य करतों. कारण सर्वसत्ताधारी मीच आहें. मजवांचून ह्या राज्यांत दुसऱ्या कोणाची सत्ता आहे? कायदे कानु झाले तरी माझ्याशिवाय दुसरा कोण करणार आहे? मीच मुखत्यार आहें. ह्याकरितां मी खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव करतों."

१ तुझा किंवा तुझ्या वंशजाचा इतउत्तर कधींही प्राण घेतला जाणार नाहीं. हा एक घेतला येवढा बस्स आहे. २ तूं किंवा तुझे वंशज यापुढें लोखंडाच्या सांखळीनें कधींही बांधले जाणार नाहींत, कारण तुला बांधलें येवढें पुरे आहे. ३ तूं किंवा तुझे वंशज कोणताही गुन्हा करोत, त्यास सरकारांतून शिक्षा होणार नाहीं. आणि हा माझा ठराव माझे पश्चात् होणारे पुत्रपौत्र सर्व मान्य करतील. "यावच्चंद्र दिवाकरौ" तुझ्या वंशजांशीं माझे वंशज प्रतारणा करणार नाहींत. हाच करार.

हा करार जेथें मुहूर्तानें कोणशिळा बसविली होती, तेथेंच वाचून दाखविला. आणि मोठ्यानें सांगितलें "**रात्रिमो,** आजपासून पुढें तुझें नांव बदललें आहे. ह्यापुढें सर्व लोक तुला आणि तुझ्या वंशजांना '**टासीमाटि मानोटा**' ह्मणजे 'खूनमाफ'—खून केला तरी मरणारा नव्हे—असें ह्मणतील. व हें नांव तुझ्या वंशास चालेल. खूनमाफ-वंशाचा मूळपुरुष तूं."

ह्याप्रमाणें राजानें संभाषण करून जिकडे तिकडे त्याप्रमाणें द्वाही फिरविली. कीं **रात्रिमोनें** किंवा त्यांच्या मुलामाणसांनीं कोणत्याही प्रकारचा गुन्हा केला, तरी त्यांस शिक्षा मिळणार नाहीं. हा हुकूम ऐकून सर्वांस भीति वाटूं लागली. व **रात्रिमोचा** हेवा व द्वेष करणारे होते, त्यांची तर पांचांवर धारण बसली!! शेवटीं त्यांतील एक बडा

गृहस्थ दुसरे दिवशीं राजाकडे जाऊन ह्मणाला "काल सारी रात्र माझा कसा तो डोळयास डोळा लागला नाहीं." राजानें विचारलें "कां बरें ?" गृहस्थ ह्मणाला "आजपासून **रात्रिमो** राजा झाला. आतां तो आमच्या घरादारांची, बायकापोरांची गुराढोरांची हवी तशी वाट लावील. कारण त्यानें कांहीं केलें तरी सरकारांतून त्यास शासन नाहीं."

हें ऐकून राजा ह्मणाला "खरी गोष्ट. त्यानें मजवर संकट तर घातलें आहे खरेंच. तरी त्यास दिलेलें वचन माझ्यानें परत घेववत नाहीं." नंतर राजानें **रात्रिमोस** बोलावून आणलें आणि ह्मणाला "मी राजा आहें. तेव्हां माझें वचन मला तर मोडतां येतच नाहीं. तरी पण तूं माझ्या प्रजेच्या संपत्तीचा उपभोग बलात्कारानें करूं नयेस. ही गोष्ट संभवनीय आहे. कारण तूंही आजपासून माझ्याप्रमाणेंच राजा आहेस. माझ्या स्वतःच्या संपत्तीचा मला राग येईपर्यंत तूं पाहिजे तसा विनियोग कर. कारण ती तुझी आहे. आणि माझा शब्द मीं तुला दिला आहे. व तो माझे पुत्र सुद्धां मोडणार नाहींत."

**रात्रिमोनें** विनंती केली "महाराज, मी आपला शब्द कधींही मोडणार नाहीं, ह्याबद्दल महाराजांची खात्री मीं कशी करावी ?"

राजा ह्मणाला "तूं किंवा तुझ्या वंशजांनीं सरकारदेणें ह्मणून जें काय द्यावयाचें, तें इतरांप्रमाणें रुपये, अधेल्या, पावल्या अशा रूपानें देऊं नये. तर रुप्याच्या दोन सांखळ्या द्याव्यात. ह्यांतील हेतु दोन. १ हा तुमच्या आमच्या मधील करार सांखळीसारखा सांधलेला आहे. तीस ठोकलें असतां तिच्या दुव्यांचा एक जीव होतो, तुटत नाहींत. तसा तुमच्या वंशजांचा व आमच्या वंशजांचा स्नेहसंबंध अधिक दृढ व्हावा, तुटूं नये. तुमचा आमचा ऋणानुबंध दृढ राहण्याचें हेंच चिन्ह होय. २ राजाच्या संपत्तीचा उपभोग घेतल्यामुळें, तुझ्या कोणत्याही वंशजास कोणी गुन्हेगार ठरविल्यास, गादिनशन असलेल्या माझ्या वंशजास त्यानें दोन सांखळ्या आणून दाखवाव्यात. ह्मणजे तो शासन करणार नाहीं."

हल्लीं त्या बेटांत **"गुन्हामाफ"** ही जात प्रसिद्ध आहे. व त्याचे हक्कही अद्याप तसेच कायम आहेत. मात्र एक भेद आहे. राजा होतां

होईल तों ह्या जातीस शिक्षा देत नाहीं. परंतु फारच मोठा गुन्हा केल्यास, सांप्रतकाळीं थोडी तरी शिक्षा करतो.

## (२२) झाडावर चढणारे मासे.



पूर्वीपासून एक ह्मण चालत आली आहे, कीं "पाण्यावांचून मासा

जगत नाहीं.'' आणि सृष्टिक्रमाप्रमाणें पाहतां तें खरेंही दिसतें. रुप्यासारखा चकचकीत एक मासा आहे. त्यास " हेरिंग " असें ह्मणतात. हा मासा पाण्यांतून बाहेर काढला, कीं तत्काळ मरतो. कॉड, हेडॉक, आणि सालमन ह्या नांवांचे मासे आहेत ते ज्या पाण्यांत रहातात त्या पाण्यांतून काढले कीं, एक दोन श्वासोच्छ्वास टाकतात न टाकतात तों त्यांचा प्राण जातो ! पण दुसऱ्या कित्येक जातींचे मासे आहेत त्यांची गोष्ट ह्याहून अगदींच भिन्न आहे. उदाहरणार्थ "ईल" ह्या नांवाचा एक मासा आहे. त्याचा प्राण जातां जात नाहीं. हा पाण्यांतून काढल्यानंतर पुष्कळ दिवसपर्यंत वांचतो. आणि तो जर ओल्या गवतांत ठेवला, तर पाहिजे तितक्या दिवस जगतो. तेव्हां असा प्रश्न उद्भवतो कीं मासा हा पाण्याशिवाय जगतो कीं काय ?

थोड्या विचाराअंतीं आह्मास असें कळून आलें कीं, कांहीं मासे आह्माप्रमाणेंच हवेमध्यें श्वासोच्छ्वास करीत असावेत, ह्मणजे वातावरणांतील वायु पृथक्करण करून घेण्याची शक्ति त्यांच्या आंगांत असली पाहिजे. आपलें वातावरण आक्सिजन व नैत्रोजन ह्या दोन वायूंच्या मिश्रणानें झालेलें आहे, हें आमच्या वाचकांस माहीतच असेल. आपल्या सभोंवारच्या वायूंत नैत्रोजन हें मोठ्या महत्वाचें तत्व आहे. आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या आक्सिजन वायूचा प्राण्यास हवा तेवढा पुरवठा नसला कीं, तो लागलाच मरतो. नैत्रोजन हा कांहीं एका विशेष रीतीनें आक्सिजनाशीं मिश्र झालेला असतो. आणि प्राण्यानें श्वास आंत ओढला कीं, आक्सिजन निराळा होतो. तर मग माशाची क्रियाही ह्याप्रमाणेंच होत असावी. मात्र त्यांत एक फरक आहे. तो हा कीं, जमिनीवरचे प्राणी जसे प्रत्यक्ष वायूच्या मिश्रणांतूनच वायु काढतात, तसे मासे काढीत नाहींत. तर ते पाण्यांतूनच तो वायु काढून घेतात. साधारण बोलण्यांत मासे पाण्याचा श्वासोच्छ्वास सोडतात असें ह्मणतात. तें चुकीचें आहे. प्राण्यास पाण्याचा कधीं श्वासोच्छ्वास करतां येणार नाहीं. प्राणी श्वासोच्छ्वास करतात ते फक्त वायूनें वर सांगितलेला वायु पाण्याशीं कांहीं रसायनरीत्या संयोग पावलेला नसतो, ह्मणजे एकरूप झालेला नसतो. परंतु मिश्र असतो. वस्तुतः यंत्रशास्त्रानुसार आह्मांस हवा व पाणी एकत्र करतां येतात. मुंबईसारख्या शहरांत

मोठमोठ्या श्रीमान लोकांच्या दिवाणखान्यांत सोनेरी मासे, तांबडे मासे, हिरवे मासे, निळे मासे, कांचेच्या गोळ्यांत पाणी भरून त्यांत बाळगलेले असतात. ते पुष्कळांनीं पाहिलेच असतील. त्यांपैकीं एखादा सुवर्ण मत्स्य हवेच्या अभावामुळें आपल्या गोळ्यांत तडफडतांना जर आपल्या दृष्टीस पडला, तर आह्मी त्या गोळ्यांतील पाणी बोटानें हालवून त्यास ताजी हवा देतों. अथवा पिचकारींत थोडें पाणी भरून त्या पिचकारीनें त्या गोळ्यांत जोरानें पाणी भरून त्यास हवा देतों. पाण्याची हालचाल झाली कीं, तें नवी हवा शोषून घेतें. आणि त्यामुळें माशांस ताज्या हवेचा पुरवठा होतो. आर्टिफिशिअल सरोवरें करतात, त्यांतील पाण्याचें संरक्षणही ह्याच तत्त्वावर करतात. पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे कीं, आर्टिफिशिअल सरोवराचें पाणी वारंवार बदलतात. पण ही समजूत चुकीची आहे. तर तेंच पाणी कांहीं चक्रें आंत घालून इंन्जनच्या जोरानें रवीनें घुसळल्याप्रमाणें घुसळतात. तेणेंकरून पाण्यांत नवी हवा मिसळत मिसळत तें शुद्ध होतें. आणि त्यांतील मासे व इतर जलचर प्राणी ह्यांस त्या पाण्यापासून पुन्हा पाहिजे तितका आक्सिजन शोधून घेतां येतो. ह्यावरून पहा बरें!! समुद्र हें एक आर्टिफिशिअल सरोवरच नव्हे काय? होय, तेंही आर्टिफिशिअल सरोवरच आहे. पण त्यास घुसळावयास मनुष्य लागत नाहीं. तर तें आपोआप वाऱ्याच्या जोरानें व लाटांनींच घुसळतें. हें परमेश्वराचें केवढें बरें चातुर्य!!

माशांचीं श्वासोच्छ्वासाचीं इंद्रियें, त्यांच्या कल्ल्यांस लागून असतात. कोणत्याही माशाच्या गळ्याखालीं लाल रंगाचे आणखी दुसरे कल्ले दृष्टीस पडतात. सर्व माशांचे कल्ले एकसारखेच असतात असें नाहीं. त्यांच्या रचनेंत पुष्कळ तफावत दिसून येते. साधारण माशांचे ह्मणजे कॉड, हेरिंग वगैरे माशांचे कल्ले लाल रंगाचे असून त्यांस हस्तीदंताच्या फणीसारखे सुरेख दांत असतात. ते एका वर्तुळ हाडावर बसविलेले असतात. व त्यास मागें मूठ असल्याप्रमाणेंच भास होतो. ह्या झालरीपैकीं प्रत्येक झालर रक्ताशयाचें गाळणें आहे. आणि त्यांतच प्रधान रक्तवाहिन्यांचीं मुळें व अग्रें असतात. आणि तेथें माशांच्या हृदयाच्या योगानें कल्ल्यांमध्यें त्यांच्या रक्ताची चांबी होते. आणि तें

शुद्ध होऊन त्यांच्या शरीरांत प्रसरण होण्यास योग्य होतें. आणि तें धमन्यांच्या योगानें बाहेर जाऊन सर्व शरीरांत विभागतें. ह्याप्रमाणें माशांचें श्वासोच्छ्वासस्थान कोणतें त्याचें दिग्दर्शन झालें. आणि हाच प्रकार मनुष्यांच्या व प्राणिमात्राच्या श्वासोच्छ्वासनक्रुतींत दृष्टीस पडतो. पाण्यांतून अथवा वाय्वावरणांतून हवा घेतांना प्राण्यास आक्सिजन पाहिजे असतो. आणि तो त्या रक्तांत मिश्रित होतो. आणि तोच त्याच्या शरीरांतील, आणि रक्तांतील सर्व कचरा ह्मणजे राब बाहेर काढतो. हेच राब आपल्या सभोंवतीच्या वायूस खराब करून सोडतात. आणि मासे ज्या पाण्यांत श्वासोच्छ्वास करतात, तें पाणी खराब करून टाकणारे-ही तेच. आणि त्यामुळेंच तें प्राण्याच्या श्वासोच्छ्वासास निरुपयोगी होतें. मनुष्यजातीला जागा किंवा घर हवेचा पुरवठा करतें. आणि माशास पाण्यांतील हवा पुरवठा करते.

हें साधारणपणें मासे श्वासोच्छ्वास कसे करतात, त्याबद्दल दिग्द-र्शन झालें. आतां पाण्याच्या बाहेर राहणाऱ्या माशांविषयींचे चमत्कार सांगितले पाहिजेत. कित्येक माशांस एक पिशवी किंवा फुगा असतो. त्यास वाय्वाशय असें ह्मणतात. ह्यांत एक प्रकारची हवा किंवा ग्यास भरलेला असतो. ही पिशवी त्यास पाण्यांत बुडण्यास किंवा वर येण्यास उपयोगीं पडते. ह्या पिशवींत ग्यास दाबून धरला ह्मणजे सभोंवतीच्या पाण्यापेक्षां त्याचें शरीर जड होतें, आणि तो बुडतो. तसेंच ती पिशवी सैल सोडली, कीं शरीर हलकें होऊन पाण्याच्या वर येतें. हेरिंग इत्यादि कांहीं माशांत ही पिशवी किंवा वाय्वाशय गळ्यांत उघडूं शकतो. व कित्येक माशांस कांहीं विशेष रीतीनें फेरफार होऊन हवेमध्यें ते वांचूं शकतात.

पूर्व एशियामध्यें "झाडावर चढणारा" या नांवाच्या जातीचा एक मासा आहे. डालडार्क या नांवाचा एक प्रवासी होता. त्यानें स. १७९७ मध्यें एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, सदरहू जातीचे कित्येक मासे तलावानजीकच्या ताडाच्या झाडावर चढलेले मीं पाहिले. ते आपल्या शेंपटाच्या आणि पंखांच्या साह्यानें झाडावर चढून गेले. हे मासे पांच पांच फुटी उंचीवर उडी मारून जाऊं शकतात. मलायन भाषेंत माशांला झाडावर चढणारे असेंच नांव आहे. ह्या माशांची सरा-

सरी लांबी ७ इंच असते. झाडावर चढणाऱ्या माशांचें मस्तक तपासलें तर त्यांत आपणास एक पातळ हाडांची विशेष चमत्कारिक रचना दृष्टीस पडते. तीं हाडें नागमोडीच्या आकाराचीं असून फार सुंदर रीतीनें सांधलेलीं असतात. ही जाळी माशांच्या वयाबरोबरच वाढत असते. ही हाडांची सांखळी कल्ल्या शेजारींच एका खळग्यांत असते. हाच अवयव, ते मासे पाण्यांतून बाहेर पडतात तेव्हां त्यांच्या श्वासोच्छ्वासास लागणाऱ्या वायूचा पुरवठा करतो, आणि त्यांस जमिनीवर संरक्षक होतो. वेस्त इंदीज बेटांमधील कांहीं खेंकडे आपला बचाव एका चमत्कारिक रीतीनें करतात. आपले कल्ले एका विशेष कृतीनें ओले ठेवतात. आणि त्या योगेंकरून हे प्राणी जमिनीवर लांबलांबचा प्रवास करतात. तथापि कित्येक प्राणीशास्त्रवेत्ते यांचा कल असा आहे कीं, ही जी नागमोडीची हाडांची सांखळी आहे, हीच श्वासोच्छ्वास करण्याचें इंद्रिय होय. आणि तीच खऱ्या फुप्पुसाचें काम करते. हीच कल्पना खरी असें गृहीत केलें, तर हाडांच्या नागमोडींत ओलावा सांठवून ठेवण्याची कांहीं गरज नाहीं. कारण वाय्वावरणांतून प्रत्यक्ष रीतीनें आंत घेतलेल्या हवेनें रक्त शुद्ध झालेलें असतें.

**आफोस फाली** हे मासे स्वच्छ पाण्यांत रहातात. आणि ते पूर्व एशियांत व हिंदुस्थानांतही कोठें कोठें सांपडतात. हे कोरड्या हवेंत तर जगतातच, पण ज्या डबक्यांतील पाणी उन्हानें अगदीं सुकून जाऊन ज्याच्या तळाशीं भरदोनप्रहरीं रसरशीत फोपाटा होतो, तेथें सुद्धां जगतात. पण अलीकडे शोधाअंतीं असें कळून आलें आहे कीं, हे मासे नेहेमीं वाय्वावरणांतच श्वासोच्छ्वास करणारे आहेत. ते घडिघडीला श्वासोच्छ्वास करण्यासाठीं पाण्याच्या सपाटीवर येतात. हे मासे पाण्याच्या तळाशीं नेऊन ठेवले तर ते लागलेच तडफडून वर येतात. वाय्वावरणांतील हवा घेण्यास त्यांस प्रतिबंध केला, तर ते दम कोंडून मरतात. यावरून हे मासे एकंदरींत बेडूक किंवा खेंकड्याच्या जवळ जवळ किंवा त्यांच्याच वर्गांतले आहेत असें ह्मटलें पाहिजे.

अमेरिकेंतील कांहीं ठिकाणच्या पाण्यांत सूडिअस, व इथिनस ह्या नांवांचे मासे आहेत तेही असेच. 'बारामंद' ह्मणून आस्ट्रेलियांत एक जातीचे मासे असतात ते पाण्यांतून वर येऊनच आपलें रक्त शुद्ध कर-


तात. ह्यावरून उघड आहे कीं, अशा जातीच्या माशांस दोन पिशव्या असतात. ह्मणजे एक कल्ला, व एक वाय्वाशय. पाण्यांत असतात तेव्हां ते कल्ल्यानें श्वासोच्छ्वास करतात. व बाहेर आले ह्मणजे वाय्वाशयानें श्वासोच्छ्वास करतात.

**हिपोस्टयामस**—ह्या नांवाचा दुसरा एक मासा असतो तो श्वासोच्छ्वासासाठीं फार नियमितपणें पाण्याच्या सपाटीवर येतो. ह्या माशास वाय्वाशय नसतो, पण एक निराळीच पिशवी असते. ती त्याच्या पक्काशयाशेजारींच असते. कांहीं माशांचें डोकेंच श्वासोच्छ्वास घेण्यासारखें असतें. कोणाचा वाय्वाशय, कोणाचा गळा आणि कोणाचा पक्काशयच श्वासोच्छ्वास घेण्यास योग्य केलेला असतो.

**डोरास**—ह्या नांवाचा मासा अमेरिकाखंडांत सांपडतो. हे मासे रस्त्यावर येऊन खुशाल खेळत असतात! हे मासे झाडावर पांखरांसारखीं घरटीं बांधून त्यांत आपलीं पिलीं ठेवतात!!! अशा प्रकारचें एक घरटें आजच्या चित्रांत दाखविलें आहे. तेथील इंदियन लोकांची अशी समजूत आहे कीं हे मासे आपल्याबरोबर पाणी घेऊन येतात. पण तसें साधन त्यांच्यापाशीं कांहीं आहेसें दिसत नाहीं.

# (२३) पूर्वयुगांतील प्राणी.

## मेमोथ.



मोठमोठ्या विद्वानांनीं असा शोध लावला आहे कीं, आपला भूगोल परमेश्वरानें निर्माण केला त्या कालीं, आगीचा केवळ गलगलीत गोळा होता. नंतर तो हळू हळू थंड झाला, व पुढेंही होत आहे. ह्यास मोठें प्रमाण हें आहे कीं, उत्तर ध्रुवा[1]कडे जेथें मनस्वी बर्फ आहे, घरें सुद्धां बर्फाचीं बांधतात, व जेथें उष्णप्रदेशांतील प्राणी मुळींच जगत नाहींत, ज्या ठिकाणीं जमिनीवरचा बर्फ वर्षानुवर्षें निघत नाहीं, अशा ठिकाणीं अतिशय खोल खणलें तर उष्ण प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या प्राण्यांचीं कलेवरें सांपडतात. तसेंच मध्य युरोपांत आणि मध्य अमेरिकेंत तशाच प्राण्यांचे **"फासिल"** ह्मणजे पाषाणमय शरिरें आढळतात. **युरोपियन** लोकांस प्राणिशास्त्राचा शोध लावण्याची पराकाष्ठेची गोडी आहे. आणि ती आमच्या लोकांस तादृश नाहीं. त्यांनीं ह्या

---

१ **उत्तरध्रुवा**कडील माहिती केरळकोकिळ वर्ष ५ अंक १ यांत दिली आहे ती फारच गमतीची व चित्तवेधक आहे.

शोधार्थ मोठमोठाले भूगर्भशास्त्रवेत्ते व प्राणिशास्त्रवेत्ते नेमलेले असतात. ते अशा प्रकारचे **फासिल** किंवा कलेवरें सांपडलीं ह्मणजे त्यांची चांगली चिकित्सा करून त्यावरून अनेक सिद्धांत आणि अनेक अनुमानें रचतात.

**"मेमोथ"** हा प्राणी हत्तीच्याच वर्गांतील आहे. परंतु तो सांप्रत पृथ्वीवर कोठेंही उपलब्ध नाहीं. मात्र थंड प्रदेशांत त्याचीं कलेवरें, आणि मध्य **एशियांत** त्याचे **फासिल** आढळतात. **मेमोथ,** हत्तीपेक्षां फारच मोठा असल्यानें त्याचे दांत आणि हाडें हत्तीच्या दांतांपेक्षां आणि हाडांपेक्षां फारच मोठीं असतात. आणि हा हस्तिदंत उत्तर प्रदेशांतील जमिनींत इतका विपुल सांपडतो कीं, **रशियाचा झार,** त्यासाठीं एक स्वतंत्र खातें ठेवून, त्यावर प्रतिवर्षीं लाखों रुपयांची पैदास करतो. हा हस्तिदंत **युरोप, अमेरिका** येथें पुष्कळ खपतो. आणि कारागीर लोक त्याच्या नानाप्रकारच्या वस्तु करतात. हा हस्तिदंत **युरोपां**तील व्यापाराच्या जिनसांतील एक मुख्य जिन्नस होऊन राहिला आहे. प्रत्येक वर्षीं हजारों कारवान गोठलेल्या समुद्राकडे जातात, आणि येतांना विपुल माल घेऊन येतात.

**मेमोथाचें** पहिलें कलेवर इ० स० १७९९ मध्यें **सैबिरिया**मध्यें सांपडलें. ही बातमी **मास्को** येथें कळतांच तेथील प्राणिशास्त्रवेत्ता प्रोफेसर **अडाम** ह्यानें तें परीक्षेसाठीं आणविलें. परंतु त्याच्या हातीं त्यांतील फारच थोडा भाग आला. कारण, **सैबिरियन** लोकांनीं त्यांतील मांस कापून काढून कुत्र्यांस घातलें होतें. व बाकी राहिलेला बहुतेक भाग पांढऱ्या अस्वलांनीं खाऊन फडशा केला होता. फक्त चामड्याचा एक तुकडा आणि एक कान मात्र शाबूत मिळाला. एक पुढचा पाय खेरिजकरून अस्थिपंजर मात्र सबंध होता. तेवढ्यावरूनच त्या विद्वानानें आपल्या विद्यार्थ्यांस त्या प्राण्याबद्दल पुष्कळ गोष्टींची माहिती करून दिली. त्याच्या मानेवर घोड्यासारखी लांब सडक आयाल होती, ती तशीच होती. चामडीवर काळे केंस आणि तांबडसर लोंकर इतकी गजबरलेली होती कीं, तो तेवढा उरलेला तुकडाच उचलावयास दहा मनुष्यें पुरेनात. ह्याशिवाय पांढऱ्या अस्वलांनीं खातांना पडलेले लांब आंखूड केंस जमा करून आणले होते ते वीस पौंड होते!!

ह्या सर्व गोष्टींवरून सहजच तेथें प्रश्न उद्भवला, कीं हा येवढा अजस्त्र प्राणी, जो केवळ **आफ्रिका, आशिया** अशा सारख्या उष्ण प्रदेशांतच असावयाचा, तो थंड प्रदेशांत आला कसा? ह्याचीं उत्तरें अर्थातच दोन. एक भूगर्भशास्त्रांत कांहीं फेरफार होऊन हे प्राणी थंड देशांत जाऊन पडले असावेत, किंवा पूर्वयुगांत तेथेंच ते निर्माण होत असावेत. विचाराअंतीं दुसरीच गोष्ट खरी ठरली. ह्मणजे हे प्राणी पूर्वी थंड प्रदेशांतच होते हें सिद्ध झालें. तेव्हां अर्थातच हें पूर्वयुगांतील प्राण्याचें कलेवर ह्मणून **सेंटपिटर्स बर्गच्या अकेडमीच्या** पदार्थसंग्रहालयांत जपून ठेवलें.

नंतर दुसरें एक सबंध कलेवर सांपडलें. तें **पारीस** येथील पदार्थसंग्रहालयांत मोठ्या खर्चानें पैदा करून आणलें. त्या नंतर **मेमोथ**चीं अनेक कलेवरें सांपडलीं. त्यावरून ह्या प्राण्याची आकृति पहावयास सांपडते. हा प्राणी जरी हत्तीच्याच वर्गांतला आहे, तरी हत्तीमध्यें आणि ह्यामध्यें पुष्कळ तफावत आहे. एक तर हा हत्तीपेक्षां पुष्कळ मोठा असतो; शिवाय ह्याचे दांत हत्तीपेक्षां मोठे आणि लांब असून त्याचीं वेटाळीं बनलेलीं असतात. मानेवरची आयाळ फार दाट असून फार सडक असते. ह्या प्राण्यापासून पुढें हत्तीचें स्वरूप कोणत्या कारणानें व फेरफारानें बनलें, त्याचा अद्याप शोध लागला नाहीं.

---

## (२४) स्वप्नसृष्टि.

निद्रेमध्यें कांहीं चमत्कारिक व्यापार प्रत्यक्ष घडल्याचा मनास भास होतो, त्यास स्वप्न असें ह्मणतात. ही स्थिति कशापासून उत्पन्न होते, याबद्दल मोठमोठ्या डाक्तरांनीं पुष्कळ शोध चालविला आहे. पण अद्यापि नीटसा शोध लागत नाहीं. तरी येवढें खरें कीं, त्यांत मनाच्या स्थितीचें हुबेहूब चित्र वठतें, किंवा निदान त्याचें, स्वप्नास, बीज तरी असतें, ह्यांत संशय नाहीं. जगांत निरनिराळ्या लोकांस निरनिराळीं स्वप्नें अशीं कांहीं अद्भुत पडलेलीं आहेत—व हल्लींही पडतात—कीं तें ऐकून मेंदूचा अंतस्थ व्यापार किती चमत्कारिक असतो, याबद्दल मन चकित होऊन जातें.

गेल्या शतकांत **गाइसिप तांतिनी** ह्या नांवाचा एक नामांकित गवय्या व कवि **इटाली** देशांत होऊन गेला. त्यानें एका रात्रीं स्वप्नांत कोणी देवदूत आल्याबद्दल कविता रचल्या. त्यास "**धि डेव्हिल्स सोनाटा**" असें ह्मणतात. हें काव्य **यूरोप**खंडांत फार प्रसिद्ध आहे. इ. स. १७१३ ह्या वर्षांतील एका रात्रीं त्यास स्वप्न पडलें कीं, आपणास एक मोठें पिशाच्च भेटलें, व त्यानें हरवखत आपली चाकरी करण्याचें पतकरलें. व त्या पिशाच्चानें आपण गायनकलेंत किती प्रवीण आहोंत, हें दाखविण्यासाठीं आपली सारंगी काढून ती वाजवून गायन केलें. तें गायन आणि वादन, इतकें सुस्वर आणि इतकें मनोरम होतें कीं, **तांतिनी**नें तसलें गायन साऱ्या जन्मांत कधीं ऐकिलें नव्हतें. त्याच आनंदलहरींत तो जागा झाला, आणि त्या आवेशांत त्यानें त्याची सारंगी धरली. परंतु व्यर्थ. कारण तेथें कांहींच नव्हतें. शेवटीं त्यानें ह्मटलेल्या विषयावर त्या कवीनें एक काव्य लिहिलें. तें त्या कवीच्या सर्व काव्यांत उत्तम ठरलें. त्यासच "**धि डेव्हिल्स सोनाटा**" ह्मणजे "देवदूताचा प्रसाद" असें ह्मणतात. परंतु हें काव्य, व आपलें गायन, त्यास झोंपेंतील त्या गंधर्वाच्या गायनापुढें इतकें फिकें, आणि इतकें तुच्छ वाटलें, कीं तो ह्मणाला "छेः! किती भिकार काव्य हें? मी आजपासून गावयाच्या किंवा काव्य करावयाच्या मुळींच भरीस पडणार नाहीं. पोटच भरावयाचें ना? तें भरीन दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें!" ह्याप्रमाणें बोलून त्यानें खरोखरच आपली सारंगी फोडून तिचे तुकडे तुकडे केले. आणि त्या वेळेपासून जन्मपर्यंत त्यानें काव्य ह्मणून कसलें तें केलें नाहीं. व तोंडांतून गायनाचा सूर सुद्धां कधीं काढला नाहीं!

तसेंच, **साम्यूअल टेलर** ह्या नांवाचा दुसरा एक कवि यूरोपखंडांत होऊन गेला. त्यासही एक अद्भुत स्वप्न पडलें होतें. सदरहू कवि '**परचेसेस पिल्ग्रिमेज**' नांवाचें पुस्तक वाचीत होता. वाचतां वाचतां सरशेवटीं—**खान कुबल** ह्यानें आपल्या कारभाऱ्यास एक उत्तम राजवाडा बांधण्यास हुकूम केला. व कारभाऱ्यानें त्याप्रमाणें दहा मैल सुंदर व मजबूत तट घालून जागा तयार केली.—इतकें वाचून स्वारीस झोंप लागली. सुमारें तीन तास तो झोंपेंत होता. तितक्यांत त्यानें त्या

वाड्याच्या बागेच्या वर्णनाचीं सुमारें शंभर पद्यें तयार केलीं. आणि त्याच मनोविकारांत तो जागा झाला. आणि पहातो तों मेजावर कविता तयार!! त्या कविता तो जन्मभर वाचीत बसला.

**वाट्स,** ह्या नांवाचा एक पाण्याचे नळ करणारा मनुष्य होता. त्यासही एक असेंच अद्भुत स्वप्न पडलें. हें स्वप्न साऱ्या जगास फायदेशीर झालें. व तोही लाखों रुपयांचा धनी झाला. एका रात्रीं तो निजला असतां, त्यास असें स्वप्न पडलें कीं, एका मोठ्या पावसाच्या सरींत आपण सांपडलों आहों. व त्यांत चमत्कार हा, कीं त्या ढगांतून पावसाच्या पाण्याचे थेंब न पडतां, त्याच्या ऐवजीं वाटोळ्या गुरगुरीत शिशाच्या रसाच्या गोळ्यांचा आपल्या आंगावर वर्षाव होत आहे!! ह्या शिशाच्या गोळ्या इतक्या गोल कशानें झाल्या? ह्याचा विचार करतां, त्यास असें वाटलें कीं, शिशाचा रस उंचावरून ओतला असतां, त्याच्या थेंबांस वाटोळा आकार येऊन त्याच्या गोळ्या बनतील!! जागा झाल्यावर त्यानें त्या कल्पनेची प्रतिति पाहण्याचें मनांत आणलें. आणि **"सेंटमेरी रेड् क्लीफ चर्चच्या"** उंच बुरजावर जाऊन त्यानें तो प्रयोग करून पाहिला. एका चाळणींतून खालीं असलेल्या पाण्यांत शिशाचा रस ओततांच, त्याचे उत्तम छरे बनले!! तोंपर्यंत छरे करण्याची युक्ति कोणास माहीत नव्हती. ह्यामुळें **वाट** साहेबास मोठा लाभ झाला. हल्लीं छरे तयार होतात ते ह्याच युक्तीनें. छरे करण्याची युक्ति स्वप्नांत निघाली, असें ऐकिलें, ह्मणजे किती चमत्कार वाटतो?

इ. स. १७४८ च्या **"फिलासोफिकल ट्रान्झेक्शन"**मध्यें एका चमत्कारिक स्वप्नाचें वर्णन केलें आहे. **विन्टशायर**मध्यें **हेनरी आक्सफर्ड** या नामेंकरून एक वकिलाचा मुलगा होता. त्यास पंचविसावें वर्ष लागलें असून, शरीरप्रकृतीही चांगली सशक्त होती. परंतु त्यास एकाएकीं हिंवताप लागला. आणि त्या हिंवांत त्याची वाचा बंद झाली! पाहिजे ते उपाय केले, परंतु तोंडांतून शब्द ह्मणून उमटेना! हिंवताप बरा झाला. परंतु वाचा आली नाहीं. ह्याप्रमाणें तीन वर्षें लोटलीं. नंतर सन १८४१ च्या जुलै महिन्यांत एके दिवशीं तो खूप दारू प्याला. ती इतकी कीं, रस्त्यांत झिंगून तो घोड्यावरून तीन चारदा पडला. तेव्हां लोकांनीं रस्त्यांतून उचलून नेऊन त्यास

बिछान्यावर निजविलें. व लौकरच त्यास झोंप लागली. त्या झोंपेंत त्यास स्वप्न पडलें कीं, आपण जसें काय एका धातूच्या रसाच्या कड-कडलेल्या काहिलींत पडलों आहों, आणि त्यायोगें आपलें आंग अ-गदीं होरपळत आहे. त्या भयानें तो घाबरून जाऊन, आपणास कोणीं त्यांतून काढावें ह्मणून इतक्या मोठ्यानें किंकळला, कीं त्यासरशी त्यास वाचा फुटली!! व पहिल्याप्रमाणें बोलूं लागला. त्या दिवसा-पासून त्यानें दारू पिणें सोडून दिलें. नंतर त्याची प्रकृति चांगली होती.

थोड्या दिवसांपूर्वीं आपल्या भरतखंडांत **डा. आनंदीबाई जोशी** ह्या नांवाचें स्त्रीरत्न होऊन गेलें, हें सर्वांस विदितच आहे. ह्या बा-ईची बुद्धि, धैर्य व निश्चय हीं अगदीं लोकोत्तर होतीं. तिनेंही स्वदस्तु-रच्या लेखांत आपल्या विलक्षण स्वप्नांची माहिती दिली आहे. ती अशी—“मी तुह्मांस खरें सांगतें कीं, मी मेहेनत करतें ती आंतल्या आंत. पुष्कळ कठीण प्रश्नांचा उलगडा मीं झोंपेंत केलेला आहे. पूर्वीं मला आंगरखे चोळ्या मुळींच बेतावयाला येत नव्हत्या. पण मीं त्या स्वप्नांत शिकलें. एके दिवशीं झोंपेंत मला स्वप्न पडलें कीं, मीं नाना-तऱ्हेचे आंगरखे, टोप्या, चोळ्या, बेतल्या आणि शिवल्या. सकाळीं जागी झाल्यावर स्वप्नांत कापलेल्या आठवणीनें खरोखरच मीं कपडे बे-तले, आणि शिवले. ते बरोबर उतरले. जेव्हां जेव्हां विचार करण्याचा मला प्रसंग येई, तेव्हां तेव्हां तो मीं झोंपेंतच करीं. वाचन वाचणें झालें तर, दिवसा एक दोन वेळच वाचीं. आणि झोंपेंत मात्र तें पुन्हा पुन्हा वाचून त्याचें पीठ पाडीं. मग सकाळीं अगदीं बिनचूक येई. कवितेचा अर्थ नडला, तर दिवसा लागत नसे. पण झोंपेंत मीं तो छान लावीं. आणि सकाळीं पहावें तों, त्यांत कांहीं शंका राहत नसे. मला कोण शिकवितें तें कळत नाहीं, पण अशा रीतीनें येतें खरें.”

ह्यावरून उघड आहे कीं, स्वप्न हें एक पूर्वीं मनांत आलेल्या विचा-

राचें स्वरूप आहे. **हेन्री आक्सफर्ड**ला तरी "धातूंच्या रसाच्या काहिलींत पडलों" असें वाटण्याचें कारण काय? तर तो घोड्यावरून दोन चार वेळ पडला, तें मेंदूंत राहिलें होतें. कितीही अद्भुत स्वप्न पडलें तरी, त्याच्या मूळ बीजाचा संबंध मनांतील विचाराशीं असतोच. मात्र त्याचा विस्तार कोणीकडच्या कोणीकडेच जातो.

**आनंदीबाई**च्या मनांतही जेव्हां **अमेरिकें**त जाण्याचें घाटत होतें, त्या वेळेस "मी अमेरिकेंत गेलें आहें, तेथील मित्रमंडळीस भेटत आहें, मोठमोठालीं संभाषणें करीत आहें." अशीं स्वप्नें पडत असल्याचें त्यांनीं लिहिलें आहे. **ग्रेजरी** ह्मणून एक डाक्टर होता. तो निद्रिस्थ असतां त्याच्या पायास एक तापलेली बाटली लागली. तेणेंकरून त्यास असें वाटलें कीं, आपण **एटना** पर्वताच्या ज्वालामुखीच्या तप्त मुखावरून चालत आहों!! डाक्टर **रेड्** ह्मणून दुसरा एक गृहस्थ होता. त्याच्या डोकीस पलिस्तर मारलें होतें. झोंपेंत त्यास वाटलें कीं, एका **इंडियना**नें आपल्या डोक्यांत सोटा मारून डोकें फोडलें!! मिस्तर **मुरी** यानें झोंपेंत आपला ओंठ खाजविला. तेव्हां त्यास वाटलें कीं, आपल्या तोंडास कांहीं रोग होऊन सर्व तोंडावर क्षतें पडलीं आहेत! असे स्वप्नसृष्टींतील हजारों चमत्कार आहेत!!!

# (२५) हातभर उंचीचीं मनुष्यें.



इंग्रज लोकांच्या कितीएक चाली अनुकरण करण्यासारख्या आहेत. त्यांतीलच, रिकाम्या वेळींसुद्धां ज्या गप्पा मारावयाच्या, त्या कांहीं तरी उपयुक्त विषयावर मारावयाच्या, ही एक चाल होय. त्या लोकांत भोजनगृहांत संभाषण करावयाचें झालें तरी सुद्धां कांहीं तरी मनोरंजक विषयावर करावयाचें. एका समयीं एका भोजनगृहांत कांहीं मंडळी जमली असतां, कोणीं एकानें असा प्रश्न काढला कीं, फलाणी फलाणी बाई इतकी लहान, आणि फलाणा फलाणा मनुष्य इतका मोठा;

असा परमेश्वरानें निर्माण करण्याचें कारण तरी काय असावें? ह्या मंडळींत **बर्न्स** ह्मणून एक कवि होता. त्यानें ह्या प्रश्नाच्या उत्तराची एक कविता करून तेथीलच एका खिडकीच्या तावदानावर लिहून ठेवली. तींतील तात्पर्य येणेंप्रमाणें—

**कां रत्न देव करि हें इतुकें लहान**
**मेरू कशास सृजिला इतुका महान ॥**
**ह्याचा विचार करणें नलगेच खोल**
**द्यावें तयास मनुजें बहु दिव्य मोल ॥**

येवढ्यानेंच वरील प्रश्नाचें जरी नीटसें समाधान होत नाहीं, तरी कवीची समयसूचकता चांगली दिसून येते. आणि खरोखर विचार करतां हेंही खरेंच; कीं अगदीं लहान मनुष्यें उत्पन्न होणें, त्यांचे सर्व अवयव रेखल्या प्रमाणांत दिसणें; त्यांची बुद्धि पोक्त मनुष्यासारखी असणें, दिसण्यांत हुषार टवटवीत दिसणें, आणि तीं जगावर पुष्कळ दिवस राहणें, ह्या गोष्टी अत्यंत विलक्षण, ह्यांत संशय नाहीं. पुष्कळ गोष्टींवरून असें अनुमान निघालें आहे कीं, अतिशय उंच मनुष्यें असतात तीं बहुतकरून कुरूप, अवयवांत अप्रमाण, बुद्धीनें मंद, शरीरानें कृश आणि दिसण्यांत भेसूर अशीं असतात. आणि अतिशय गिड्डीं मनुष्यें असतात तीं बहुतकरून सुस्वरूप, अवयव प्रमाणांत, अंमळ सशक्त अशीं असून दिसण्यांत गोजिरवाणीं दिसतात. आणि ह्यामुळेंच त्यांस उंच मनुष्यांपेक्षां लोकांत फार सन्मान मिळतो.

आज आह्मी येथें साऱ्या जगांतील उंच व गिड्ड्या मनुष्यांची नांवनिशी देत बसत नाहीं. तर जी जोडी सर्वांत गिड्डी ह्मणून जगांत प्रसिद्धीस आली, व जी सन १८८२ मध्यें **लंडन** शहरांत, व दुसऱ्या कित्येक देशांत दाखविली गेली, तिजविषयींच आह्मी लिहितों.

ही जोडी सन १८८३ मध्यें मद्रासेसही आणिली होती. ती पाहिली ह्मणजे विधात्याच्या कर्तुत्वाचें फार कौतुक वाटे. कारण एक मनुष्य कदाचित् निर्माण होण्याचा संभव आहे. पण पुरुषासाठीं स्त्री, व स्त्रि-

येसाठीं पुरुष, हीं एकाच कालीं पैदा होणें, ही गोष्ट अत्यंत विलक्षण होय. !!

ह्या जोडीपैकीं पुरुष होता त्याचें नांव **"जनरल माइट"** ह्याचें वय १९ वर्षांचें होतें. ह्याची उंची २२ इंच असून वजन अवघें ९ रत्तल होतें!! ही जोडी **बर्लिन** येथें, एका **जर्मन** लेखकानें पाहिली तेव्हां त्यास इतकें आश्चर्य वाटलें कीं सांगतां सोय नाहीं!! त्या भरांत तो ह्मणाला, "अरेरे! हा विजातीय चमत्कार वर्णन करण्यास भाषेंत शब्द नाहींत. ही किती खेदाची गोष्ट आहे?" त्यानें लिहिलें आहे कीं, हा **जनरल** बहु मोठा आनंदी आणि विनोदी आहे. ह्यास उत्तम प्रकारें गातां येतें. नाटकांतील पात्राची बतावणीही तो उत्तम प्रकारची करी. **"वॉच् आन् दि ऱ्हाइन"** ही कविता तर त्यानें फार सुस्वर गायली! आणि त्याच्या त्या गायनांत आणि विनोदांत त्याचे चिमुकले डोळे गरगर फिरतांना फार मौज वाटे.

स्त्री होती तिचें नांव **'मिली'**—ह्या बाईचे गुणधर्म आह्मी प्रसिद्ध करतों, ह्मणून त्या आह्मास क्षमा करोत!!—ह्यांचें वय १२ वर्षांचें होतें. आणि उंची १९॥ इंच होती. आणि वजन ७ रत्तल होतें. ह्या बाई स्वरूपानेंही फार सुरेख आहेत. जनरलचेंही ह्या बाईवर अत्यंत प्रेम आहे. दोघांची शक्ति एकमेकांस साजेशी आहे.

प्राचीन कालीं **'टाम थंब'** ह्मणून एक ठेंगू मनुष्य दाखविण्यांत आला होता. पण तो २५ इंच उंच असून वजनांत २५ रत्तल होता!! त्या बिचाऱ्यास ह्या वरील जोडीनें मागें पाडलें!!

**"विस्तीर्णा पृथिवी जनोपि विविधः किं किं न संभाव्यते."**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

## केरळकोकिळांतर्गत

### चीनचा इतिहास.

ह्यांत चीनदेशाची माहिती, तेथील लोकांच्या चमत्कारिक **मनोल्हाद** वगैरे गोष्टींचें सुलभ व सोप्या भाषेनें मनोरंजक होईल असें वर्णन केलें अ **रस कादंबरीप्रमाणें** उत्तरोत्तर वाचण्यास चित्त वेधून जाऊन हें **वाचन सहज** होतें. किं० ६ आणे ट.

---

### ऐतिहासिक पोवाडे.

**आश्वत्थ व शालिग्राम. किंमत २॥ रु. ट. ख. ०=॥.**

**जनार्दन महादेव गुर्जर,** केरळकोकिळचे मालक—दुकान

---

### रंगित चित्रें.

राम, गणेश, शिव, वगैरे पंचायतनें, भरतभेट, वनवासीराम, इ प्रकारचीं सुंदर जर्मनी येथें तयार झालेलीं चित्रें. हुंडीच्या भावा

| **कागदाची किंमत.** | | **फ्रेम (=** | |
|---|---|---|---|
| १०×१४ इंचांचें प्रत्येकीं ... | ... ०-॥ | १०×१४ | ... ।= |
| ,, ,, ,, डझन रु... | ... १०- | ,, ,, ,, डझन रु... | ... ३॥।० |
| १६×२० इंचांचें प्रत्येकीं ... | ... ०३ | १६×२० इंचांचें प्रत्येकीं ... | ... ०॥= |
| ,, ,, ,, डझन रु. | ... २०- | ,, ,, ,, डझन रु.... | ... ६॥ |

ह्याशिवाय, इतर हरएक प्रकारचा माल ग्राहक व व्यापारी यांस अडत घेऊन, रवाना करण्यांत येतो. पैसे आगाऊ रोख.

**दत्तात्रेय कृष्ण सांडू, रामवाडी, मुंबई.**

---

**व्यापारी लोक व ग्राहक ह्यांकरितां**

## हरएक प्रकारचा माल

**मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय. नियम मागवावे.**

**जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी, मुंबई.**

# केरळकोकिळ वर्ष ५ वें.

री, सन १८९१चे बाराही अंक एकत्र, सुरेख, जाड कापडी पुठ्यानें बांधलेले. ऱ्याळीं सुरेख अपूर्व चित्रें १२, अनेक विषय २५, कविता नि व छंदाच्या ६ वेळ, मलबारवर्णन ७ वेळ, लोकोत्तर चमत्कार कारांनीं पाठविलेल्या पुस्तकांपैकीं ४४ पुस्तकांची पुस्तकपरीक्षा, स्फूट विषय ४, नवीन शोध १०, किरकोळ २० आणि सं जे सन १८९१ मध्यें जगांत घडलेल्या ठोकळ गोष्टींची थोडक्यांत णिका, हरपलेलीं नररत्नें आणि शेवटीं संवत्सरमाहात्म्य, लोकांस १८९१ नें साल कसें काय सुखासमाधानांत गेलें त्याना ा आहे. किंमत १॥ रु. ट. ख. ⁄≡. व्हा. पे. पाठवूं.

## रकोकिळ मासिकपुस्तक.

आगाऊ ःर्षाची वर्गणी १८३ ट. ख. सह

... अपूर्व चित्र दाखवितो. मलबार, इतर ... अद्भुत, ... व व्यवहार सांगतो. सरळ, सोप्या व रसि कवितांचा प्रसाद देतो. नीतिधर्मतत्वांचा ... ठसवितो. लोकोत्तर चमत्कारांचें ज्ञान देतो. ह्याच्या मनोरंजक व स्फुट गोष्टी तर हृदयांत गुदगुल्या होतात. हा, पुस्तकपरीक्षा निःशंकपणें गुणदोष विवेचनानें सणसणीत करतो. हा अनेक व्यवहाराच्या व ज्ञानाच्या गोष्टी सांगत सांगत देशोदेशीं हजारों विद्वान्, रसिक, व मार्मिक गृहस्थांच्या घरीं सारखा ५ वर्षें जाऊन भेटत आहे. किती लोकांनीं ह्याला डोक्यावर घेतले आहे, व साधु साधु, धन्य धन्य म्हणून स्तुतिपत्रें दिलीं आहेत. हा लहानमोठ्यांबरोबर, बायकामुलांबरोबर अधिकाराप्रमाणे बोलतो. असा हा "केरळकोकिळ" एक रुपया तीन आण्यांत बारमासीं वर्षभर भेट देतो.

[ हें प्रत्येक महिन्याच्या पंधरा तारखेचे आंत प्रसिद्ध होतें. ]

(१) ह्याचा वर्षारंभ जानेवारीपासून असल्यामुळें केव्हांही मध्यंतरीं वर्गणीदार होणारांस त्या वर्षाचे मागील सर्व अंक पाठवून पुढें सुरू करण्यांत येतें. (२) वर्गणी आगाऊ पाठवावी किंवा व्हा. पे. नें पाठविण्यास लिहावें. (३) पत्त्यावरील नंबर पत्रांत, व मनीआर्डर कूपनांत वगैरे दर्शविल्यानें बिनचूक काम होईल. (४) किरकोळ अंकाची किंमत ...

**जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी, मुंबई.**